# जनमाध्यम

e-paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २१ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







## लोकशाहीवर हल्ला !



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वात कॉक्रोज जनता पार्टीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलनाच रणशींग फुंकले अयून हजारोंच्या संख्येने विद्यार्थी आणि आंदोलक रस्त्यावर उतरले आहेत. आजपासून संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली. मात्र, दुसरीकडे विद्यार्थ्यांसह आंदोलकांनी मार्ग काढत संसद भवनाजवळ पोहोचण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी आंदोलकांवर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि अमानुष लाठीमार केला, ज्यामुळे परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले असून या संपूर्ण घटनेवर देशभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान विरोधक आणि राजकीय पुढा-यांनी आपआपले मत प्रसारमाध्यमांसमोर व्यक्त केले आहे. दिल्लीतील विद्यार्थी आणि तरुणांवरील पोलिसांच्या कारवाईवरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. विद्यार्थी आणि तरुणांवर लाठीचार्ज करणे म्हणजे लोकशाहीवरच हल्ला असल्याची टीका त्यांनी केली. खरगे म्हणाले विद्यार्थी आणि तरुणांवर लाठीचार्ज करणे म्हणजे लोकशाहीवर हल्ला आहे. मोदी सरकार विद्यार्थ्यांना मारहाण करण्याचे काम करत आहे. दिल्लीत येउन आपले प्रश्न मांडू इच्छिणा-या विद्यार्थी आणि तरुणांना मारहाण करणे आणि त्यांचा छळ करणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. या मुद्याकडे काँग्रेसने अनेकदा सरकारचे लक्ष वेधले, मात्र सरकारला त्याचे काहीही गांभीर्य नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

### ◆ युवकांचा अवमान केला -राहुल गांधी

काँग्रेसकडून हा मुद्दा अनेक वर्षांपासून उपस्थित केला जात असल्याचेही राहुल गांधींनी म्हटले आहे. मोदींनी या देशातील युवकांचा अवमान केला आहे. मोदींचा केवळ असत्य आणि हिंसेवर विश्वास असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. आणि ही भारत विरोधी तत्व असल्याचेही राहुल गांधींनी म्हटले आहे.

### ◆ हे कशासाठी चाललय: प्रियंका गांधी

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी सरकार आणि पोलिसांच्या कारवाईवर जोरदार निशाणा साधला असून त्या म्हणाल्या, आम्ही सगळे केवळ चर्चेची मागणी करत आहोत. शिक्षण धोरणात अनेक त्रुटी आणि मोठे मुद्दे आहेत, तरीही तुम्ही त्यावर चर्चा करायला तयार नाही. उलट चर्चेऐवजी तुम्ही विद्यार्थ्यांवर अश्रूधुराचा वापर करत आहात आणि त्यांना लाठ्या-काठ्यांनी मारहाण करत आहात. हे कशासाठी चालले आहे? ही शेवटी आपलीच मुले आहेत. प्रियंका गांधी यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळातूनही या कारवाईचा मोठा निषेध केला जात आहे.

### ◆ भाजप घोटाळेबाज :अखिलेश यादव

पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर अखिलेश यादव यांनी संसद बाहेर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नीट पेपरफुटी प्रकरणावरून हजारो विद्यार्थी व तरुणांनी छेडलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. नीट पेपरफुटी प्रकरणामुळे अत्यंत हताश होउन अनेक विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले आहे. मात्र, या सरकारने त्यांच्याप्रति एक अवाक्षरही काढले नाही किंवा त्यांना श्रद्धांजली वाहण्याचे साधे सौजन्यही दाखवले नाही. यापेक्षा मोठा सरकारचा अहंकार दुसरा काय असू शकतो, असा शब्दात त्यांनी सरकारला सुनावले.

### ◆ स्वतःच्याच विद्यार्थ्यांची भीती :ममता

ममता बॅनर्जी यांनी या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून पोलिसांच्या कारवाईवर संताप व्यक्त केला. दिल्लीत आज आमचे तरुण आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या क्रूरतेचा मी तीव्र निषेध करते. स्वतःच्याच विद्यार्थ्यांची भीती वाटणारे हे कसले सरकार आहे? संवादाऐवजी लाठ्या-काठ्या आणि अश्रुधुराने प्रश्नांची उत्तरे देणारी ही कोणती लोकशाही आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. देश हा विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि कामगारांचा असल्याचे सांगत असहमती दर्शवणे हा गुन्हा नाही आणि क्रूरता म्हणजे शासन नाही अशी टीकाही त्यांनी केली.

### ◆ ५६ इंचावाले घाबरले : संजय राउत

सरकारच्या हातात असते तर त्यांनी या हजारो विद्यार्थ्यांच्या विरोधात ईडी लावली असती, असा घणाघात शिवसेना नेते, खासदार संजय राउत यांनी केला. तसेच ५६ इंचाचे लोक या मुलांना घाबरलेत अशी टीकाही संजय राउत यांनी केली. वांगचुक आणि दिपके काय आहेत यांना आम्ही किड्या मुंग्यासारखे चिरडून टाकू असे सरकारला वाटले. पण ही झुरळं अतिशय गंभीर आहेत. संपूर्ण देशातून झुरळं बाहेर पडली असून त्यांना पाठिंबा मिळत आहे. हे सरकार अजिबात लोकशाहीवादी नाही. हे सरकार जर लोकशाहीवादी असते तर या झुरळांना घाबरून त्यांनी मोर्चाची परवानगी नाकारली नसती. सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने इस्पितळात नेले नसते आणि सरकार या आंदोलकांना सामोरे गेले असते, त्यांच्या विषय समजून घेतला असता. धर्मेंद्र प्रधानांचा राजीनानामा घेउन या युवा पीढीचे समाधान केले असते. पण सरकार तरुणांचा अंत पाहत आहे.

## सीजेपीच्या मोर्चामुळे दिल्लीत भयंकर गदारोळ

# संसद ठप्प, रस्त्यावरही झटापट! आंदोलकांवर लाठीचार्ज












**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राजधानी दिल्लीत सोमवारी अनपेक्षित गदारोळ बघायला मिळाला. कॉक्रोच जनता पार्टीने दिलेल्या हाकेला प्रतिसाद देत हजारो तरुण रस्त्यावर आले. त्यामुळे दिवसभर पोलिसांसोबत झटापटी सुरू होत्या. संसदेतही या विषयाचे पडसाद उमटले आणि संसदेच्या दोन्ही सभागृहाचे कामकाज ठप्प झाले. अधिवेशन सुरु होण्यापूर्वीच पंतप्रधान मोदी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, सभागृहात जर तर्क आणि तथ्यावर आधारित चर्चा झाली, तर गोंधळ आणि घोषणाबाजी करण्याची गरज पडणार नाही. पण, त्याचवेळी संसदेपासून काही अंतरावर तरुणांची रस्त्यावर गर्दी वाढण्यास सुरूवात झाली होती. जंतर-मंतरवरून आंदोलक संसदेच्या दिशेने कूच करू लागले. त्याचवेळी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू झाले. त्यात या आंदोलनाचे पडसाद उमटले. 'हजारो विद्यार्थी जंतर-मंतरवर आंदोलनासाठी येत आहेत. त्यांच्यावर लाठीहल्ला केला जात आहे. सरकार त्यांना दाबून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत', असे खरगे म्हणाले. त्यानंतर विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली.काँग्रेसचे नेते शशी थरुर यांनीही सरकारवर निशाणा साधला. 'विधेयकांची घोषणा करणे आणि ते मंजूर करणे, इतकेच संसदेचे काम नाही, असे थरुर म्हणाले. ➪(पान २ वर)

## पोलिसांनी आंदोलकांना जंतर-मंतरवरून हटवले



## CJPने म्हटले- पोलिसांची निःशस्त्र लोकांना मारहाण

### संसद मोर्चावरही लाठीमार, अश्रुधुराचा मारा



कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलकांना जंतर मंतरवरून हटवण्यात आले आहे. पोलिसांनी व्यासपीठ मोकळे करून तंबू हटवले आहेत. आंदोलकांना तेथून हुसकावून लावले जात आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांनी जोरदार लाठीचार्जही केला.दरम्यान, सीजेपीने अभिजीत दीपके यांना ताब्यात घेतल्याचा दावा केला आहे. मात्र, पोलिसांनी हे नाकारले आहे. सोमवारी सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस लाठीचार्ज आणि संघर्षात अनेक आंदोलक जखमी झाले.सकाळी १० वाजता आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून संसदेच्या दिशेने कूच केल्यावर परिस्थिती चिघळली. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. यानंतर आंदोलक संसदेच्या जवळ पोहोचले. आंदोलकांनी संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर संसदेतील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मुख्य प्रवेशद्वार बंद करण्यात आले. त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी अश्रु धुराच्या नळकांड्या



फेकल्या.पोलिसांच्या कारवाईनंतर जमाव पांगला. बाहेर हा गोंधळ सुरू असताना, पंतप्रधानांसह सर्व खासदार संसदेत उपस्थित होते. या संपूर्ण घटनेदरम्यान, क?करोच जनता पक्षाच्या प्रतिनिधींनी जेपी नड्डा यांची भेट घेतली. त्यांच्या दाव्यानुसार, नड्डा यांनी त्यांना आश्वासन दिले की जंतर मंतर परिसरात कोणतीही पुढील कारवाई केली जाणार नाही.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; 5 ठार तर 1 गंभीर




**वर्धा/प्रतिनिधी-**समृद्धी महामार्गावर विरूल इंटरचेंजजवळ सोमवारी पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. हा अपघात पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडला.प्राथमिक माहितीनुसार, आयशर ट्रकने कारला मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की कारमधील चालकासह चार जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात आयशर ट्रकचा चालकही गंभीर जखमी झाला होता. त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर ट्रकमधील क्लिनर अपघातात गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि पुलगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आणि बचाव पथकाने तातडीने मदतकार्य सुरू केले.तर या भीषण अपघातामुळे समृद्धी महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला ➪(पान २ वर)

## डीजीपी धणकर यांचा संशयास्पद मृत्यू



**अगरतला :** त्रिपुराचे पोलिस महासंचालक अनुराग धणकर (१९९४ बॅचचे आयपीएस अधिकारी) यांचा अगरतळा येथील पोलिस मुख्यालयात संशयास्पद परिस्थितीत मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. प्राथमिक अहवालानुसार, वरिष्ठ आयपीएस अधिकारी धणकर यांनी स्वतःच्या सर्व्हिस पिस्तूलने गोळी झाडून आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.प्राथमिक माहितीनुसार, अगरतळा येथील पोलिस मुख्यालयातील त्यांच्या कार्यालयातच ही घटना घडली. ➪(पान २ वर)

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान अमित शाह यांच्या भेटीला



**नवी दिल्ली :** नीट परीक्षेच्या गैरव्यवहार प्रकरणात दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन सुरू होते. आज पावसाळी अधिवेशनाला सुरूवात झाली. थेट संसद भवनाकडे मोर्चा निघाला. आता हा मोर्चा संसद भवनाच्या परिसरात पोहोचला आहे. संसदेचे गेट बंद करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक रूग्णालयात आहेत. त्यांनी आंदोलनात सहभागी होण्यासाठी पत्र दिले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. संसद भवनाच्या परिसरात गोंधळ उडाला. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याकरिता आंदोलक आक्रमक झाली आहेत. यादरम्यानच दिल्लीमध्ये मोठ्या घडामोडी घडत आहेत. संसद भवन परिसरात मोठा पोलिस बांदोबस्त वाढवण्यात आला. अभिजीत दिपके संसद भवनाकडे जाण्यासाठी आग्रही आहेत. अश्रू धुराच्या नळकांड्या फेकल्या आहेत. आंदोलकांना पांगवण्याचे काम सुरू आहे. संसदेचे मुख्य गेटही बंद करण्यात आले. संसदेचे कामकाज ➪(पान २ वर)

## मंत्रालयातील चहापानासाठी अशुद्ध पाण्याचा वापर

**मुंबई /प्रतिनिधी-**मंत्रालयातील दूषित पाण्याने अधिकारी-कर्मचा-यांचे आरोग्य बिघडले असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चहापानासाठी अशुद्ध पाणी वापरले गेल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला. खुद्द मुख्यमंत्र्यांनी त्यांना देण्यात आलेल्या काफीला वास येत असल्याची तक्रार केली. तेव्हापासून मुख्यमंत्र्यांच्या चहा, काफीसाठी बाटलीबंद मिनरल पाण्याचा वापर सुरू झाला आहे. मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्री कार्यालयात अनेक महत्वाच्या बैठका ➪(पान २ वर)

## रशियन क्षेपणास्त्र हल्ल्यात युक्रेनच्या समुद्रात 4 भारतीय कर्मचा-यांचा मृत्यू, 1 गंभीर

### रशिया-युक्रेन युद्धात भारताला फटका!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**युक्रेनमध्ये व्यापारी जहाजावर रशियाने केलेल्या हल्ल्यात चार भारतीय कर्मचा-यांचा मृत्यू झाला असून, एक भारतीय नागरिक गंभीर जखमी झाला आहे. युक्रेनच्या ओडेसा बंदरामधून बाहेर पडणा-या एमव्ही गोल्डन लिओ या जहाजावर रविवारी रात्री (१९ जुलै) हा हल्ला झाला. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी रात्री या हल्ल्याची माहती दिली असून, जखमी कर्मचा-यावर उपचार सुरू असल्याचे म्हटले आहे.


रशियाने डागली तीन क्षेपणास्त्रं भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने व्यापारी जहाजावरील निषेध केला



आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, मुंबईमधील ओशियन ग्रेस शिपिंग लिमिटेड या कंपनीच्या एमव्ही गोल्डन लिओ जहाजावर हल्ला झाला आहे. युक्रेनियन नौदलाच्या हवाल्याने रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, या जहाजावर रशियाने तीन क्षेपणास्त्र डागली. या जहाजावर भारत आणि सिरियातील खलाशी काम करत होते. १९ जुलै रात्रीच्या सुमारास जहाज ओडेसा बंदरातून बाहेर पडताना हा हल्ला ➪(पान २ वर)

## धर्म बदलल्याने जात बदलत नाही

### नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय



**नागपूर /प्रतिनिधी-** धर्म बदलल्याने जात बदलत नाही याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. केवळ एखाद्या व्यक्तीने विशिष्ट धर्म स्वीकारला किंवा त्याचे पालन केले म्हणून जन्माने प्राप्त झालेली जात बदलत नाही, असे न्यायालयाने नमूद केले. या निर्णयामुळे जातवैधता प्रमाणपत्राशी संबंधित अनेक प्रकरणांसाठीहा महत्त्वाचा निर्णय ठरू शकतो.अमरावती येथील प्राची सुधीर नेटके (वय २०) या अभियांत्रिकी विद्यार्थिनीने वाणी या इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी याचिका दाखल केली होती. मात्र, तिच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यात जात सैतवाल जैन अशी नोंद असल्याचे कारण देत विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने तिचा दावा फेटाळला होता. तसेच जैन वाणीचा राज्याच्या ओबीसी यादीत समावेश नसल्याचेही समितीने नमूद केले होते. यासाठी प्राची नेटके यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने प्रकरणाची सुनावणी करत समितीचा आदेश रद्द केला. न्यायालयाने म्हटले की, शाळेच्या दाखल्यातील धर्मासंबंधी उल्लेखाला खूप महत्त्व देण्यात आले आणि पुराव्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले. दक्षता पथकाच्या अहवालातही प्राची नेटके यांचे कुटुंब वाणी समाजातील असल्याचे स्पष्ट झाले होते. कुटुंब जैन धर्माचे पालन करत असले तरी त्यामुळे त्यांची जन्मजात असलेली जात बदलत नाही, असे न्यायालयाने अधोरेखित केले. यानंतर न्यायालयाने संबंधित समितीला चार आठवड्यांच्या आत प्राची नेटके यांना वाणी समाजाचे जातवैधता प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले.

## स्पेनने 16 वर्षांनंतर जेतेपदावर कोरले नाव



**नवी दिल्ली :** फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील अंतिम सामना स्पेन आणि अर्जेंटिना या दोन्ही संघांमध्ये पार पडला. गतविजेत्या अर्जेंटिनाला हा सामना जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. पण स्पेनने दाखवून दिलं की, आम्हीही वर्ल्ड चॅम्पियन संघाला हरवून वर्ल्ड चॅम्पियन बनू शकतो. एक्स्ट्रा टाईममध्ये गेलेल्या या सामन्यात स्पेनने १-० ने बाजी मारुन अर्जेंटिनावर थरारक विजय मिळवला आहे. फेरान टारेसच्या एकमेव ➪(पान २ वर)




जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# चिखलदरा सहलीसाठी जाताना दोन मित्रांचा अपघातात मृत्यू

## धारणी–परतवाडा मार्गावरील घटांग फाट्याजवळील घटना

## मालवाहू पिकअपची दुचाकीला समोरासमोर धडक

**अमरावती/प्रतिनिधी-** चिखलदऱ्याच्या निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी दुचाकीवरून निघालेल्या दोन जिवलग मित्रांचा धारणी-परतवाडा मार्गावरील घटांग (वाई) फाट्याजवळ रविवारी (दि.१९) सकाळी झालेल्या भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला. भरधाव मालवाहू पिकअपने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने हा हृदयद्रावक अपघात घडला. या घटनेमुळे परतवाडा, दर्यापूर परिसरात शोककळा पसरली आहे.माहितीनुसार, यश रवि कोठेकर (वय २४, रा. कांडली, ता. अचलपूर) आणि मंथन सुरेश वानखडे (वय २७, रा. शिंगणापूर, ता. दर्यापूर) हे दोघे जिवलग मित्र एमएच-२७-ईई-६८९६ क्रमांकाच्या पल्सर दुचाकीवरून विकेंडच्या सुटीचा आनंद घेण्यासाठी चिखलदरा येथे जात होते. रविवारी सकाळी सुमारे साडेअकराच्या दरम्यान धारणी-परतवाडा मुख्य मार्गावरील घटांग (वाई) फाट्याजवळ समोरून भरधाव वेगाने येणा-या एमएच-२७-डीटी-८२८२ क्रमांकाच्या मालवाहू पिकअपने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की दोन्ही युवक अनेक फूट दूर फेकले गेले. डोक्यासह शरीराच्या विविध भागांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेउन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह पुढील वैद्यकीय व कायदेशीर प्रक्रियेसाठी रवाना करण्यात आले. या प्रकरणी मालवाहू पिकअपचा चालक निखील दिपक गुधाने (वय ३३, रा. पिंपळगाव पाने, ता. नेर, जि. यवतमाळ) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. या अचानक घडलेल्या अपघातामुळे दोन्ही कुटुंबांवर दु?खाचा डोंगर कोसळला आहे. आनंदाने विकेंड सहलीसाठी घराबाहेर पडलेले दोन मित्र कायमचे काळाच्या पडद्याआड गेल्याने कांडली, शिंगणापूर तसेच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पांदण रस्त्यांची कामे अर्धवट

## प्रशासनाच्या हलगर्जीपणा, शेतकरी संतप्त



**खल्लार/प्रतिनिधी -** खरीप हंगामाला वेग आला असून शेतकरी पेरणी, खत टाकणे, तणनाशक फवारणी व इतर शेतीच्या कामांमध्ये व्यस्त असताना दर्यापूर तालुक्यातील अनेक गावांतील पांदण रस्त्यांची कामे मात्र अद्याप अर्धवट अवस्थेत पडून असल्याचे वास्तव समोर आले आहे. शासनाच्या निधीतून मंजूर झालेल्या या कामांना वेळेत पूर्णत्व न आल्याने शेतक-यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.शेतक-यांसाठी पांदण रस्ते हे केवळ वाहतुकीचे साधन नसून शेतीच्या उत्पादन प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा दुवा आहेत. याच रस्त्यांद्वारे ट्रॅक्टर, बैलगाड्या, कृषी अवजारे, बियाणे, खते, औषधे तसेच शेतीमालाची वाहतूक केली जाते. मात्र अनेक गावांमध्ये रस्त्यांवर केवळ माती टाकून कामे सोडून देण्यात आली आहेत. काही ठिकाणी खडीकरण झालेले नाही, तर काही ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक व्यवस्था नसल्याने पावसाचे पाणी साचून संपूर्ण रस्ता चिखलमय झाला आहे.

पावसामुळे या रस्त्यांवरून ट्रॅक्टर घसरत आहेत, बैलगाड्या अडकत आहेत आणि दुचाकीने शेतात जाणेही धोकादायक बनले आहे. अनेक शेतक-यांना शेतापर्यंत खत, बियाणे व औषधे पोहोचविण्यासाठी अतिरिक्त मजुरी आणि वाहतुकीचा खर्च करावा लागत आहे. परिणामी शेतीचा उत्पादन खर्च वाढत असून वेळेवर शेतीची कामे पूर्ण करण्यात अडथळे निर्माण होत आहेत. संबंधित यंत्रणेकडे अनेकदा तक्रारी करू नही कामांना गती मिळालेली नाही. काही ठिकाणी कंत्राटदारांनी यंत्रसामग्री हटवून कामे पूर्णपणे बंद केली आहेत. त्यामुळे शासनाने मंजूर केलेल्या निधीचा अपेक्षित लाभ शेतक-यांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप होत आहे.

खरीप हंगामात प्रत्येक दिवस महत्त्वाचा असतो. पावसाच्या योग्य वेळी खत देणे, फवारणी करणे आणि पिकांची निगा राखणे आवश्यक असते. मात्र रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे ही कामे वेळेत होत नसल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची भिती शेतकरी व्यक्तकरत आहेत. काही शेतक-यांनी तर रस्त्याअभावी शेतीमालाची वाहतूक करणेही कठीण झाल्याचे सांगितले.दर्यापूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये हीच परिस्थिती असल्याचे चित्र दिसून येत आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही कामे पूर्ण करणे अपेक्षित असताना संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. प्रशासन आणि कंत्राटदार यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने त्याचा फटका थेट शेतक-यांना बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे.शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रशासनाने तातडीने अर्धवट पांदण रस्त्यांची कामे पूर्ण करावीत, दोषी कंत्राटदारांवर कारवाई करावी आणि खरीप हंगामात शेतक-यांची गैरसोय टाळण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी केली आहे.

# तपोवनच्या 'डॉन'ची दहशत

## -चाकूचा धाक दाखवून तिघांना लुटले

**अमरावती/प्रतिनिधी ?-** शहरातील विद्यापीठ रोड परिसरात चाकूचा धाक दाखवत तिघा तरुणांना बेदम मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम जबरदस्तीने लुटल्याची धक्कादायक घटना रविवारी (१९ जुलै) रात्री घडली. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी पाच जणांविरुद्ध जबरी चोरी, मारहाण व धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गौतमराव सोनोने (वय २९, रा. मासोद, ता. जि. अमरावती) हे त्यांचे आतेभाउ हर्षल यांना राजापेठ येथून घेउन भाचा प्रेमसोबत दुचाकीने घरी परतत होते. रात्री साडेआठच्या सुमारास विद्यापीठ रोड परिसरात आरोपी सोहेल याने त्यांची दुचाकी अडवली. त्यानंतर मोहीत व इतर तीन अनोळखी साथीदार तेथे आले. आरोपींनी फिर्यादीच्या दुचाकीची चावी काढून घेतली. त्यापैकी एकाने फिर्यादीच्या गालावर थापड मारली, तर अन्य आरोपींनी प्रेम व हर्षल यांच्या पोटाजवळ चाकू लावून तिघांनाही रा. सु. गवई स्मारकाच्या विरुद्ध दिशेला असलेल्या मोकळ्या जागेत नेले. तेथे पाचही आरोपींनी तिघांना थापडा-बुक्क्यांनी मारहाण केली. यानंतर आरोपींनी 'सोहेल भाई को पहचानता नहीं क्या?' तसेच 'हम तपोवन के ड?न हैं, हमारा कोई कुछ नहीं बिगाड़ सकता' अशी धमकी देत चाकूचा धाक दाखवून फिर्यादीच्या खिशातील ३ हजार रुपये, प्रेमच्या खिशातील १ हजार रुपये आणि हर्षलच्या खिशातील ८०० रुपये, अशी एकूण ४,८०० रुपयांची रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर आरोपी स्प्लेंडर (क्र. एमएच-२७-एन-३९९४) व अ?ॅक्टिव्हा दुचाकीवरून पसार झाले. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात सोहेल, मोहीत व अन्य तीन अनोळखी आरोपींविरुद्ध जबरी चोरी, मारहाण, शिवीगाळ, जीवे मारण्याची धमकी आणि शस्त्राचा धाक दाखवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## पान १ व १० वरून

### वलगाव दुहेरी हत्याकांडातील पाच

एका युवकावर वार केले. त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या दुसऱ्या मित्रावरही हल्लेखोरांनी बेछूट वार केले, ज्यामुळे दोन्ही तरुण रक्तबंबाळ होऊन गंभीर जखमी स्थितीत रस्त्यावर कोसळले. हल्ला केल्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून तात्काळ फरार झाले.घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोन्ही गंभीर जखमी तरुणांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले.यामुळे गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती कळताच अमरावती पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, एसीपी निलेश ब्राम्हणे यांच्या सह वलगावच्या ठाणेदार रिता उईके व स्थानिक गुन्हे शाखेची पथके तातडीने घटनास्थळी व रुग्णालयात दाखल झाली. वाढलेला तणाव व नागरिकांची गर्दी पाहता परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. जुन्या वैमनस्यातून ही घटना घडली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलिसांनी रात्रभर विशेष मोहीम सुरू करून पाचही आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपींनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपयुक्त शाम घुगे, यशवंत सोळंके,गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट एकचे पो.नि. दिनेश दहातोंडे,गुन्हे शाखा युनिट दोंनचे प्रभारी पो.नि. अतुल वर, वलगाव ठाण्याच्या पो.नि. रिता उईके यांच्या नेतृत्वात सपोनि मनिष वाकोडे, सपोनि महेश इंगोले, सपोनि दशरथ आडे, पोउपनि गजानन सोनुने यांच्यासह सुनील लासुरकर, फिरोज खान, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, संभाजी केंद्रे, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, आस्तिक देशमुख, मंगेश लोखंडे, जहीर शेख, संजय भारसाकळे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, अतुल संभे, विकास गुढधे, विशाल वाकपांजर, रंजीत गावंडे, नरेश मोहरील, सागर ठाकरे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, योगेश पवार, चेतन गुल्हाणे, रोशन लकडे, संदीप खांडारे, प्रभात पोकळे, चेतन शर्मा, राहुल दुधे तसेच वलगाव पो.स्टे. चे अधिकारी व अंमलदार यांनी केली.

### बोगस बियाणे कंपन्यांना तात्काळ

पुन्हा घेणे यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक तणाव, आर्थिक नुकसान आणि वेळेचा अपव्यय सहन करावा लागतो. निलेश जामनिक म्हणाले, अशा घटनांमुळे परीक्षा प्रणालीची पारदर्शकता आणि विश्वासार्हतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. प्रत्येक पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कडक शिक्षा द्यावी, जेणेकरून भविष्यात असे प्रकार होणार नाहीत. मोर्चामध्ये विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

शिवसेना उबाठाचे जयस्तंभ चौकात धरणे-

पर्यावरण रक्षण आणि शिक्षण सुधारणेसाठी काम करणारे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सोमवारीं जन आंदोलनाचा आवाज घुमला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने जयस्तंभ चौकात धरणे आंदोलन केले. नगरसेवक संजय गव्हाळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला. शिवसैनिक,विद्यार्थी संघटना आणि विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

### बोगस बियाणे कंपन्यांना तात्काळ

शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना एक सविस्तर व अत्यंत आक्रमक निवेदन दिले. निवेदनात स्पष्टपणे ठणकावून सांगण्यात आले की, जिल्ह्यात सक्रिय असलेल्या या रक्तशोषक व फसव्या बियाणे कंपन्यांना तात्काळ काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे फौजदारी गुन्हे दाखल करावेत. तसेच, या बोगस बियाण्यांमुळे उद्ध्वस्त झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एक लाख रुपये एकरी प्रमाणे तात्काळ शासकीय मदत मिळावी, ही अमरावती जिल्हा युवक काँग्रेसची अत्यंत आग्रहाची मागणी यावेळी लावून धरण्यात आली; आणि शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे बियाणे पुरवणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने कायमचे रद्द करण्यात यावेत, अशी आक्रमक मागणीही यावेळी रेटण्यात आली.

यावेळी राहुल येवले (जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस अमरावती), अनिकेत ढेंगळे (कार्याध्यक्ष), रितेश पांडव (प्रदेश महासचिव), वैभव देशमुख (विधानसभा अध्यक्ष अमरावती), अर्जुन युवनाते (आदिवासी सेल अध्यक्ष), सर्वेश खांडे (ऱ्एळध जिल्हाध्यक्ष), अंकुश जूनघरे (जिल्हा उपाध्यक्ष), ऋग्वेद सरोदे (विधानसभा अध्यक्ष दर्यापूर), आशीष यादव (विधानसभा अध्यक्ष बडनेरा), संदीप मुंडे, सत्यजीत विधळे, प्रद्युम्न पाटील, अमित बेलकर, ऋषिकेश वाढोकार, श्रेयस बर्वे, हेमंत सूरजे, अक्षय घुमावरे, पंकज अमोदे यांच्यासह अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

### पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार

०७२१-२५६६०६६, ८९८३२८८९८२, ८६०५६५४०२५ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा स्ैिंदर्र्ैस्ति.म्दस या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

### विहिरीत पडलेल्या तरूणाला

आणि रेस्क्यू उपकरणांच्या मदतीने ऑपरेशन सुरू केले.फायरमन योगेश ठाकरे आणि प्रणित पेठे हे दोघे विहिरीत उतरले आणि सुमारे ८ ते १० मिनिटांच्या अथक प्रयत्नानंतर निलेश वासुदेव ठाकरे यांना सुरक्षितपणे बाहेर काढले. घटनास्थळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक जमले होते.सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी, आर्थिक नुकसान किंवा दुखापत नाही झाली. रेस्क्यू पथकाचे वाहनचालक मो. फराना, फायरमन योगेश ठाकरे, निलेश कटपेलवार, प्रणित पेठे, ज्ञानेश्वर चव्हाण आदिने प्रयत्न केले.

### सावळापूर पूर्णा परिसरातील सोयाबीन

अतुल हुड उपकृषी अधिकारी कार्यालय अचलपूर व गुणनियंत्रक आणि भागवत सोमटकर सहायक कृषी अधिकारी सावळापूर पूर्णा आणि आसेगाव पोलिस स्टेशनचे अधिकाऱ्यांनी यांनी प्रभावित शेतकऱ्यांचे निवेदने, पेरणीची माहिती, बियाण्यांचे नमुने तसेच आवश्यक कागदपत्रे संकलित केली आहेत. पुढील तपासासाठी बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार असून त्यानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांनी दोषी कंपन्यांवर कठोर कारवाई करून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे. कृषी विभागानेही दोषी आढळणाऱ्या कोणत्याही कंपनीला पाठीशी घातले जाणार नाही, तसेच नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. या प्रकरणामुळे सोयाबीन बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बियाण्यांची गुणवत्ता तपासणी अधिक काटेकोर करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

अचलपूर कृषी विभागाकडे सोयाबीन बियाण्याच्या उगवण क्षमतेबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होताच आमच्या पथकाने संबंधित शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. ज्या ठिकाणी उगवण क्षमता कमी आढळली, तेथील बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर संबंधित बियाणे कंपनीविरुद्ध कायद्यानुसार एफआयआर दाखल करण्यात आली आहे.' **-प्रवीण मडघे,** उपकृषी अधिकारी, कृषी विभाग, अचलपूर.

### गुलरघाट आदिवासी आश्रम शाळेच्या

माध्यमातून पालकांमध्ये संभ्रम निर्माण करत असल्याचा आरोप केला जात आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचा वापर करून आदिवासी विभागाच्या निर्णयाविरोधात वातावरण तयार करण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.स्थानिक पातळीवर अशीही चर्चा आहे की, काही शिक्षकांचे मुख्यालय शाळेच्या ठिकाणी नसून ते दर्यापूर शहरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांची गैरसोय टाळण्यासाठी शाळा पुन्हा बाभळी येथेच सुरू ठेवावी, यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे बोलले जात आहे. या वादात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मुद्दा मात्र दुय्यम ठरत असल्याची खंत पालक व्यक्त करीत आहेत.शाळेतील नियमित अध्यापनावर परिणाम होत असल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. नविन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे अभ्यासक्रम मागे पडत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवरही परिणाम होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.शासनाने विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, शिक्षकांनी आपल्या कर्तव्याला प्राधान्य द्यावे आणि कोणत्याही प्रकारच्या स्थानिक किंवा राजकीय दबावापेक्षा आदिवासी विद्यार्थ्यांचे भविष्य महत्त्वाचे मानावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.याबाबत आदिवासी विकास विभागाने वस्तुस्थितीची सखोल चौकशी करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही पुढे येत आहे.

### दुचाकी समोर रोही आल्याने वसुली

समोरून दुचाकी घेऊन ते अंजनगाव येथे वसुली करण्यासाठी जात होते. त्याचवेळी दुचाकी समोर अचानक रोही आल्यामुळे त्यांचा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच पाथ्रोट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि गौरवला गंभीर जखमी अवस्थेत अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. जेथे डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. गौरव वाधवा आपल्या मागे पत्नी, दोन मुले, दोन मोठे भाऊ, बहिणी सह आप्त परिवार सोडून गेले आहे.शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. या घटनेमुळे रामपुरी कॅम्प परिसरात शोककळा पसरली आहे.

### अमरावतीच्या विकासासाठी कटीबद्ध

क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी केलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. कठोरा, रेवसा आणि रहाटगाव येथील बाजारपेठांच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्नही त्यांनी अधोरेखित केले.

सत्काराला उत्तर देताना प्रवीण पोटे पाटील यांनी हा सन्मान जनतेच्या प्रेमाचा आणि पक्षाने दाखविलेल्या विश्वासाचा असल्याचे सांगितले. गरीब आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समाजाने पुढाकार घेण्याचे आवाहन करत, अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी आपण पूर्वीप्रमाणेच कटिबद्ध असू समर्पितपणे कार्य करत राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी कार्यक्रमाला श्रेयस पोटे पाटील, सुरेश जैन प्रेसिडेंट चेंबर ऑफ कॉमर्स, वरुण मालू, सुभाष तलडा, कैलास गिरोळकर, गोपाल पनपालिया, बिट्टू सलूजा, श्रीकांत कलंत्री, डॉ. गोपाल राठी, राजेश डागा, विवेक कुबडे, वसंतकुमार मालपाणी, शैलेश वानखडे, डॉ. आडवानी, नितीन शेंद्रे, वासुसेठ खेमचंदाणी, सुधीर शहा, रवींद्र सिंह सलूजा, जगदीश चाबडा, सतीश छाबडा, रोहित खुराना, डॉ. राजेंद्र सिंह अरोरा यांच्यासह गुरु सिंह सभा व क्रेडाई यूथ विंगचे संचित पाटील, सुदीप पेठे, प्रतीक मालवीय, अंकुश चिंतावर, अमित साहू, नितेश बुंदेले, अभिमन्यु राठी, ऐश्वर्य अविनाशे, मोहन हजारे,शैलेश वानखडे, राम महाजन, पंकज देशमुख, संजय पर्वतकर, वैभव देशपांडे, सचिन वानखडे, श्रीकांत धर्माळे, धर्मेंद्र चांदेले, अनिल विखे, रवींद्र गोरटे, सुदीप पेठे, कमल मालवीय, लक्ष्मीकांत जोशी, नितीन शेंद्रा, प्रविण ढवळे, नरेंद्र किंगरानी, मंगेश हजारे, दीपक गोडवाणी, ज्ञानेश्वर हिवसे, रवी महल्ले अमन तलडा, रोहित जिवारकर, शिरीष अग्रवाल, अर्जुन भेंडे, अजिंक्य भेंडे, तेजस पाटील, हिमांशू गोरटे, अश्विन दाभाडे, विजय परांजपे, आदित्य पाटील, संस्कार ठाकरे, अनुदय पर्वतकर, साहिल काळे, अमित चंदेले, रुत्विक देशमुख तसेच क्रेडाई यूथ विंग, गुरु सिंह सभा आणि विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, उद्योजक तसेच अनेक मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### टायर फुटून कार पलटी, तीनजण

दरम्यान भारवाडी ते वरखेड फाट्यानजीक अचानक कारचा समोरील टायर फुटल्याने कारवरील नियंत्रण सुटले. यातच कार थेट महामार्गाच्या खाली उतरली व पलटी झाली.यावेळी जखमींना रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे पाठविण्यात आले आहे. मंगेश ठाकरे, राज रियाड यासह घटनास्थळी उपस्थिती नागरिकांनी जखमीना रुग्णालयात दाखल करण्यासाठी मदतकार्य केले. तिवसा पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

### जिल्ह्यातील विशेष लोक अदालतीमध्ये

लोक अदालतीचे आयोजन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांच्या नियोजनाखाली करण्यात आले. या कार्यात जिल्हा न्यायाधीश-१ ए. जी. जोशी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, वकील वर्ग, बँक व पतसंस्थांचे प्रतिनिधी तसेच पक्षकारांचे सहकार्य लाभले. सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही लोक अदालत यशस्वी झाल्याचे सांगत सचिव संजय सहारे यांनी सर्वांचे आभार मानले.

### संसद ठप्प, रस्त्यावरही झटापट!

राम मंदिरातील दान चोरी, नीट पेपरफुटी प्रकरणावर चर्चा झाली पाहिजे म्हणत त्यांनी सरकारवर टीकास्त्र डागले. विद्यार्थी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करत आहेत, तर लाठीहल्ला का करण्यात आला, हे मला समजत नाहीये? असेही ते म्हणाले.पोलिसांकडून मोर्चा अडवण्यासाठी लाठीहल्ला आणि अश्रु धुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. आंदोलकांना पांगवण्याचे प्रयत्न दिल्ली पोलीस आणि सुरक्षाकांकडून करण्यात आले. या वेळी आंदोलक आणि पोलीस यांच्यात जोरदार झटापटी ठिकठिकाणी बघायला मिळाल्या. असंख्य आंदोलक आणि पोलीस यात जखमी झाले आहेत. काहींवर रुग्णालयात दाखल केले गेले. दरम्यान, आम्ही माघार घेणार नाही, असेही सीजेपीने जाहीर केले.

अभिजीत दीपकेने मोर्चा निघाल्यानंतर उपोषण मागे घेतले. तर आंदोलक संसदेच्या दिशेने जात असतानाच सीजेपीच्या काही सदस्यांनी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेतली. नड्डा यांच्या माध्यमातून तीन मागण्यात करण्यात आल्या आहेत. यात एक म्हणजे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, सोनम वांगचुक यांची तत्काळ सुटका आणि नीट परीक्षेच्या तणावामुळे आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. दिल्लीत झालेल्या या आंदोलनाला देशातील वेगवेगळ्या भागातही आंदोलन करून पाठिंबा देण्यात आला. मुंबई, पुण्यासह देशातील अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये विद्यार्थी, नागरिक रस्त्यावर उतरले होते. पोलिसांनी ठिकठिकाणी आंदोलकांना ताब्यात

### समृद्धी महामार्गावर भीषण

होता. घटनास्थळावरील अपघातग्रस्त वाहने हटवून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न करण्यात आले. मृतदेह पुलगाव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. या भीषण अपघाताचा पुढील तपास पुलगाव पोलिस करत आहेत. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला याचा तपास सुरू आहे.दरम्यान, मागील २९ जून रोजीही असाच एक अपघात अमरावती येथे घडला होता. चंद्रपूरकडून अकोल्याकडे जात असताना उभ्या कंटेनरला कार मागून धडकल्याने त्यामधील एकाच कुटुंबातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला होता. देशातील सर्वांत आधुनिक आणि वेगवान महामार्गांपैकी एक असलेल्या समृद्धी महामार्गावर वेगाइतकाच वाहनधारकांचा निष्काळजीपणाही वाढत असल्याचे वास्तव आहे. त्यात महामार्गाच्या कडेला बिनधास्त उभे केलेले ट्रक, कंटेनर आणि कार हेच आता भरधाव वाहनांसाठी मृत्यूचे सापळे बनत आहेत.

### डीजीपी धणकर यांचा

गोळीचा आवाज ऐकून सहका-यांनी धाव घेतली असता धणकर रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिका-यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, तपास सुरू करण्यात आला आहे. त्यांनी हे टोकाचे पाउल का उचलले याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

**अत्यंत अनुभवी अधिकारी**

अनुराग धणकर हे पोलिस सेवेतील एक अत्यंत अनुभवी आणि धडाडीचे अधिकारी म्हणून ओळखले जात होते. सीबीआयमध्ये कार्यरत असताना त्यांनी प्रसिद्ध उद्योगपती नीरव मोदी प्रकरणातील महत्त्वाच्या तपासाचे नेतृत्व केले होते. १९८४ मधील शीखविरोधी दंगल प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाचे नेतृत्वही त्यांनी केले होते.

गोळीचा आवाज ऐकून सहका-यांनी धाव घेतली असता धणकर रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिका-यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, तपास सुरू करण्यात आला आहे. त्यांनी हे टोकाचे पाउल का उचलले याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

**अत्यंत अनुभवी अधिकारी**

अनुराग धणकर हे पोलिस सेवेतील एक अत्यंत अनुभवी आणि धडाडीचे अधिकारी म्हणून ओळखले जात होते. सीबीआयमध्ये कार्यरत असताना त्यांनी प्रसिद्ध उद्योगपती नीरव मोदी प्रकरणातील महत्त्वाच्या तपासाचे नेतृत्व केले होते. १९८४ मधील शीखविरोधी दंगल प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाचे नेतृत्वही त्यांनी केले होते.

### केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान

स्थगित करण्यात आले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान अमित शाह यांच्या भेटीला पोहोचले आहेत. कारण आंदोलकांची मुख्य मागणी आहे की, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. सोनम वांगचुक यांनी आंदोलन मागे घेण्याबाबत भाष्य केले. पण त्यांनी सरकार पुढे ३ महत्वाच्या अटी ठेवल्या आहेत. काक्रोच जनचा पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके संसद भवनाजवळ पोहोचले आहेत. अनेक लोक या आंदोलनात सहभागी झाले. संसदेवरील मोर्चाला परवानगी नाकारण्यात आली होती. तरीही हा मोर्चा पुढे निघाला. मोठा पोलिस बंदोबस्त संसद परिसरात बघायला मिळत आहे. अभिजीत दिपके आणि त्यांचे सहकारी संसदेकडे येण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, पोलिसांनी त्यांना रोखले आहे.

### मंत्रालयातील चहापानासाठी अशुद्ध

होतात. बैठकीच्या निमित्ताने येणारे मंत्री महोदय, लोकप्रतिनिधी, सनदी अधिकारी, अति महत्वाच्या व्यक्तींचे चहापान देउन आदरातिथ्य केले जाते. त्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाला लागून छोटी कॅन्टीन आहे. अशाच एका बैठकीसाठी मुख्यमंर्त्यांना क?फी देण्यात आली. त्यावेळी क?फीला वास येत असल्याची तक्रार फडणवीस यांनी केली. या तक्रारीनंतर मुख्यमंत्री कार्यालयातील वरिष्ठ अधिका-याने चहा झ्र क?फी तयार करणा-या कर्मचा-यांची झाडाझडती घेतली.मंत्रालयातील पाणी दूषित आणि जीवाणू मिश्रित असल्याचे काही दिवसांपूर्वी उघडकीस आले. या पाण्यामुळे मंत्रालयातील जवळपास ४० ते ५० टक्के अधिकारी कर्मचा-यांना जुलाब, ताप, उलटीचा त्रास सुरू झाला. काहींना तर दूषित पाण्याने काविळ झाल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हावे लागले. या पार्श्वभूमीवर मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या एका वरिष्ठ अधिका-याने खुद्द मुख्यमंर्त्यांना अशुद्ध पाण्याचा त्रास जाणवल्याची माहिती दिली.

**मंत्रालयातील पाण्याचा धसका**

दूषित पाण्याने त्रास झाल्याने अधिकारी ▯ कर्मचा-यांनी मंत्रालयातील पाण्याचा चांगलाच धसका घेतला आहे. मंत्रालयातील पाणी पिण्याऐवजी अधिकारी-कर्मचा-यांनी आता स्वखर्चाने बाटलीबंद पाणी वापरण्यास सुरुवात केली आहे.

**मुख्य सचिवांकडे तक्रार**

दरम्यान, मंत्रालयातील दूषित पाणी पुरवठ्याला सार्वजनिक बांधकाम विभागाचा हलगर्जीपणा कारणीभूत असल्याचे अधिकारी-कर्मचा-यांचे म्हणणे आहे. मंत्रालयातील दूषित पाण्याची समस्या अद्याप दूर झाली नसल्याने काही अधिकारी-कर्मचा-यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची भेट घेउन बांधकाम विभागाबद्दल तक्रार केल्याचे समजते.

### रशियन क्षेपणास्त्र हल्ल्यात

झाला, अशी माहिती समोर आली आहे.

**चार भारतीय कर्मचा-यांचा मृत्यू-**एमव्ही गोल्डन लिओ या जहाजावर एकूण १७ कर्मचारी होते, ज्यामध्ये ५ भारतीय नागरिकांचा समावेश होता. या हल्ल्यात ४ भारतीयांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. युक्रेनमधील भारतीय दूतावास जखमी आणि मृतांच्या कुटुंबियांच्या संपर्कात असून, मदत पुरवली जात आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. भारताने या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला आहे.

**भारताकडून हल्ल्याचा निषेध-**भारत या हल्ल्याचा तीव्र निषेध करतो. व्यापारी जहाजांना लक्ष्य करणे, कर्मचा-यांचा जीव धोक्यात घालणे आणि सागरी वाहतूक व व्यापारात अडथळा निर्माण करणे निंदनीय आहे, अशा शब्दात भारताने नाराजी व्यक्त केली आहे. हल्ल्यानंतर ओडेसामध्ये रात्रभर शोध आणि बचाव कार्य सुरु होते. क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर जहाजाला भीषण आग लागली. जहाजावरील १७ सदस्यांपैकी ८ जणांना वाचवण्यात यश आले आहे. दरम्यान, रशियाने ओडेसा शहरावरही केलेल्या हल्ल्यात तीन नागरिकांचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले आहेत.

### स्पेनने 16 वर्षांनंतर जेतेपदावर

गोलच्या बळावर स्पेनने अर्जेंटिनावर ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. यासह तब्बल १६ वर्षांनंतर फिफा वर्ल्डकपवर नाव कोरलं आहे. या सामन्यातील सुरुवातीच्या ९० मिनिटांत दोन्ही संघांना एकही गोल करता आला नव्हता. पण त्यानंतर झालेल्या एक्स्ट्रा टाईममध्ये असं काही घडलं, ज्याची कोणी अपेक्षाही केली नसेल. सामन्यातील १०६ व्या मिनिटाला स्पेनचा स्टार विंगर फेरान टारेसने ऐतिहासिक गोल केला. हा या संपूर्ण सामन्यातील एकमेव गोल ठरला. या गोलने स्पेनचा या सामन्यातील विजय निश्चित केला. यासह स्पेनने १६ वर्षांनंतर जेतेपदाचा दुष्काळ संपवला. तर अर्जेंटिनाचं लागोपाठ दुसऱ्यांदा जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्याचं स्वप्नं थोडक्यात भंगलं.

स्पेनला या सामन्यातील पहिला गोल करण्यासाठी १०६ मिनिटे वाट पाहावी लागली. फेरान टारेस योग्यवेळी अचूक ठिकाणी पोहोचला आणि अचूक टायमिंग साधून त्याने गोल केला. यासह अर्जेंटिनावर १-० ने आघाडी मिळवून दिली. यादरम्यान स्पेनचा १ गोल अमान्य घोषित करण्यात आला होता. पण तरीदेखील स्पेनने दमदार पुनरागमन केलं.

स्पेनला जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्यासाठी १६ वर्षे वाट पाहावी लागली आहे. याआधी २०१० मध्ये झालेल्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेत स्पेन आणि नेदरलँड्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. हा सामना देखील स्पेनने १-० ने जिंकून इतिहासाला गवसणी घातली होती. यासह स्पेनने पहिल्यांदाच वर्ल्डकपची ट्रॉफी उंचावली होती. त्यावेळी सामन्यातील ११६ व्या मिनिटाला अँड्रेस इनिएस्ताने गोल करुन स्पेनला १-० ने आघाडी मिळवून दिली होती. तर अर्जेंटिनाविरुद्धच्या सामन्यात फेरान टारेसने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या पराभवानंतर लिओनेल मेस्सी देखील भावूक झाला.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २१ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# वाशिममध्ये विद्यार्थ्यांचा विराट मूक मोर्चा

## ऑफलाइन परीक्षा, भरतीसह विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक; शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी; जंतर-मंतरवरील आंदोलनाला पाठिंबा





■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जिल्ह्यात प्रथमच विविध महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र येत आपल्या विविध शैक्षणिक मागण्यांसाठी रस्त्यावर उतरले. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघालेला विराट मूक मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात एमपीएससीच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेणे, रखडलेल्या भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे, लघुलेखक (स्टेनोग्राफर) पद पुन्हा सुरू करणे तसेच कथित परीक्षा गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

मोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. त्यानंतर हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी शहरातील प्रमुख मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचले. तेथे सभेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शुभम ठाकरस, मनोज मुसळे, अभिषेक राऊत, राजश्री भगत, ॠषिकेश श्रीनाथ, अल्का वानखेडे आदींनी मनोगत व्यक्त केले. दिल्लीतील जंतर-मंतर येथे डॉ. सोनम वांगचुक व अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यात आला. विद्यार्थ्यांचा हा लढा कोणत्याही राजकीय पक्षाविरोधात नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या संरक्षणासाठी असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले. मोर्चानंतर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

### महाविकास आघाडीचा आंदोलनाला पाठिंबा

जंतर-मंतर येथे डॉ. सोनम वांगचुक व अभिजीत दिपके यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ वाशिममध्ये झालेल्या धरणे सत्याग्रहात महाविकास आघाडीतील पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजू चौधरी, दिलीपराव सरनाईक, मधुकर जुमडे, राजू वानखेडे, विदर्भवादी नेते दत्तराव धांडे, उज्वल देशमुख, गजानन गोटे, डॉ. शेख तसलीम, जगदीश मानवतकर यांच्यासह अनेकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# मानोऱ्यात सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ निघाली भव्य आक्रोश रॅली !



■ प्रतिनिधी | मानोरा ■

दिल्ली येथील जंतर-मंतर येथे उपोषणाला बसलेले लडाखचे ख्यातनाम शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या देशहिताच्या प्रमुख मागण्यांसाठी दि. २० जुलै २०२६ रोजी विद्यार्थी एकता संघ मानोरा यांच्यावतीने शहरात भव्य आक्रोश रॅली काढण्यात आली.

सकाळी ११.३० वाजता पंचायत समिती कार्यालयापासून सुरू झालेला हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. या मोर्चात मानोरा तालुक्यातील विविध समाजसेवा संघटना, राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ता, पत्रकार, विद्यार्थी, पालक वर्ग आणि नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्च्याच्या सांगतेनंतर तहसीलदार यांच्यामार्फत भारताच्या महामहीम राष्ट्रपतींना निवेदन सादर करण्यात आले.

आंदोलनादरम्यान केंद्र सरकार मुर्दाबाद, भाजपा मुर्दाबाद, भारत माता की जय, संविधान अमर रहे आणि या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय अशा जोरदार घोषणा देत आंदोलकांनी परिसर दणाणून सोडला व केंद्र सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध केला. नीट सारख्या उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रवेशासाठीच्या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेत झालेल्या पेपरफुटी प्रकरणाची नैतिक, प्रशासकीय व राजनैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्वरित राजीनामा द्यावा, लडाखला राज्याचा दर्जा देऊन सोनम वांगचूक यांच्या प्रदीर्घ आंदोलनाची दखल घेऊन लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा, लडाखचा समावेश घटनेच्या सहाव्या परिशिष्टात करावा.

केंद्र सरकारने या लोकशाही मार्गाने केलेल्या मागण्यांची त्वरित दखल न घेतल्यास १५ ऑगस्टपासून देशभर तीव्र आंदोलन व उपोषण छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले, युवा नेते ॲड ज्ञायक पाटणी, उबाठा शिवसेनेचे तालुका प्रमुख रविंद्र पवार, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष रामनाथ राठोड, बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोठे, वंचितचे तालुकाध्यक्ष विनोद राठोड, शरद हांडे, विजय चव्हाण, विजय पाटील, भावसिंग राठोड, ठाकुरसिंग चव्हाण, प्रकाश राठोड, बाळासाहेब डेरे, सुनील राठोड, गोपाल चव्हाण, शाम पवार, श्याम राठोड, विशाल राठोड, गजानन सोनटक्के, प्रफुल्ल इंगोले, सुशांत खडसे, अक्षय अंधारे, आवेश सिरमितिया, किसन वायले, चेतन पवार, बाळू राठोड, आनंदा खुळे, नितीन चगदळ, गणेश जामदार, महेश राठोड, हाफीज खान ,यांचेसह सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रास्ताविक शेख यांनी केले तर चिमुकला विद्यार्थी सुनील राठोड यांनी संविधानावर भाषण देऊन केंद्र सरकारवर टीका करत खरपूस समाचार घेतला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून रविंद्र पवार, बाळासाहेब डेरे, अभिजित राठोड आदींनी आपले मत व्यक्त केले. संचालन गोपाल चव्हाण यांनी केले तर आभार माणिक डेरे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

न्याय मागणीसाठी उपोषणाला जंतरमंतर बसलेले वांगचुक संपूर्ण देशाच्या युवा वर्गासाठी लढत आहेत. त्यामुळे त्यांना न्याय देण्यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री यांचा राजीनामा सरकारने घेतला पाहिजे, परंतु शासन डोळे मिटून तमाशा पाहत आहे. हे अत्यंत गंभीर बाब आहे.

**ॲड ज्ञायक पाटणी**

............

पेपर फुटी प्रकरण, वाढती महागाई याला देशातील जनता कंटाळली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी वर्गाने एकजुटीने सरकार विरोधात लढा देण्याची गरज आहे.

**अरविंद पाटील इंगोले**

# संजय देशमुख कृषी भूषण पुरस्काराने सन्मानित



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शिरपुर जैन येथील प्रगतशील शेतकरी संजय भिमराव देशमुख यांना कृषी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ,सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय कृषी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. शिरपूर येथील प्रगतशील शेतकरी संजय देशमुख यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य या संस्थेकडून शेती क्षेत्रामध्ये उल्लेखनीय व भरीव कामगिरी केल्याबद्दल कृषी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दिनांक ५ जुलै रोजी अहिल्यानगर येथे हा सन्मान सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. शेती क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा या संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय सन्मान करण्यात येत असतो. मालेगाव तालुक्यातील संजय देशमुख हे प्रगतशील शेतकरी आहेत. हळद ,कांदा बीज उत्पादन, शेडनेट हाऊसमध्ये भाजीपाला उत्पादन यामध्ये त्यांनी उच्चांकी उत्पादन घेतले आहे. मागच्या पंचवीस वर्षापासून ते शेती क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत.

# लोकशाहीचे धडे गिरवत बालविकास मंदिर प्राथमिक शाळा येथे विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक संपन्न

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथ शाळा मालेगाव येथे या शैक्षणीक सत्रातील शाळा प्रतिनिधी निवडणूक घेण्यात आली. सदर निवडणुकीसाठी केंद्राध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे, निवडणूक निर्णय अधिकारी नंदकिशोर भुसारी, मतदान अधिकारी, विठ्ठल कुटे,अनिलकुमार सरकटे यांनी जबाबदारी पार पडली.विद्यार्थ्यांना शालेय जीवनामध्ये लोकशाहीचे महत्त्व कळावे आणि मतदान प्रक्रियेची संपूर्णपणे माहिती होण्यासाठी शाळा स्तरावर ही निवडणूक घेण्यात आली या निवडणुकी मध्ये इच्छुक



उमेदवारांची निवड शाळेमधून करण्यात आली व विद्यार्थ्यांचा समावेश व मतपत्रिका वाटप करून विद्यार्थी निवडणूक घेण्यात आली. पुढील प्रमाणे शालेय मंत्रिमंडळ निवड करण्यात आली.शाळा स्तरावर शाळा मंत्रिमंडळ

क्र. पद नाव शाळा मुख्यमंत्री -आरव अमोल इंगळे,शाळा उपमुख्यमंत्री - गौरी कैलास काटेकर ,क्रीडामंत्री -शेख अफान शेख आसिफ,अर्थमंत्री- स्वरा नागसेन खिल्लारे,ऊर्जामंत्री - कार्तिक गणेश चोरमले ,शा.पो.आ.मंत्री- मोहम्मद असद मोहम्मद रफीक, स्वच्छता मंत्री- श्रावणी संतोष भालेराव,परिपाठ मंत्री- अक्षरा अविनाश घुगे, वृक्षसंवर्धन मंत्री- पारुल शालिक खिल्लारे,उपस्थिती ध्वजमंत्री- आयुष जीवन बेलारकर इत्यादी मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली. यानंतर शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही चे महत्त्व सविस्तरपणे पटवून दिले. निवडून आलेल्या मंत्र्यांना आपापली जबाबदारी समजून सांगितली .

# बुध्दिबळ दिन साजरा

**अकोला :** स्थानीय बिर्ला कॉलोनी येथील स्कुल ऑफ स्कॉलर्स मध्ये सोमवारी आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ दिन साजरा करण्यात आला.या वेळी शाळेच्या १९० मुला मुलीनी बुध्दिबळ खेळुन आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ दिवस साजरा केला.

# ब्राह्मण सभेच्या वतीने पर्यावरणप्रेमी अभिजीत जोशी यांचा सन्मान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक स्वागत लॉन येथे ब्राह्मण सभा, वाशिम यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी तसेच समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी स्थानिक एसएमसी इंग्लिश स्कूल, वाशिम येथील राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांचा पर्यावरण संरक्षण व संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अनिल कुलकर्णी होते. प्रमुख अतिथी म्हणून वाशिमचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हा सरकारी अभियोक्ता अभिजीत व्यवहारे, कर सल्लागार विनायक मुळी, ब्राह्मण सभेचे सचिव योगेश देशपांडे तसेच कार्यकारिणी सदस्य गजानन बावणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सत्कारानंतर उपस्थित मान्यवरांनी अभिजीत जोशी यांच्या पर्यावरण जनजागृती, वृक्षसंवर्धन आणि हरित उपक्रमांतील कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून ब्राह्मण समाजातील नागरिकांनीही त्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाला ब्राह्मण समाजातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचा तंबाखूमुक्तीचा संकल्प; वाळकी, दोडकी व गिव्हा शाळांमध्ये जनजागृती अभियान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करून शाळा परिसर तंबाखूमुक्त ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्या वतीने वाळकी, दोडकी आणि गिव्हा येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये 'तंबाखूमुक्त शाळा' मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी तसेच बाह्य संपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे जिल्हा सल्लागार डॉ. आदित्य पांढरकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत तंबाखूचे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम चित्रफिती, माहितीपूर्ण चित्रे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून समजावून सांगितले. तंबाखूमधील घातक रसायने, मुखाच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच निरोगी जीवनशैलीचे महत्त्व याबाबत त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे यांनी 'तंबाखू मुक्त शाळा' या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करत 'कोटपा २००३' (COTPA 2003) अंतर्गत तंबाखू विक्री व वापराबाबतच्या प्रमुख तरतुदी विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. व्यसनमुक्तीसाठी शासनाच्या १८००११२३५६ या मोफत टोल-फ्री क्रमांकाची माहिती देत गरजूंनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# अघोषित भारनियमनाने त्रस्त ग्रामस्थांची खा. देशमुखांकडे धाव



■ प्रतिनिधी | मानोरा ■

## कैलास पिंगाने यांचा पुढाकार; आठवडाभरापासून सकाळ-संध्याकाळ ४-४ तास वीज गायब

तालुक्यातील गव्हा सब स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कारखेडा, वरोली व विठोली या गावांमध्ये मागील आठवड्यापासून सकाळी व सायंकाळी ४-४ तास अघोषित भारनियमन सुरू आहे. यामुळे शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

या पार्श्वभूमीवर कारखेडा येथील युवा सामाजिक कार्यकर्ते कैलास पिंगाने यांनी वाशिम-यवतमाळचे खासदार संजय देशमुख यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. अघोषित भारनियमन तात्काळ बंद करून सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी विनंती त्यांनी केली. त्यांच्या या पुढाकारामुळे आता ही समस्या खासदारांपर्यंत पोहोचली आहे.

'पेरणीचा हंगाम असताना वीज नसल्याने शेतीची कामे खोळंबली आहेत. महावितरणने तातडीने दखल घेऊन दिलासा द्यावा,' अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. शेतकऱ्यांसह गर्भवती महिला, नवजात बालक प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी सह स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करणारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठे हाल या अघोषित भारनियमामुळे सोसावे लागत असल्याची अडचण पिंगाणे यांनी खासदार देशमुख यांच्या निदर्शनास आणून दिली.

महावितरण प्रशासनाला संबंधित समस्येविषयी सूचित करण्यात आले असून या संदर्भात योग्य ती दखल घेण्यात येणार असल्याचे खासदार देशमुख यांनी पिंगाणे यांना आश्वस्त केले आहे.

# NEET-TET पेपरफुटीविरोधात शिक्षण बचाव कृती समिती आक्रमक

## दोषींवर कठोर कारवाईची मागणी ; केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

देशभरात NEET आणि TET परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर गदा आली असून परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण बचाव कृती समिती, अकोलाने पेपरफुटी प्रकरणांची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच या प्रकरणांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणीही समितीने केली आहे.

समितीने नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक संवाद साधावा, अशी भूमिका समितीने मांडली.

समितीच्या निवेदनानुसार, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत आहे. परीक्षा रद्द होणे, पुनर्परीक्षेचा खर्च, मानसिक तणाव आणि शैक्षणिक नुकसान याचा मोठा फटका



विद्यार्थ्यांना बसत आहे. त्यामुळे पेपरफुटीच्या कटातील सूत्रधार, संबंधित अधिकारी, संस्था, परीक्षा एजन्सी तसेच जबाबदार कर्मचाऱ्यांवर कोणत्याही राजकीय किंवा प्रशासकीय दबावाशिवाय कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, पेपरफुटीत सहभागी आढळणाऱ्या परीक्षा केंद्रे, प्रिंटिंग प्रेस आणि संबंधित संस्थांची जबाबदारी निश्चित करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणीही करण्यात आली. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून परीक्षा केंद्रापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सुरक्षित आणि पारदर्शक व्यवस्था उभारण्याची गरज समितीने व्यक्त केली.

पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द होऊन पुनर्परीक्षा घ्यावी लागल्यास विद्यार्थ्यांकडून पुन्हा परीक्षा शुल्क आकारू नये. तसेच प्रभावित विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक नुकसानभरपाई द्यावी आणि अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने ठोस, प्रभावी आणि वेळबद्ध कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणीही समितीने केली. सोनम वांगचुक आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या आंदोलनाचा उल्लेख करत समितीने सरकारने त्यांच्या आरोग्याची, सन्मानाची आणि मानवी प्रतिष्ठेची काळजी घेत सकारात्मक संवादातून तोडगा काढावा, असेही नमूद केले आहे. या सर्व मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनामार्फत भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि संबंधित परीक्षा प्राधिकरणांकडे पाठविण्याची मागणी शिक्षण बचाव कृती समितीने केली आहे.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३४ ■ मंगळवार २१ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु




## एमबीएसाठी मुलीला पुण्यात सोडून परतणाऱ्या टिपले कुटुंबावर काळाचा घाला

# काळजी घे बाळा... म्हणत दिलेला निरोप ठरला अखेरचा

## समृद्धीवर एकाच कुटुंबातील तिघांसह सहा जणांचा मृत्यू

## इथेनॉल टँकरमुळे वळविलेल्या मार्गावर भीषण दुर्घटना



**विरुळ आकाजी जनमाध्यम:** एका मुलीच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने पाहत पुण्याला निघालेल्या कुटुंबाला नियतीने असा घाव घातला की संपूर्ण वर्धा जिल्हा सुन्न झाला. काळजी घे बाळा... मन लावून अभ्यास कर...असे प्रेमाने सांगत मुलगी तन्वीला एमबीएच्या शिक्षणासाठी पुण्यात सोडणारे आई-वडील आणि जुळी बहीण पुन्हा कधीच तिच्या भेटीला परतले नाहीत. समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताने टिपले कुटुंबाचा संसार अक्षरशः उद्ध्वस्त झाला.

सालोड (हिरापूर) येथील राजेश टिपले यांच्या जुळ्या मुलींपैकी तन्वी हिला पुण्यातील महाविद्यालयात एमबीएसाठी प्रवेश मिळाल्याने घरात आनंदाचे वातावरण होते. मुलीच्या शिक्षणाचा अभिमान आणि तिच्या भविष्यासाठी मोठी स्वप्ने उराशी बाळगत राजेश टिपले, पत्नी सुषमा, मुलगी जान्हवी आणि चालक अंकुश राऊत हे तन्वीला पुण्यात सोडण्यासाठी गेले होते. प्रवेशाची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मुलीला धीर देत कुटुंबीयांनी निरोप दिला आणि समृद्धी महामार्गाने परतीचा प्रवास सुरू केला. मात्र, नियतीने वेगळेच लिहून ठेवले होते.

सोमवारी पहाटे तीनच्या सुमारास समृद्धी महामार्गावरील चॅनेज क्रमांक ७९.८०० जवळ मुंबई कॉरिडोरवर इथेनॉलचा टँकर उलटल्याने मोठ्या प्रमाणात इथेनॉल रस्त्यावर सांडले. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून नागपूर कॉरिडोरवरील वाहतूक मुंबई कॉरिडोरवर वळविण्यात आली. टिपले कुटुंबाची कार क्रं. एम एच - ३२ वाय - १४३९ त्याच मार्गाने पुढे जात असताना भरधाव वेगातील यूपी-७१-सीटी-०६०२ क्रमांकाच्या मिरचीने भरलेल्या ट्रकने कारला जबर धडक दिली.

धडकेनंतर काही क्षणांतच आगीचा प्रचंड भडका उडाला. काही वेळातच ज्वाळांनी विक्राळ रूप धारण केले आणि कार काही क्षणांत आगीच्या विळख्यात सापडली. राजेश टिपले (५५), सुषमा टिपले (४८), जान्हवी टिपले (२१), चालक अंकुश राऊत (३३) सर्व राहणार सालोड (वर्धा) यांच्यासह ट्रकमधील संजय कुमार (३०) व समरजित पाल (२४) दोघेही राहणार उत्तर प्रदेश अशा सहा जणांचा होरपळून मृत्यू झाला.

एका मुलीच्या शिक्षणाचा आनंद साजरा करण्यासाठी पुण्यापर्यंत गेलेल्या कुटुंबाचा परतीचा प्रवासच अखेरचा ठरला. तन्वीला दिलेला तो प्रेमाचा निरोप आयुष्यभराची वेदना बनला. सालोड (हिरापूर) गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

**इथेनॉलचा टँकर पुण्याकडे**

छिंदवाडा येथून इथेनॉल घेऊन पुण्याकडे निघालेला टँकर समृद्धी महामार्गावर उलटल्याने मोठ्या प्रमाणात इथेनॉल रस्त्यावर सांडले. संभाव्य धोका लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने मार्ग बंद करून वाहतूक दुसऱ्या कॉरिडोरवर वळविली. त्याच वळविलेल्या मार्गावर हा भीषण अपघात घडला.

**कपड्याच्या व्यवसायावर संसार; गावात शोकसागर**

राजेश टिपले हे कपड्याच्या व्यवसायातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. पत्नी सुषमा गृहिणी होत्या. मेहनतीने संसार उभा करणाऱ्या या कुटुंबावर नियतीने एका क्षणात घाला घातला. समृद्धी महामार्गावरील या दुर्घटनेत एकाच गावातील चौघे आणि एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने सालोड (हिरापूर) गावात शोकसागर पसरला आहे. मुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी निघालेले आई-वडील कायमचे निघून गेले, या हळहळत्या शब्दांत गावकरी आपल्या भावना व्यक्त करत आहेत

**दुर्दैवाचा क्रूर खेळ ७०० किमीचा प्रवास सुखरूप... पण शेवटच्या ३० किमीवर काळाचा घाला**

पुण्यापर्यंतचा सुमारे ७०० किलोमीटरचा प्रवास कोणत्याही अडचणीशिवाय पूर्ण करणाऱ्या टिपले परिवारावर नियतीने अखेरच्या टप्प्यात घाला घातला. पुण्यावरून सालोडकडे (वर्धा) परत निघाल्यानंतर अवघे ३० किलोमीटर अंतर बाकी असताना त्यांच्या चारचाकी वाहनाचा भीषण अपघात झाला.

सुखरूप पूर्ण झालेल्या दीर्घ प्रवासानंतर शेवटच्या काही किलोमीटरवरच मृत्यूने गाठल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

कॅबिनमध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढले, पण जीव वाचला नाही समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातानंतर अग्निशमन विभागाचे कर्मचारी सौरभ खनके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. घटनास्थळी पोहोचल्यावर कारमधील चौघांचा आणि आयसरमधील वाहकाचा मृत्यू झाल्याचे दिसून आले. आयसरचा चालक गंभीर जखमी अवस्थेत कॅबिनमध्ये अडकला होता. त्याला मोठ्या प्रयत्नांनी बाहेर काढून तातडीने रुग्णवाहिकेत हलविण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. आयसरचा चालक आणि वाहक दोघेही आगीत गंभीररीत्या भाजले होते. या बचावकार्यात शुभम गोल्हर, पंकज खरताडे आणि दुर्गेश वानखेडे यांनीही मोलाची मदत केली.

### घटनास्थळी पोहोचले एसपी

अपघाताची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल आणि उपविभागीय पोलिस अधिकारी संगीता कारखेले यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करून बचावकार्याचा आढावा घेतला. या भीषण अपघातामुळे समृद्धी महामार्गावरील वाहतूक सुमारे दीड तास पूर्णपणे ठप्प झाली होती.

### इथेनॉल टँकर पलटल्याने मोठा अनर्थ टळला

उपप्रादेशिक परिवहन विभागाचे सहायक मोटर वाहन निरीक्षक अमर पखान यांनी सांगितले की, समृद्धी महामार्गावर वाहन तपासणी सुरू असताना रात्री साडेअकराच्या सुमारास जीजे-३९-एटी-३७१७ क्रमांकाचा इथेनॉल टँकर मुंबईच्या दिशेने जात असताना पलटी झाला. त्यांनी व चालक सुबोध तायडे यांनी तातडीने विभागाचे वाहन रस्त्यावर आडवे लावून इतर वाहनांना थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आणखी मोठी दुर्घटना टळली. त्यानंतर सुमारे ८०० मीटर अंतरावर भरधाव आयसरने कारला धडक दिल्याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या ट्रक आणि आयसरच्या मध्ये कार अडकल्याने कारमधील चौघांचा जागीच मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले.

### कारचा झाला अक्षरशः चुराडा

ट्रकच्या भीषण धडकेनंतर कार पूर्णपणे चिरडली गेली. आगीमुळे वाहन जळून खाक झाले. अग्निशमन दल आणि महामार्ग पोलिसांनी कटरच्या सहाय्याने कार फोडून मृतदेह बाहेर काढले. अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या मदतीने बाजूला हटविल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

### दोन शवविच्छेदन वर्धेत, चार पुलगावात

या अपघाताची नोंद पुलगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. राजेश टिपले आणि अंकुश राऊत यांच्या पार्थिवांचे शवविच्छेदन वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात, तर सुषमा टिपले, जान्हवी टिपले, संजय कुमार आणि समरजित पाल यांच्या पार्थिवांचे शवविच्छेदन पुलगाव ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले.

# एमडी तस्करांच्या पाच सदस्यीय टोळीवर मकोका ; २८ गुन्ह्यांतील मुख्य सप्लायर जेरबंद

## छत्रपती संभाजीनगरातून अटक ; हिंगणघाट पोलिसांची मोठी कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट पोलिसांनी एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत पाच सदस्यीय टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) लागू केला आहे. या प्रकरणातील दीर्घकाळापासून फरार असलेला मुख्य सप्लायर पंकज प्रभाकर साठवणे याला छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध नागपूर शहर, नागपूर ग्रामीण व चंद्रपूर जिल्ह्यात चोरी, घरफोडी, आर्म्स क्ट, अमली पदार्थांची तस्करी, दारूबंदी कायद्याचे उल्लंघन आदी गंभीर स्वरूपाचे तब्बल २८ गुन्हे दाखल आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, ३१ मे २०२६ रोजी हिंगणघाट पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या कारवाईत पियुष उर्फ मस्तान राजू मुसळे, निखिल मनोज रामनवार, जय वसंत चुटे, कार्तिक वसंत हमंद आणि रितिक उर्फ पकोडा प्रकाश खोडे यांना अटक करून त्यांच्या ताब्यातून ५४ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले होते. तपासादरम्यान ही टोळी संघटित गुन्हेगारीत सक्रिय असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर १३ जून रोजी या प्रकरणात मकोकाची भर घालण्यात आली.

यानंतर तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे फरार आरोपी पंकज साठवणे याचा शोध घेण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथून त्याला ताब्यात घेण्यात आले असून नागपूर शहर व नागपूर ग्रामीण पोलिसांनाही तो अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये हवा होता.

**सहा महिन्यांत २६ लाखांची उलाढाल**



तपासात आरोपी अमली पदार्थांच्या व्यवहारांसाठी इतर व्यक्तींची एटीएम कार्डे, बँक खाती आणि यूपीआय स्कॅनरचा वापर करत असल्याचे उघड झाले. कार्तिक हमंदच्या चौकशीत गेल्या सहा महिन्यांत अशा म्यूल खात्यांद्वारे सुमारे २६ लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचे समोर आले. त्यामुळे अनोळखी व्यक्तींना स्वतःचे एटीएम कार्ड, बँक खाते किंवा यूपीआय स्कॅनर वापरण्यास देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

**जिल्ह्यात प्रथमच एनडीपीएस आरोपींवर मकोका**

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अंतर्गत कलम ३(१)(ग), ३(१)(गग), ३(२) व ३(४) नुसार पियुष मुसळे, निखिल रामनवार, जय चुटे, कार्तिक हमंद आणि रितिक खोडे यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात प्रथमच एनडीपीएस कायद्यातील आरोपींवर मकोका लावण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांनी दिली.

# पुतळ्यावरून कानगावात तणाव पोलिसांच्या मध्यस्थीने वाद निवळला

## नागरिकांची मोठी गर्दी; प्रशासनाच्या सकारात्मक चर्चेनंतर परिस्थिती नियंत्रणात

**गाडेगाव जनमाध्यम :** कानगाव येथे पुतळ्याच्या मुद्द्यावरून सोमवारी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. पुतळा हटविण्याची चर्चा सुरू झाल्याची माहिती मिळताच गावातील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले आणि त्यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अल्लीपूर पोलिस, महसूल विभागाचे अधिकारी तसेच ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्रशासन आणि गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेनंतर वाद सामोपचाराने मिटला असून सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे.

माहितीनुसार, सुमारे दहा वर्षांपूर्वी कानगाव येथील विकास विद्यालयासमोरील जागेत संबंधित पुतळा उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, जागेसंदर्भातील प्रशासकीय अडचणी आणि स्थानिक मतभेद लक्षात घेऊन ग्रामपंचायत व महसूल प्रशासनाच्या मध्यस्थीने तो पुतळा ग्रामपंचायत कार्यालयात सुरक्षित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तेव्हापासून पुतळा ग्रामपंचायत कार्यालयात सुरक्षित आहे.

दरम्यान, पुतळ्याबाबत पुन्हा चर्चा सुरू झाल्याने गावात असंतोष पसरला. मोठ्या संख्येने नागरिक जमा झाल्याने काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली. यानंतर अल्लीपूर पोलिस ठाण्याच्या ठाणेदार संगिता हेलोंडे, त्यांचे सहकारी, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी, तलाठी तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. ज्येष्ठ नागरिक व प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा करून विषयाचे गांभीर्य लक्षात घेत सामोपचाराचा मार्ग स्वीकारण्यात आला. त्यामुळे संभाव्य वाद टळला आणि वातावरण शांत झाले. कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी पोलिसांनी दिवसभर सतर्कता बाळगली.

कानगाव येथे पुतळ्याच्या संदर्भात काही नागरिक एकत्र आले होते. गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी अल्लीपूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा केली. संवादातून प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्यात आला असून सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून परिस्थितीवर सातत्याने बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. – **संगीता हेलोंडे,** ठाणेदार, अल्लीपूर पोलिस ठाणे

# विद्यार्थ्यांच्या ठिय्या आंदोलनापुढे प्रशासन नमले

## आर्वी आगारातून उद्यापासून स्वतंत्र बसफेरीचे आश्वासन ; बाळा जगताप यांच्या नेतृत्वात आंदोलन

**आर्वी जनमाध्यम :** तालुक्यातील हराशी, पाचोड, बेलोरा तांडा, हिवरा व वाढोणा येथील विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा प्रश्न अखेर आंदोलनामुळे ऐरणीवर आला. विद्यार्थ्यांना बसमध्ये जागा मिळत नसल्याने आणि शाळेत वेळेवर पोहोचण्यात अडचणी येत असल्याच्या निषेधार्थ सोमवारी आर्वी आगारात बाळा जगताप यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी ठिय्या आंदोलन केले. दोन ते तीन तास चाललेल्या आंदोलनानंतर आगार प्रशासनाने विद्यार्थ्यांसाठी उद्यापासून स्वतंत्र बसफेरी सुरू करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.



हराशी, पाचोड, बेलोरा तांडा, हिवरा व वाढोणा या गावांमधून धावणाऱ्या एसटी बसमध्ये दररोज ७० ते ८० विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिक प्रवास करतात. त्यामुळे एकाच बसमध्ये प्रचंड गर्दी होत असून अनेक विद्यार्थ्यांना उभे राहून प्रवास करावा लागतो, तर काहींची बसही चुकते. या पार्श्वभूमीवर शाळेच्या वेळेनुसार सकाळी व दुपारी स्वतंत्र बसफेरी सुरू करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आंदोलनाची माहिती मिळताच आगार व्यवस्थापकांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. मागण्या रास्त असल्याचे मान्य करत उद्यापासून विद्यार्थ्यांसाठी नवीन बसफेरी सुरू करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

यावेळी बाळा जगताप यांनी, प्रशासनाने दिलेला शब्द पाळला नाही तर विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी यापेक्षाही तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा दिला. आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने बसस्थानक परिसरात काही काळ गजबजलेले वातावरण निर्माण झाले होते.


## हिंगणघाटातूनही सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा

**हिंगणघाट जनमाध्यम :** सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी आणि नागरिकांच्या उपस्थितीत आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अतुल वांदिले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. यानंतर आंदोलनकर्त्यांनी शहरातून मोर्चा काढत तहसील कार्यालयावर धडक दिली आणि विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर केले. विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला जिल्हाभरातून वाढता पाठिंबा मिळत असल्याचे यावेळी आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीच्या अपहरण व अत्याचारप्रकरणी आरोपीला २० वर्षांचा सश्रम कारावास

**पुलगाव जनमाध्यम :** अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी विजय सूर्यवंशी याला वर्धा येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. पोक्सो कायद्यांतर्गत दिलेला हा निकाल अल्पवयीनांवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



पुलगाव पोलीस ठाण्यात २०२४ मध्ये या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. फिर्यादीची १६ वर्षीय मुलगी ७ एप्रिल २०२४ रोजी रात्री घरात झोपलेली असताना दुसऱ्या दिवशी सकाळी बेपत्ता आढळली. कुटुंबीयांनी शोध घेतल्यानंतर शेजारी राहणाऱ्या विजय सूर्यवंशी याने तिचे अपहरण केल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी अपहरण, बलात्कार, पोक्सो कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली.

जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक ३, वर्धा येथे झालेल्या सुनावणीत सरकारी पक्षाने भक्कम पुरावे व साक्षीदारांच्या साक्षी सादर केल्या. त्यानंतर न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(एन) व पोक्सो कायद्यांतर्गत २० वर्षांचा सश्रम कारावास व ५० हजार रुपयांचा दंड, तसेच कलम ३६३ अंतर्गत चार वर्षांचा सश्रम कारावास व दोन हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस अधिकारी राहुल चव्हाण यांनी केला. विद्यमान उपविभागीय पोलीस अधिकारी वंदना कारखेले, सरकारी अभियोक्ता प्रसाद सोईतकर आणि कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अनंता रिंगणे यांनी खटल्यात प्रभावी बाजू मांडली. पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि पुलगाव पोलीस ठाण्याच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.


## जाहीर नोटीस

सर्व जनतेस जाहीर करण्यास येते की सौ मनीषा अभ्युदय मेघे व अभ्युदय दिनकरराव मेघे या दोघांनी मिळून मौजा अंबाझरी येथील सिटी सर्वे नंबर ८१२ सिटी नंबर ५१ घर क्रमांक ३०२ अपूर्वा टॉवर गांधीनगर नागपूर, यांची खरेदी दिनांक २५ /४ / २००३ ला केली,

**प्रॉपर्टी क्रमांक २**- मौजा सावंगी मेघे, मौजा नंबर १३८ प. ह. न. २२ येथील भूखंड क्रमांक २८ ही खरेदी दिनांक २२ /७/ २००८ ला करण्यात आली,

**प्रॉपर्टी क्रमांक ३**- सौ, मनीषा अभ्भुदय मेघे यांच्या मालकीचे मौजा सावंगी मेघे. येथील भूखंड क्रमांक ४०९ अ. वरील दत्तात्रय संकुलातील गाळे क्रं. ४१ अ व ४१ ब यांची खरेदी ५/१०/ २००५ रोजी करण्यात आली होती,

**प्रॉपर्टी क्रमांक ४**- सौ. मनीषा अभ्युदय मेघे, सौ माधुरी रवी मेघे, सौ अर्पणा चंद्रकांत तिवारी, यांच्या मालकीचा मौजा सावंगी मेघे मौजा नंबर १३८ प. ह. न. २२ येथील भूखंड क्रमांक ३१ ही खरेदी दिनांक १२/०७/२०१० ला करण्यात आली, वरील सर्व मालमत्तेची मूळ कागदपत्रे एका फाईल मध्ये ठेवली होती, व ती फाईल दिनांक १० जून २०२६ रोजी रामनगर येथील रस्त्यामध्ये पडून गहाळ झाली, तरी सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की कोणालाही ही कागदपत्रे मिळाल्यास मोबाईल नंबर वर संपर्क करावा,

**सौ. मनीषा अभ्युदय मेघे**
**मोबाईल : ९९२३६००५१७**


paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ‘अपार आयडी’ इतर ठिकाणी जोडण्यासाठी संमती अनिवार्य

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) अपार आयडीशी (अपारआयडी) संबंधित प्रकरणावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, न्यायालय या प्रकरणी योग्य तो आदेश जारी करेल. सुनावणीदरम्यान न्यायालयाने संकेत दिले की अपार आयडीशी संबंधित डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेच्या (प्रायव्हसी) चिंतांची चौकशी करण्याचे निर्देश देण्यास न्यायालय तयार आहे. या संपूर्ण प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई)कडून उत्तर मागवले आहे.

अपार आयडी इतर ओळखपत्रांशी जोडणे आणि त्याची कथित अनिवार्यता याला आव्हान देणा-या याचिकेवरील सुनावणीदरम्यान हा विषय समोर आला. कोणत्याही स्पष्ट आणि स्वतंत्र संमतीशिवाय अपार आयडी बनवण्यासाठी दबाव आणणे, हा नागरिकांच्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन ठरू शकतो, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला. ही याचिका विद्यार्थ्यांच्या चार पालकांनी दाखल केली आहे.याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ इंदिरा जयसिंग यांनी युक्तिवाद केला की जेथे गोपनीयतेचा अधिकार आणि डेटा सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो, तिथे एका अ-संवैधानिक योजनेअंतर्गत



मुलांना नोंदणी करणे सक्तीचे केले जात आहे. त्यांनी २०१९ च्या प्रसिद्ध पुट्टस्वामी निकालाचा हवाला दिला, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की मुलांना आधार क्रमांक काढण्यासाठी सक्ती केली जाउ शकत नाही. सरकार अपारला ऐच्छिक योजना म्हणत असले, तरी हा आयडी आधारशी जोडलेला आहे. परिणामी, अपार आयडी मिळवण्यासाठी विद्यार्थ्याकडे आधार असणे व्यावहारिकदृष्ट्या अनिवार्य बनले आहे. परीक्षांना बसण्यासाठी अपार आयडी बंधनकारक केला जात असल्याने, ही योजना ऐच्छिक नसून छुप्या पद्धतीने सक्तीची केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. शिक्षणाचा अधिकार हा घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे परीक्षेला बसण्यासाठी मुलाला आधार आणि अपार आयडी मागणे हे संविधानाच्या विरोधात आहे असे जयसिंग यांनी नमूद केले.

**प्रत्येक गोष्टीकडे संशयाने पाहू नका : सरन्यायाधीश**

याचिकाकर्त्यांच्या सर्व युक्तिवादांशी पूर्णपणे सहमत न होता सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, देशातील प्रत्येक गोष्टीकडे आपण संशयाच्या नजरेने पाहायला नको. हे एक स्वागतार्ह पाउल आहे. या योजनेमागील मुख्य उद्देश प्रत्येक विद्यार्थ्याला एक युनिक आयडी देणे हा आहे. सीबीएसई मुख्यालयाकडे प्रत्येक विद्यार्थी काय शिकत आहे याची स्पष्ट माहिती असावी, जेणेकरून शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर राखण्यास आणि अभ्यासक्रमाची सुरळीत अंमलबजावणी करण्यास मदत होईल असे सीजेआय यांनी स्पष्ट केले. यावर इंदिरा जयसिंग यांनी मान्य केले की, योजनेचा उद्देश चांगला असू शकतो, परंतु तो साध्य करण्याचे मार्ग वैध आणि प्रमाणबद्ध असले पाहिजेत. कागदावर ही योजना ऐच्छिक असली, तरी जमिनी पातळीवर ती सक्तीची म्हणून राबवली जात आहे, हा मुख्य मुद्दा त्यांनी मांडला.

## ‘वंदे भारत’ची कामे ठप्प

**नवी दिल्ली :** कामाख्या वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू झाली, याला अनेक महिने लोटले. यानंतर पुढील स्लीपर वंदे भारत ट्रेन अद्यापही प्रवाशांच्या सेवेत आलेली नाही. वंदे भारत स्लीपर ट्रेनचा एक नवा कोरा रेक तयार आहे, परंतु, त्याला अद्याप मंजुरी मिळालेली नाही, अशी माहिती मिळाली आहे. यातच आता १२० वंदे भारत स्लीपर ट्रेनचे काम थांबल्याचे समजते. याबाबत एक महत्त्वाचे कारण समोर आले असून भारतीय रेल्वेकडे काय पर्याय आहेत, यावर चर्चा सुरू झाल्याचे म्हटले जात आहे. २०२३ मध्ये एकूण २०० वंदे भारत स्लीपर ट्रेन्ससाठी निविदा काढण्यात आल्या होत्या, त्यापैकी ८० ट्रेन्स बनवण्याची जबाबदारी टिटागड रेल सोल्युशन्स आणि बीएचईएल यांच्या संयुक्त उपक्रमाला देण्यात आली.



तसेच भारत-रशिया भागीदारी असलेल्या किनेट रेल्वे सोल्युशन्स कंपनीद्वारे बांधण्यात येत असलेल्या १२० स्लीपर ट्रेन येण्यासाठी बराच वेळ लागणार आहे. ट्रेनचे डिझाइन अद्याप अंतिम झालेले नाही. किनेटला डिझाइन देण्यासाठी एका जर्मन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली होती, परंतु त्याने अद्याप मंजूर केलेले अंतिम डिझाइन कंपनीकडे सादर केलेले नाही. कंपनीने म्हटले आहे की या स्लीपर ट्रेनचा पहिला प्रोटोटाइप २०२६ च्या अखेरीस तयार होईल, म्हणजेच हा प्रकल्प नियोजित वेळेपेक्षा दोन वर्षांहून अधिक मागे आहे असे सांगितले जात आहे. दरम्यान, ट्रेनच्या अभियांत्रिकी आणि डिझाइनच्या या मोठ्या प्रकल्पात शंभरहून अधिक पुरवठादार एकत्र काम करत आहेत. सर्व पुरवठादार ठरलेल्या योजनेनुसार काम करत आहेत आणि वंदे भारत स्लीपर ट्रेनची रचना व जुळणी स्वतः किनेटनेच केली आहे, ज्यामुळे हा प्रकल्प योग्य दिशेने पुढे जात आहे असा दावा कंपनीकडून करण्यात आला आहे. त्यामुळेच भारतीय रेल्वे आता हे आधुनिक स्लीपर वंदे भारत ट्रेनचे कोच वेगाने तयार करण्यासाठी स्वतःच्या कारखान्यांचा वापर करत आहे अशी माहिती एका अधिका-यांनी दिली आहे.

# आता शिक्षकांच्या कामावर व्हाट्सअॅपवरून नजर! प्रत्येक जिल्ह्यात ‘विषय समित्या’

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षण विभागाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता जिल्हा स्तरावर विषयनिहाय शिक्षकांच्या विषय समित्या स्थापन करण्याचा आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डा. महेश पालकर यांनी दिला आहे.शिक्षण आयुक्तांनी ८ जुलै २०२६ रोजी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये अद्याप अशा समित्या स्थापन झालेल्या नाहीत, तेथे त्या तात्काळ स्थापन करण्याचे आदेश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.परख सर्वेक्षणानुसार इयत्ता सहावी आणि नववीतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी विषय समित्यांनी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश देण्यात आले



आहेत. स्थापन करण्यात आलेल्या सर्व विषय समित्यांचा अहवाल संबंधित कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. कामात तत्परता आणि सुसूत्रता यावी यासाठी प्रत्येक विषय समितीचा एक स्वतंत्र व्हाट्सअॅप ग्रुप तयार केला जाणार आहे. या ग्रुपमध्ये संबंधित अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, माध्यमिक विभागातील शिक्षण विस्तार अधिकारी आणि विषय समितीचे सदस्य सहभागी असतील. जिल्हास्तरासोबतच राज्यस्तरीय व्हाट्सअॅप ग्रुपही तयार केला जाणार असून, यात प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक विषयातील उत्कृष्ट, निवडक आणि नवोपक्रमशील पाच शिक्षकांचा समावेश केला जाईल.

**अशा प्रकारे काम करतील विषय समित्या-** या समित्यांमध्ये कृतिशील, नवोपक्रमशील आणि समर्पित शिक्षकांचा समावेश करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या विषय समित्यांमार्फत विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवणे, अध्ययनस्तर चाचण्यांचे नियोजन करणे, अध्यापन साहित्य व शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाचे विविध उपक्रम राबवण्याची जबाबदारी या समित्यांवर असणार आहे.

# आता इथेनॉलवर अन्न शिजणार, एलपीजीची सुट्टी होणार!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पेट्रोलनंतर आता इथेनालचा थेट स्वयंपाक घरातही पोहचण्याची शक्यता आहे. देशाचे एलपीजीवरील अवलंबित्व आणि एलपीजी आयातीवर होणारा कोट्यवधींचा खर्च कमी करण्यासाठी, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय एका विशेष धोरणावर काम करत असल्याची माहिती आहे. हे धोरणावर सप्टेंबरपर्यंत शिक्कामोर्तब होउ शते. असे झाल्यास स्वयंपाक घरांमध्ये इथेनाल लवकरच एलपीजीची जागा घेउ शकते. यासंदर्भात ईटीने दिलेल्या एका वृत्तानुसार, या प्रस्तावित धोरणावर इंधन पुरवठादारांचे प्रतिनिधित्व करणा-या उद्योग संघटना सरकारसोबत चर्चा करत आहेत. महत्वाचे म्हणजे, सध्या सरकारी तेल कंपन्या



एथॅनालवर चालणा-या शेगड्यांसंदर्भात संशोधन आणि त्यांच्या चाचण्या घेत आहेत. इथेनालवर चालणा-या शेगड्यांचा वापर वाढवण्यासाठी केंद्र सरकार सबसिडी योजनाही आणू शकते. तसेच, इथेनालवर चालणारी शेगडी खरेदी करण्यासाठी एकरकमी आर्थिक मदत अथवा इथेनाल इंधनावरच थेट सबसिडी दिली जाउ शकते. याशिवाय, ग्राहकांना सोप्या पद्धतीने एथॅनाल मिळावे यासाठी पेट्रोल पंपांवर 'एथॅनाल एटीएम' सुरू करण्याचेही नियोजित आहे.भारताची वार्षिक इथेनाल उत्पादन क्षमता २० अब्ज लिटरहून अधिक झाली आहे.

## श्रीकृष्ण जन्मस्थान मंदिरात देणगी मोजणी पारदर्शक


**मथुरा :** अयोध्येतील राम मंदिर आणि बद्रीनाथ मंदिरातील देणगी घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर मथुरेतील श्रीकृष्ण जन्मस्थान मंदिरात देणगी मोजणीची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता मंदिर परिसरातील दुकानदारांनाही देणगीपेट्या उघडणे आणि त्यातील रकमेची मोजणी करताना निरीक्षक म्हणून उपस्थित राहण्याची संधी दिली जाणार आहे. श्रीकृष्ण जन्मस्थान सेवा संस्थानचे सचिव कपिल शर्मा म्हणाले की देणगी मोजणीची प्रक्रिया अधिक



पारदर्शक व्हावी, यासाठी स्वतंत्र निरीक्षकांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. मंदिर परिसरात व्यवसाय करणा-या दुकानदारांपेक्षा यासाठी अधिक योग्य व्यवस्था असू शकत नाही. मंदिरातील देणगीपेट्यांची मोजणी रेड झोन म्हणून घोषित करण्यात आलेल्या अतिसुरक्षित भागात केली जाते. मंदिर परिसरात सुमारे ३० दुकाने असून सर्व दुकानदारांची पोलिसांकडून पडताळणी करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना रेड झोनमध्ये प्रवेश देण्यासाठी अतिरिक्त परवानग्या किंवा सुरक्षा प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज भासणार नाही असे शर्मा यांनी सांगितले. तसेच बाहेरील व्यक्तींना निरीक्षक म्हणून सहभागी करून घेतल्यास अनेक कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे मंदिर परिसरातील पडताळणी झालेल्या दुकानदारांचा समावेश करणे अधिक सोयीचे ठरणार आहे असेही शर्मा यांनी यावेळी सांगितले. या नव्या व्यवस्थेनुसार दर महिन्याला देणगी मोजणीच्या वेळी एक किंवा दोन दुकानदार निरीक्षक म्हणून उपस्थित राहतील.

## अँडी बर्नहॅम ब्रिटनचे नवे पंतप्रधान

**लंडन :** ब्रिटनमध्ये सोमवारी अँडी बर्नहॅम यांनी नवीन पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. गेल्या १० वर्षांत ते ब्रिटनचे सातवे पंतप्रधान बनले आहेत. त्यांनी देशाच्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेत मोठ्या बदलांचे आश्वासन दिले आहे आणि म्हटले आहे की, त्यांचे सरकार लोकांच्या दैनंदिन समस्यांवर, जसे की महागाई आणि खराब सार्वजनिक सेवांवर, सर्वाधिक लक्ष केंद्रित करेल.माजी पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी १० डाउनिंग स्ट्रीटबाहेर निरोप समारंभाचे भाषण दिल्यानंतर किंग चार्ल्स यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द केला. त्यानंतर ग्रेटर मँचेस्टरचे माजी महापौर अँडी बर्नहॅम यांनी किंग यांची भेट घेतली आणि औपचारिकपणे



पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. ५६ वर्षीय बर्नहॅम अशा वेळी सत्तेत आले आहेत, जेव्हा ब्रिटन अनेक आव्हानांशी झुंजत आहे. यामध्ये मंद आर्थिक वाढ, खराब कामगिरी करणा-या सार्वजनिक सेवा आणि मूलभूत सुविधांच्या समस्या प्रमुख आहेत. सरकारचा कार्यभार सांभाळण्यासोबतच त्यांना आपल्या नवीन मंत्रिमंडळाचीही स्थापना करायची आहे. पंतप्रधान झाल्यावर बर्नहॅमसमोरचे पहिले मोठे आव्हान आपल्या मंत्रिमंडळाची स्थापना करणे हे असेल. विशेषतः अर्थमंर्त्यांच्या नियुक्तीकडे सर्वांचे लक्ष असेल, कारण यापूर्वीही पंतप्रधान आणि अर्थमंत्री यांच्यातील मतभेद अनेक सरकारांसाठी अडचणीचे ठरले आहेत.

# दिल्लीतील आंदोलकांवरील लाठीचार्जवर राज्यात राजकीय वाद

मुंबई/प्रतिनिधी- जंतर-मंतर येथे आंदोलन करणा-या विद्यार्थी, पालक आणि इतर आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याच्या वृत्तानंतर देशातील राजकारण तापले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा अन्यथा हे आंदोलन सरकारच्या शेवटाची सुरुवात ठरेल असे म्हणत राष्ट्रवादी शरदपवार गट आक्रमक झाला आहे.जंतर-मंतर येथे सोमवारी कॉकरोच जनता पार्टीच्या निदर्शकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. यात अनेक जण जखमी झाले असून काहींच्या डोक्याला दुखापत झाली आहे. जंतर-मंतर परिसरातील परिस्थिती आणि आंदोलनादरम्यान नेमके काय घडले याबाबत वेगवेगळे दावे समोर येत असून, या प्रकरणावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र झाले आहेत.

**इंग्रजांनाही लाजवणारे सरकार :रोहित पवार**

रोहित पवार यांनी सोशल मीडियावर सरकारवर तीव्र शब्दांत निशाणा साधला. शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणा-या आंदोलकांवर ब्रिटिश राजवटीत जसा लाठीचार्ज केला जात होता, तसाच प्रकार आता घडत असल्याचा आरोप त्यांनी केला. दिल्लीतील संसदेकडे निघालेला मोर्चा दडपण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अन्यथा हे आंदोलन सरकारच्या शेवटाची सुरुवात ठरेल, असा इशाराही रोहित पवार यांनी दिला.

**संवादाऐवजी बळाचा वापर अस्वीकार्य : सुप्रिया सुळे**

खासदार सुप्रिया सुळे यांनी जंतर-मंतरवरील आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याच्या वृत्ताचा तीव्र निषेध केला. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण मार्गाने आपली भूमिका मांडण्याचा घटनात्मक अधिकार असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी दीर्घकाळ शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू ठेवले असून त्यांच्या मागण्यांवर सरकारने संवादातून तोडगा काढायला हवा होता, असे त्या म्हणाल्या. आंदोलनकर्त्यांचा आवाज दडपण्यासाठी बळाचा वापर करणे दुर्दैवी आणि अस्वीकार्य असल्याचेही त्यांनी म्हटले.



**विद्यार्थी आता शांत बसणार नाहीत : जितेंद्र आव्हाड**

यावेळी राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड देखील या आंदोलनाला उपस्थित होते. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आंदोलन हातात घेतले आहे. जसे मी इतिहास सांगितला की १९७३ साली बिहारमध्ये आणि गुजरातमध्ये विद्यार्थ्यांनी आंदोलन केले, ते आंदोलन पेटले आणि इंदिरा गांधी यांचा पराभव झाला. तुम्ही या देशात विद्यार्थ्यांना दाबायला जाउ नका. भगतसिंह, सुखदेव, हे सगळे लोक कालेजमध्ये होते. विद्यार्थ्यांच्या डोक्यात आग पसरली की ते शांत बसणार नाहीत.

**विद्यार्थ्यांविरोधात बळाचा वापर करणारे सरकार भ्याड :** आदित्य ठाकरे

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनीही सोशल मीडियावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. परीक्षा पेपरफुटीप्रकरणी न्यायाची मागणी करणा-या विद्यार्थ्यांवर आणि त्यांच्या समर्थनार्थ उभ्या राहिलेल्या नागरिकांवर बळाचा वापर करणे हे भ्याड सरकारचे लक्षण असल्याची टीका त्यांनी केली. खासदार संजय राउत यांनीही सरकारवर निशाणा साधत, सरकार विद्यार्थ्यांना घाबरले आहे, अशी टीका केली. संसदेवरील मोर्चाला परवानगी नाकारल्याबद्दल त्यांनी सरकारवर हल्लाबोल करत विविध केंद्रीय संस्थांवरही आरोप केले.

**दिल्ली पोलिसांचे स्पष्टीकरण**

दरम्यान, या सर्व घडामोडींवर दिल्ली पोलिसांनी अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे. काही माध्यमांमध्ये जंतर-मंतर येथे पोलिसांकडून हिंसाचार किंवा आंदोलकांना ताब्यात घेतल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या असल्या, तरी अशा कोणत्याही घटना घडलेल्या नाहीत, असे पोलिसांनी म्हटले आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आंदोलन व्यावसायिक पद्धतीने हाताळले जात असून नागरिकांनी अफवा किंवा दिशाभूल करणा-या माहितीवर विश्वास ठेवू नये. तसेच परिसरात शांतता आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही दिल्ली पोलिसांनी केले आहे.

**हुकूमशाहीची नांदी : प्रकाश आंबेडकर**

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, शांततापूर्ण आंदोलन करणा-या नागरिकांवर बळाचा वापर केला जात असेल आणि मतभेद दडपण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो लोकशाही नव्हे तर हुकूमशाहीचा मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंर्त्य, समता आणि बंधुता या मूल्यांशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही, असे स्पष्टपणे सांगितले होते. सत्तेला प्रश्न विचारणे, उत्तरदायित्वाची मागणी करणे आणि शांततेच्या मार्गाने मतभेद व्यक्त करणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाहीतील मूलभूत अधिकार आहे. लोकशाहीची खरी परीक्षा सहमतीमध्ये नसून मतभेदांना सरकार कशा पद्धतीने प्रतिसाद देते, यावर ठरत असते, असेही त्यांनी म्हटले.

# नीट आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत जमावबंदी, पोलिसांचा मोठा निर्णय

**मुंबई / प्रतिनिधी-** दिल्लीत नीट पेपरफुटीविरोधात सुरू असलेल्या तीव्र आंदोलनाचे पडसाद आता मुंबईत उमटण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने अत्यंत मोठा निर्णय घेतला आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून आगामी २३ जुलै ते ६ ऑगस्ट या काळात मुंबई शहरात ५ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

मुंबई पोलिसांनी जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशानुसार, २३ जुलै ते ६ ऑगस्ट दरम्यान मुंबई शहरात ५ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. या काळात कोणत्याही प्रकारची आंदोलने, मोर्चे, निदर्शने किंवा सभा घेण्यास सक्त मनाई असेल. तसेच, शांतता भंग होउ नये यासाठी लाउडस्पीकरच्या वापरावरही पोलिसांनी कडक निर्बंध लादले आहेत.दिल्लीतील नीट पेपरफुटीचा मुद्दा सध्या देशभरात चांगलाच गाजत आहे. तिथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आणि विविध संघटनांच्या आंदोलनांमुळे वातावरण अत्यंत संवेदनशील बनले आहे. मुंबईतही याचे पडसाद उमटून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउ नये, तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मुंबई पोलिसांनी आधीच खबरदारी घेत हे प्रतिबंधात्मक पाउल उचलले आहे. या आदेशाचे उल्लंघन करणा-यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

**खालील ठिकाणी या नियमातून सूट मिळेल-** लग्न आणि अंत्यविधीः विवाहसोहळे आणि स्मशानभूमीकडे जाणा-या अंत्ययात्रांना यातून पूर्ण सूट असेल. शाळा-महाविद्यालयेः शैक्षणिक कार्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये जमणा-या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना कोणतीही अडचण नसेल.मनोरंजनः चित्रपटगृहे, नाट्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या ठिकाणी चित्रपट वा नाटक पाहण्यासाठी होणा-या गर्दीवर निर्बंध नसतील.कारखाने, दुकाने, बाजारपेठांमधील दैनंदिन व्यापार, सरकारी कार्यालये, न्यायालये तसेच कंपन्यांच्या आणि सोसायट्यांच्या अधिकृत बैठकांना यातून वगळण्यात आले आहे.

**उल्लंघन केल्यास कडक कारवाईचा इशारा-** हे आदेश संपूर्ण बृहन्मुंबई क्षेत्रासाठी लागू असून, सार्वजनिक ठिकाणी आणि सरकारी कार्यालयांमध्ये ते ठळकपणे लावले जाणार आहेत. याशिवाय लाउडस्पीकर आणि इतर माध्यमांतून याची घोषणाही केली जाईल. आदेशाची मुदत संपल्यानंतरही, या काळात जर कोणी या नियमांचे उल्लंघन केले असेल, तर त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई आणि दंडात्मक शिक्षा केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस प्रशासनाने या पत्राद्वारे दिला आहे.

# केंद्रीय शिक्षणमंत्री यांच्या राजीनाम्यासाठी ५०० नागरिकांचे अन्नत्याग आंदोलन

**परभणी :** देशातील शिक्षण व्यवस्थेतील गंभीर प्रश्न, विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान तसेच उत्तरदायित्व निश्चित करण्याच्या मागणीसाठी परभणीत सोमवार, दि. २० जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत ४०० ते ५०० नागरिकांचे एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन केले.

दिल्लीतील जंतरमंतर येथे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सोनम वांगचूक, अभिजित दिपके, साथी नेहा आणि अन्य विद्यार्थी आंदोलकांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ हे आंदोलन आयोजित करण्यात येत असल्याची माहिती संयोजन समितीने दिली आहे.



आंदोलनकर्त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरप्रकारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी केली आहे. लोकशाही पद्धतीने आंदोलन करणा-या नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंर्त्याचा सन्मान राखून संविधानिक मूल्यांचे संरक्षण व्हावे, अशीही त्यांची भूमिका आहे.

वाढती महागाई, बेरोजगारी आणि सर्वसामान्य नागरिकांसमोरील विविध प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर लोकशाही मार्गाने आवाज बुलंद करण्यासाठी हे आंदोलन होत असल्याचे संयोजन समितीने नमूद केले आहे. या उपोषणात ४०० ते ५०० नागरिक, विद्यार्थी, युवक, महिला, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, लोकशाहीवादी चळवळीतील कार्यकर्ते तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी सहभागी होते.

# नागपूरात मोदींविरोधात घोषणा; तरूणी आक्रमक



**नागपूर/प्रतिनिधी :** सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर हे आंदोलन रविवारी अधिकच चिघळले. सोमवारी देशभर आंदोलन सुरू असले तरी भाजप किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून याची अद्याप दखल घेण्यात आलेली नाही. अशातच नागपूरच्या संविधान चौकात लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत हजारोंच्या संख्येने सहभागी झालेल्या नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संघाच्या भूमीतून मोदींविरोधात घोषणा दिल्या. भर पावसात झालेल्या या आंदोलनाने संविधान चौक दणाणून सोडला.

**मोदींविरोधात कोणत्या घोषणा देण्यात आल्या?**

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या हटवण्याच्या निषेधार्थ तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या सीजेपीच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत सोमवारी नागपुरातील संविधान चौकात शेकडो युवकांनी आंदोलन केले. विद्यार्थी, युवक, कुटुंबीय, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनीही या आंदोलनात सहभाग घेत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

आंदोलनादरम्यान मोदी तेरी तानाशाही नहीं चलेगी, धर्मेंद्र प्रधान इस्तीफा दो, वंदे मातरम, आवाज दो हम एक हैं तसेच नरेंद्र मोदी वीक हैं, उसका पेपर लीक हैं अशा घोषणा देण्यात आल्या. आंदोलकांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका करत शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांवर संताप व्यक्त केला.

आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार

सोनम वांगचुक यांना हटवण्याचा निर्णय अन्यायकारक असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांच्या आवाजाची दखल घेतलेली नसल्याबद्दलही आंदोलनकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराचाही निषेध यावेळी करण्यात आला. विद्यार्थ्यांवरील कारवाई लोकशाहीविरोधी असल्याचो आंदोलकांनी सांगितले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा युवकांनी यावेळी दिला. आंदोलनादरम्यान पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पावसाळी अधिवेशन

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे. १३ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या अधिवेशनात महिला आरक्षण व मतदारसंघ पुनर्रचना विधेयक पुन्हा सरकार आणेल का, याविषयी मोठी उत्सुकता आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर विरोधी पक्ष कमजोर झाला आहे. तृणमूल काँग्रेस, उबाठा शिवसेना पक्षात मोठी फूट पडली आहे. सपा व द्रमुक या दोन पक्षांच्या भवितव्याबाबत वेगवेगळे तर्क मांडले जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील एनडीए सरकार भक्कम आहे व दिवसेंदिवस अधिक होत मजबूत आहे. नीट व सीबीएसई परीक्षा पेपरफुटी, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतरमंतरवर चाललेले आंदोलन, सोनम वांगचुक यांचे उपोषण, अयोध्येतील राम मंदिरातील दानपेटीत झालेली चोरी, ई-२० पेट्रोलमुळे मोटारचालकांना झालेली डोकेदुखी, महागाई, बेरोजगारी, मतदारयादी सुधारणा, इंधन दरवाढ अशा अनेक विषयांवर विरोधी पक्षाला आवाज उठविण्याची संधी मिळू शकते. पण, विरोधी पक्षात विशेषतः ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसमधील लोकसभेतील २२ खासदारांनी बंडाचा झेंडा फडकवून एका छोट्या प्रादेशिक पक्षात प्रवेश केल्यामुळे आणि उद्धव ठाकरेंच्या लोकसभेतील नऊपैकी सहा खासदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत सामील झाल्यामुळे सभागृहातील संख्याबळाचे समीकरण बदलले आहे. त्याचा पुरेपूर लाभ या अधिवेशनात एनडीए सरकार उठवेल व विरोधकांना आणखी काही झटके देण्याचा प्रयत्न करील. यापूर्वी आम आदमी पक्षाचे राज्यसभेतील सात खासदार भाजपमध्ये सामील झाल्यानंतर आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्या आवाजाची धार बरीच बोथट झाली. संसदेच्या अधिवेशनाच्या काळात आपले पक्ष व आपले संख्याबळ टिकवणे हेच विरोधी पक्षांपुढे मोठे आव्हान आहे. जंतरमंतरवरील कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन चालू असताना, सोनम वांगचुक यांना उपोषणाच्या २१ व्या दिवशी पोलिसांनी थेट उचलले व दिल्लीच्या सफदरजंग इस्पितळात उपचारासाठी नेले. यावरून जंतरमंतरवर असलेल्या तरुणांमधे संताप प्रकटला. त्याचे पडसाद संसदेच्या दोन्ही सभागृहात सुरुवातीलाच उमटण्याची शक्यता आहे. जंतरमंतरवर पुरोगामी व धर्मनिरपेक्ष म्हणविणाऱ्या कट्टर भाजप विरोधकांची या काळात मांदियाळी दिसून आली. दरम्यान, पावसाळी अधिवेशनात सरकारची संसदीय रणनीती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना थेट उत्तर देण्याऐवजी सरकार विकासकामे, आर्थिक वाढ, पायाभूत सुविधा, संरक्षण क्षेत्रातील स्वावलंबन, परराष्ट्र धोरणातील यश आणि सामाजिक कल्याणकारी योजनांवर भर देत राजकीय कथानक बदलण्याचा प्रयत्न करेल, अशी चिन्हे आहेत. दुसरीकडे विरोधी पक्ष महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, मतदारयादी सुधारणा आणि लोकशाही संस्थांच्या स्वायत्ततेसारखे मुद्दे आक्रमकपणे मांडण्याच्या तयारीत आहेत. मात्र, हे सर्व मुद्दे प्रभावीपणे मांडण्यासाठी विरोधी पक्षांनी एकजूट दाखविणे आवश्यक आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांतील बदललेले संख्याबळ आणि विविध पक्षांतील फूट पाहता, विरोधकांसमोर ही मोठी कसोटी असेल. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिला आरक्षण व मतदासंघ पुनर्रचना विधेयक विरोधी पक्षाने एकजुटीने हाणून पाडले व सरकारचा पराभव झाला. सरकारकडे तेव्हा लोकसभेत घटना दुरुस्ती विधेयकासाठी दोन-तृतीयांश बहुमत नव्हते व आजही तेवढे संख्याबळ नाही. दरम्यानच्या काळात भाजप व एनडीएची शक्ती वाढली आहे. गेल्या अधिवेशनात झालेला सरकारचा पराभव भाजपला खूपच जिव्हारी लागला. महिला आरक्षण-मतदारसंघ पुनर्रचना विधेयक फेटाळले गेले म्हणून विरोधी पक्षाने संसदेबाहेर आनंद व्यक्त केला. भाजपच्या महिला खासदारांनी विरोधी पक्षाने महिला आरक्षण विधेयकाला विरोध केला म्हणन संसद भवनातच हातात फलक उंचावून निषेधाच्या घोषणा दिल्या होत्या. त्या पराभवाचा वचपा या अधिवेशनात एनडीए सरकार काढेल का, हाच कळीचा मुद्दा आहे. लोकसभेतील जागा ५४३ वरून ८५० करणारे मतदारसंघ पुनर्रचना (परिसीमन) विधेयक हे सरकारच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेचे आहे. मोदी सरकारने १६ ते १८ एप्रिल या काळात या विधेयकासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले होते. हे विधेयक मंजूर झाले तर २०२९ मध्ये होणारी लोकसभेची निवडणूक नव्या रचनेनुसार घेतली जाईल, असा सरकारचा मनसुबा होता. महिला आरक्षणाच्या नावाखाली मतदारसंघ पुनर्रचना विधेयक भाजपला मंजूर करून घ्यायचे आहे, असा विरोधी पक्षाचा आक्षेप होता. यापूर्वी ३३ टक्के आरक्षण देणारे महिला विधेयक मंजूर झाले आहे मग पुन्हा महिला आरक्षण विधेयक कशासाठी, असा विरोधी पक्षाचा प्रश्न होता. मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर झाले की सर्व राज्यातील मतदारसंघाची संख्या दुप्पट होईल. याचाच अर्थ हिंदी भाषिक प्रदेशातील वाढील मतदारसंघाचा लाभ भाजपला होईल व संसदेत तुलनेने दक्षिणेतील राज्यांच्या मतदारसंघांची संख्या कमी होईल, असे विरोधकांचे म्हणणे होते. विधेयकावर २९८ विरुद्ध २३० असे मतदान झाले. घटना दुरुस्तीसाठी दोन-तृतीयांश मते मिळायला हवीत. विधेयकाचा ५४ मतांनी पराभव झाला होता. विरोधी पक्षाचे खासदार एनडीएकडे आणून गेल्या वेळची कसर यावेळी भाजप भरून काढणार का? याकडे लक्ष असेल. मतदारसंघ पुनर्रचना विधेयक हे केवळ जागा वाढविण्यापुरते मर्यादित नसून, पुढील अनेक दशकांच्या राष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरविणारे ठरू शकते. लोकसभेतील जागा वाढल्यानंतर कोणत्या राज्यांना किती प्रतिनिधित्व मिळणार, लोकसंख्येच्या प्रमाणावर नवीन राजकीय समीकरणे कशी तयार होणार आणि राष्ट्रीय पक्षांच्या ताकदीत कसा बदल होणार, याकडे सर्वच पक्षांचे लक्ष लागले आहे. विशेषतः, दक्षिण भारतातील राज्यांनी यापूर्वीच लोकसंख्या नियंत्रणात यश मिळविल्यामुळे त्यांचे संसदीय प्रतिनिधित्व तुलनेने कमी होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे हा वाद केवळ राजकीय नसून संघराज्य व्यवस्थेशी निगडित असल्याचेही विरोधकांचे म्हणणे आहे. याच कारणामुळे या अधिवेशनात सरकार हे विधेयक पुन्हा मांडते की आणखी काही काळ थांबते, याकडे देशाचे लक्ष लागले आहे. सरकारने विधेयक मांडल्यास ते मंजूर करण्यासाठी आवश्यक संख्याबळ उभे करण्याचे आव्हान असेल, तर विरोधकांसाठी आपली एकजूट टिकवून सरकारला पुन्हा रोखण्याची ही मोठी परीक्षा असेल. त्यामुळे यंदाचे पावसाळी अधिवेशन हे केवळ नेहमीच्या संसदीय कामकाजापुरते मर्यादित न राहता, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या राजकीय पायाभरणीचे अधिवेशन ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुंढे साहेब... फांद्या छाटण्यापेक्षा मुळावर घाव घाला..!

**भारतीय प्रशासकीय सेवेतील 'धुरंधर' अधिकारी अशी ख्याती असलेल्या तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचा 'लगाम' हाती घेतल्यापासून महाराष्ट्रभर पानटपरीपासून ते पंचतारांकित हॉटेल्सपर्यंत 'रेड'चा धाक पहायला मिळत आहे. महाराष्ट्रात भेसळयुक्त लाखो लिटर दूध जप्त, गुटख्याची हजारो पोती जप्त, घातक पनीर, मसाले पदार्थ जप्त अशा अनेक बातम्या झळकत आहेत. जनतेला 'विषा'पासून दूर ठेवण्याचा चंग बांधलेल्या मुंढे साहेबांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे, पण मुंढे साहेब या विषारी झाडांच्या फांद्या छाटून काहीही साध्य होणार नाही, तर ही झाडे मुळापासून उपटून टाकणे आवश्यक आहे.**



लोकशाहीप्रधान देश असलेल्या आपल्या भारतात सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला आहे. शासनाच्या अनेक विभागांमध्ये भ्रष्टाचाराची जणू 'स्पर्धा'च लागल्याचे 'लाचलुचपत'च्या आकडेवारीवरून दिसून येते. आपल्या महाराष्ट्रात लोकशाहीची मूल्ये जपत, आपल्या शासकीय पदाद्वारे खऱ्या अर्थाने 'लोकसेवा' कोण करत असेल, तर तो एकमेव अधिकारी म्हणजे आयुक्त मुंढे साहेब आहेत, ही वस्तुस्थिती आहे. मुंढे साहेबांचा आदर्श घेऊन आणि पद स्वीकारताना घेतलेल्या देशसेवेच्या शपथेला जागून जर शासनातील प्रत्येक अधिकारी प्रामाणिकपणे सेवा बाजू लागला, तर आपला देश कुठच्या कुठे जाईल! देशाच्या प्रगतीसाठी, लोकांच्या सुरक्षेसाठी, कल्याणासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने मुंढे साहेबांचा आदर्श घेतलाच पाहिजे, ही जनभावना आहे.

### महाराष्ट्रात वेगळीच क्रांती

गेल्या काही दिवसांपूर्वीच मुंढे साहेबांनी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे आयुक्त म्हणून पदभार घेतला आणि महाराष्ट्रात एक वेगळीच क्रांती घडू लागली. गुटखा माफियांपासून ते अन्न, मसाले, दूध व दुग्धजन्य पदार्थ, खते, रसायने यासह विविध पदार्थांची भेसळ करून त्यांचे 'विष' बनवणाऱ्या भेसळखोरांचे आणि हे 'विष' लोकांना पाजणाऱ्या 'दलालांचे' अक्षरशः धाबे दणाणले आहेत. मुंढे साहेबांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासन (FDA) विभाग ॲक्शन मोडवर आला असून एकापाठोपाठ एक अशा अनेक धडाकेबाज कारवाया या विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून सुरू आहेत. ही बाब चांगली आणि गरजेचीच आहे. समाजाला 'विष' पाजणाऱ्यांना कडक शासन झालेच पाहिजे आणि समाजाला या विषापासून दूर ठेवण्याची जबाबदारी या विभागाने प्रामाणिकपणे पार पाडलीच पाहिजे, ही जनभावना आहे! पण, पुढचा प्रश्न मात्र खूपच वेगळा आणि आत्मचिंतन करायला लावणारा आहे! मुंढे साहेब आज, अलीकडे अगदी एक दीड महिनाभरापूर्वी म्हणजेच २५ मे २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून रुजू झाले आहेत. मग, अन्न व औषध प्रशासन विभाग काय मुंढे साहेब आयुक्त बनल्यावर निर्माण झाला आहे की काय? नाही ना? मग, अगदी स्थापनेपासून आजवर अन्न व औषध प्रशासन विभाग झोपला होता काय? मुंढे साहेब आल्यावरच या विभागाला आपल्या कर्तव्याची जाणीव झाली, असंच म्हणायचे का? एवढेच नाही तर यापुढेही अनेक प्रश्न उपस्थित होतात, याची उत्तरे कोण देणार? जसे की, मुंढे साहेब येण्यापूर्वी अन्न व औषध प्रशासनाला आयुक्त मिळाला नव्हता का? आजवर या विभागाचे आयुक्त म्हणून किती अधिकारी काम करत होते? हे अधिकारी कोण होते? त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव होती का नव्हती? बरे.., अधिकाऱ्यांचे जाऊ द्या, आज मुंढे साहेबांच्या आदेशाने अगदी हिरिरीने आणि तत्परतेने 'रेड' मारून बेकायदेशीर गुटखा, भेसळयुक्त पदार्थ पकडण्यासाठी पुढे पुढे करणारे अधिकारी आणि कर्मचारी यापूर्वी कुठे होते? महाराष्ट्रात गुटखाबंदी १९ जुलै २०१२ पासून लागू झाली. राज्य सरकारने गुटखा आणि पान मसाल्याचे उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्री यावर बंदी घातली होती. मग तेव्हापासून महाराष्ट्रात गुटखा येत नव्हता का? येत होता पण, अन्न व औषध प्रशासनाला तो दिसत नव्हता, असे काही होते का? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत.

### गुटखा खाणा-यांची संख्या कमी नाही

गुटखाबंदी झाली पण, गुटखा खाणारांची संख्या काही कमी झाली नाही. पाच दहा रुपयांची पुडी पंचवीस तीस नव्हे पन्नास शंभर रुपयांना विकत घेतली जाते! परराज्यातून महाराष्ट्रात गुटखा तस्करी करून आणला जातो! गुटख्याच्या पोत्यांनी भरलेले ट्रकच्या ट्रक महाराष्ट्रात येत होते त्यावेळी अन्न व औषध प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून होते का? महाराष्ट्रात पानटपऱ्यांवर खुले आम गुटखा विकला जायचा त्यावेळी अन्न व औषध प्रशासन हातावर हात ठेवून बसले होते का? संबंधितांचे हात 'ओले' होत असल्यानेच 'हे' गांधारीच्या भूमिकेत 'रमले' होते का? असे अनेक वास्तववादी सवाल जनतेतून उपस्थित होत आहेत. मुंढे साहेब येण्याआधी अन्न व औषध प्रशासनाने गुटखा असेल अथवा भेसळविरोधी किती कारवाया केल्या? महाराष्ट्रातील जनतेला 'विष' पाजणाऱ्या दलालांना मोठे करण्याचे काम अन्न व औषध प्रशासन विभागाने केले का? या प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्राची सोशिक जनता मागत आहे. याची उत्तरे देण्याचे धाडस कोण दाखवणार?

### भेसळविरोधी कायदे कडक

तसे पाहिले तर, आपल्या देशात भेसळी विरोधातील कायदे अत्यंत कडक आहेत, हे स्वतः मुंढे साहेब सांगत आहेत. असे असताना गुटख्याचा काळाबाजार करणारे तसेच भेसळखोर आणि त्यांचे दलाल यांच्यावर आजवर किती आणि कोणत्या कारवाया झाल्या, याचे विचारमंथन झाले पाहिजे. आज मुंढे साहेबांच्या कारवायांमुळे गोरगरीब पानटपरी चालक भिकेला लागण्याची वेळ आली आहे. आजवर त्यांना गुटख्यानेच 'तारले' होते, असे म्हणावे लागेल! बेकायदेशीर असलेल्या कोणत्याही गोष्टीमध्ये कारवाई झालीच पाहिजे, त्यामुळे गुटखा विकणाऱ्या पानटपरी चालकांवर कारवाई झाली, याला कोणी विरोध करण्याचे कारणच नाही पण, या पानटपरी चालकांकडे गुटखा आला कोठून? त्यांना गुटखा घरपोच मिळत होता, त्यामुळे या गुटखा तस्करीची, काळ्याबाजाराची पाळेमुळे शोधून संबंधितांवर कडक कारवाई होणे अपेक्षित आहे. उशिरा का होईना जाग आलेल्या अन्न व औषध प्रशासनाने यापूर्वीच गुटखा तस्करी विरोधात ठोस कारवाया केल्या असत्या तर आज मुंढे साहेबांना एवढा त्रास घ्यावा लागला नसता, हेही खरे आहे. आज मुंढे साहेब आयुक्त झाले आणि अन्न व औषध प्रशासनाला आपल्या कर्तव्याची, जनतेप्रती असलेल्या सेवेची आठवण झाली. मुंढे साहेबांच्या धडाकेबाज कारवायांमुळे महाराष्ट्रात किती गुटखा येतो, दुधात, विविध अन्न पदार्थात आणि इतर अनेक बाबींमध्ये किती आणि कशाप्रकारची भेसळ होते, हे उघड झाले आहे. हे भयावह वास्तव पाहून आपण आजवर कोणत्या प्रकारचे किती 'विष' पचवत आलो आहोत, याचा अंदाज येतो. मुंढे साहेबांचा आजवरचा इतिहास पाहता ते ज्या ज्या विभागात गेले, त्या त्या विभागाने 'कात' टाकून धडाकेबाज कारवाया केल्या आहेत. आज अन्न व औषध प्रशासन विभागाचा धडाका सुरू आहे. कोण जाणे, मुंढे साहेबांची बदली कधीही, कुठेही होऊ शकते! हेही वास्तव आहे. त्यामुळे गुटखा तस्करी आणि भेसळखोरोची पाळेमुळे लवकरात लवकर शोधून महाराष्ट्र 'विषमुक्त' करण्यासाठी सरकारनेही मुंढे साहेबांना सहकार्य करणे गरजेचे आहे.

### महाराष्ट्र गुटखामुक्त होवो, सदिच्छा

आज महाराष्ट्रभर अन्न व औषध प्रशासनाचे धाडसत्र सुरू आहे, याचे जनतेतून स्वागतच होत आहे. महाराष्ट्राला गुटखा आणि भेसळयुक्त पदार्थांच्या विषापासून मुक्त करण्याचे आव्हान अन्न व औषध प्रशासना समोर आहे. हे आव्हान मुंढे साहेबांनी स्वीकारले आहे आणि त्यांनी सकारात्मक ठोस कारवाईला सुरुवातही केली आहे. मुंढे साहेबांमुळे महाराष्ट्र गुटखामुक्त होवो, या सदिच्छा महाराष्ट्रातील तमाम जनता देत आहे. भेसळयुक्त दूध, पदार्थ, मसाले, अन्नधान्य आदी असलं काहीही महाराष्ट्रात पहायला मिळू नये, अशी सर्वसामान्य जनतेची इच्छाच नव्हे तर हक्कच आहे. यासाठी मुंढे साहेबांनी पाऊल उचलले याबद्दल त्यांचे खरोखरच अभिनंदन! पण मुंढे साहेब, पानटपऱ्या किंवा छोट्या मोठ्या व्यावसायिकांवर कारवाई करून हे 'विष' संपणार आहे का? तर नाही..! 'विष' रूपी झाडाच्या फांद्या तोडून आपण 'ब्लॅक'चा फुगा अधिक फुगवणार आहोत, याचे भानही ठेवले पाहिजे. त्यामुळे गुटखा आणि भेसळीचे 'विष' जर कायमस्वरूपी नष्ट करायचे असेल, तर मुंढे साहेब या काळ्या धंद्यांच्या मुळावर घाव घाला! गुटखा असो किंवा भेसळयुक्त पदार्थ, जो कोणी याची विक्री करत असेल त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे, मग तो मोठा असो वा छोटा ! यामध्ये कोणाचेही दुमत नाहीच! पण, यावर रामबाण इलाज होणे आवश्यक आहे, त्यामुळे मुंढे साहेब.., 'न रहेगा बास न बजेगी बासुरी' या उक्तीनुसार कारवाई करून महाराष्ट्राला कायमचं 'विषमुक्त' करा..! यासाठी आपणांस व आपल्या अन्न व औषध प्रशासनाला शुभेच्छा..!

**- अमर मोकाशी**

# सीजेपीचे आंदोलन भरकटते आहे का ?

गेल्या काही दिवसांपासून दिल्लीतील जंतर मंतरवर चाललेले आंदोलन समस्त प्रसिद्धी माध्यमांची हेडलाईन बनले आहे. नीट पेपर फुटीनंतर कॉकरोच जनता पार्टीने देशाच्या विविध भागांत आंदोलने केली. ज्याला संमिश्र प्रतिसाद मिळाला. पेपर फुटीचे दायित्व घेऊन देशाच्या शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी सोनम वांगचुक यांनी जंतर मंतरवर २० दिवस उपोषण केले ज्यामुळे संपूर्ण देशातील वातावरण ढवळून निघाले. वृत्तपत्रांसह समाज माध्यमांवरही सरकारविरोधी प्रतिक्रिया उमटू लागल्या. वांगचुक यांचे समर्थन करण्यासाठी तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात पुढे आला, विरोधी पक्षांनीही वांगचुक यांचे समर्थन केले, मात्र त्यानंतर सरकारने त्यात हस्तक्षेप करून वांगचुक यांना जंतर मंतर येथून उचलून रुग्णालयात हलवले. न्यायालयानेही आता याबाबतीत काही वेगळा निर्णय देण्यास नकार दिला आहे. जंतर मंतरवर चाललेल्या आंदोलनाला जसा जनतेचा पाठिंबा मिळत होता तशा तेथील काही वादग्रस्त बाबीही लोकांसमोर येत होत्या.

विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी सोनम वांगचुक एकीकडे उपोषण करत होते तर दुसरीकडे त्यांच्या समर्थनासाठी आलेले काही तरुण क्रिकेट खेळत होते. मेजवान्या झाडत होते. मंचावर येऊन कुणीही काहीही बरळत होते. स्टॅन्ड अप कॉमेडियन कुणाल कामरा याने हे सरकार सीताच्या पतीचे नाव घेऊन नीताच्या पतीचे काम करत आहे' असे विधान करून हिंदूंचे आराध्य दैवत प्रभू श्रीरामांचा अवमान केला. हा अवमान होत असताना कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजित दिपके फिदीफिदी हसल्याने तो राग मनात ठेवून बरखा त्रेहन यांनी त्यांच्यावर पार्टीच्या कार्यकर्त्यांसमोरच शाई फेकली. त्यानंतर बरखा त्रेहन याना कॉकरोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी मारहाण करून त्यांचे केस ओढल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याच मंचावर आणखी एका महिलेने एक पाकिस्तानी गीत सादर केले ज्याचे शब्द होते 'सब बूत उठ्वाए जायेंगे, बस नाम राहेगा अल्लाह का' ज्याचा अर्थ सर्व मुर्त्या हटवला जातील आणि केवळ अल्लाहचे नाव शिल्लक राहील. हे गाणे फैझ अहमद फैझ या पाकिस्तानी कवीने लिहिले आहे. या गाण्यावरून सुद्धा आता मोठा वाद निर्माण झाला आहे.



हिंदुस्थानात जसे बहुसंख्येने हिंदू राहत आहेत तसे जैन आणि बौद्ध सुद्धा गुण्या गोविंदाने राहत आहेत. हिंदूंसह जैन आणि बौद्ध धर्मीय हे मूर्तिपूजक आहेत. या गाण्यातून या तिन्ही समाजाला एकप्रकारे आव्हानच देण्यात आले आहे. येणाऱ्या काळात देशातील सर्व मुर्त्या हटवल्या जातील आणि केवळ अल्लाहचे नाव या भारतात शिल्लक राहील हे गीत कॉकरोच जनता पार्टीच्या मंचावर म्हटले गेले ज्याला पार्टीच्या एकानेही विरोध केला नाही त्यामुळे हे गीत कॉकरोच जनता पार्टीचा भविष्यातील अजेंडा आहे कि काय अशी चर्चा आता जनमानसांत सुरु झाली आहे. दिल्ली दंगलीतील आरोपी आणि उमर खालिदचे वडील सय्यद कासीम रसूल इलियास हे देखील यावेळी मंचावर उपस्थित होते. अभिनेता प्रकाश राज यांनीही याच मंचावरून वादग्रस्त विधान केले त्यामुळे जंतर मंतरवर सुरु असलेले कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन नक्की विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या सुरक्षेसाठी आहे की तरुणांची माथी भडकवण्यासाठी असा प्रश्न हिंदुत्ववादी आणि देशप्रेमी संघटनांकडून विचारला जात आहे. कुणाल कामरा, प्रकाश राज आणि पाकिस्तानी गीत गाणाऱ्या महिलेच्याविरोधात हेट स्पीचचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी अनेक संघटनांनी केली आहे. वादग्रस्त लोकांना आपल्या मंचावर स्थान देऊन सामान्य जनतेचा रोष ओढवून घेणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीचे भविष्य काय असणार आहे हे आता जनतेचाही हळहळू लक्षात येऊ लागले आहे.

**जगन घाणेकर**

# आधुनिक युगातील जांबाज तुकाराम

पंढरीची आस सर्वांनाच लागून राहिली आहे त्यामुळे सगळीकडे ग्यानभा तुकारामाचा जयघोष होत आहे हाच विषय पकडून आधुनिक युगातील एक डॅशिंग आणि जांबाज लोकप्रिय कर्तव्यदक्ष अधिकारी चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे तो संनदी अधिकारी म्हणजे तुकाराम मुंढे. पांढऱ्या दुधातील काळे बोके शोधणारा अनेकांच्या उरात धडकी भरवणारा खाद्यपदार्थातील भेसळीविरुद्ध मोहीम उघडून अनेकांची झोप उडवली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांमध्ये भेसळ केली जात असल्याचे समोर आले आहे त्याला आळा घालण्यासाठी या डॅशिंग अधिकाऱ्याने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोहीम उघडून यातील मोठ्या माशांना आपल्या गळाला लावले आहे. भारतीय प्रशासकीय व्यवस्थेत तुकाराम मुंडे साहेबांसारखे अधिकारी लाभणे जनतेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. या अधिकाऱ्यामुळे संपूर्ण खाद्यपदार्थांचे गणितच बिघडवले आहे तुकाराम मुंडे यांच्या एकूणच कारकीर्दीपैकी २१ वर्षात २५ वेळा बदल्या झाल्या आहेत हे वास्तविक पाहता चुकीचे आहे कारण ही संपूर्ण यंत्रणा बदलण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागतो बदल होत असताना लगेच बदली करणे हे हितावह नाही.

**राजू जाधव**

# प्रगत महाराष्ट्रातील शाळा अजूनही अंधारात?

पायाभूत सुविधा, औद्योगिकीकरण, आर्थिक स्वयंपूर्णता याला साक्षरतेची जोड असणे अत्यावश्यक आहे. मात्र विकसित देशांमधील तांत्रिकदृष्ट्या साक्षरता आणि भारतातील तांत्रिकदृष्ट्या साक्षरता यांत फार मोठा फरक आहे. आपल्या देशातील केरळ वगळता इतर राज्यांत शिक्षणाबाबत अंधार असल्याचे दिसून येते. त्यामानाने आकाराने मोठ्या असलेल्या महाराष्ट्रात ३ हजार २०१ शाळांमध्ये वीज पुरवठा होऊ शकलेला नाही. त्यामुळे तिथे संगणक, इंटरनेट आणि डिजिटल लायब्ररीज उपलब्ध होऊ शकलेल्या नाहीत. राज्यातील १०९३८ शाळांमध्ये वीज आहे, पण ती उपयोगात आणली जात नाही. २३८५५ शाळांमध्ये इंटरनेट उपलब्ध झालेले नाही. तंत्रज्ञान युगातील संगणक आणि इंटरनेट उपलब्ध नसल्यामुळे या शाळांमध्ये डिजिटल अंधारच आहे असे नाईलाजास्तव म्हणावे लागेल. यावरून ग्रामीण आणि आदिवासी भागातील परिस्थितीचा अंदाज बांधता येऊ शकतो. राज्यातील साक्षरता फक्त ७३ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकली आहे. राज्यातील सुमारे एक लाखांहून अधिक शाळांमधून ७५०,२५२ शिक्षक हे २,१६,३२,६६९ विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. या प्रमाणाचा गांभीर्याने विचार केला असता राज्यातील शिक्षण व्यवस्थेबाबत असलेली उदासीनता दिसून येते.

**स्नेहा राज**

# स्पेनने जिंकला 'फिफा' विश्वचषक २०२६!

अमेरिकेतील न्यू जर्सी येथील मेटलाईफ स्टेडियमवर झालेल्या फिफा विश्वचषक २०२६ च्या स्पेन विरुद्ध अर्जेंटिना या संघातील अंतिम सामन्यात स्पेनने अर्जेंटिनाला १-० ने हरवून अंतिम विजेतेपद पटकावले आहे. अतिशय अटीतटीच्या सामन्यात एक्स्ट्रा टाइममधील १०६व्या मिनिटाला फेरान टोरेसने गोल करत स्पेनला विश्वविजेता बनवले. ८० हजार ६६३ प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या या स्टेडियमवर या अंतिम सामन्याला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही हजेरी लावली होती. या सामन्याने तिकीटविक्रीचे आजवरचे सर्व विक्रम मोडीत काढले. स्टेडियमच्या सर्वात वरच्या मजल्यावरची सर्वात स्वस्त तिकिटाची किंमत भारतीय चलनानुसार अंदाजे ६.५ लाख रुपये ते ८.२ लाख रुपये एवढी होती. तर मैदानाजवळच्या व्हीआयपी जागेची किंमत सुमारे ५२ लाख रुपयेते ६० लाख रुपये इतकी होती. विजेत्या स्पेन संघाला विश्वचषकासह ५० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे तर उपविजेत्या अर्जेंटिना संघाला ३३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे पारितोषिक मिळाले. ब्रॉन्झ पदक पटकावणाऱ्या इंग्लंड संघाला २९ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे पारितोषिक मिळाले. विशेष म्हणजे मैदानावरील चित्तथरारक खेळासोबतच या स्पर्धेत राजकीय हस्तक्षेप आणि रेफ्रींच्या काही संशयास्पद निर्णयांमुळे ही स्पर्धा मैदानाबाहेरही प्रचंड गाजली. एकूणच वादांचे गालबोट लागलेल्या या बहुखर्चिक क्रीडा सोहळ्याचे सूप आता वाजले आहे.

**-प्रदीप मोरे**

मंगळवार, दि. २१ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ यवतमाळात विद्यार्थ्यांचा रस्ता रोको..!

## घोषणांनी दणाणला परिसर, राष्ट्रपतींच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, धर्मेंद्र प्रधानांचा तात्काळ राजीनामा घ्या"

✦जनमाध्यम | प्रतिनिधी







**यवतमाळ, दि. २० :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देणारे शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांना कथितपणे बळजबरीने उपोषणस्थळावरून हटविण्यात आल्याच्या निषेधार्थ आणि नीटसह विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमधील कथित पेपरफुटी, शैक्षणिक व्यवस्थेतील अनियमितता व पारदर्शकतेच्या मागणीसाठी यवतमाळ शहरातील विद्यार्थी, पालक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, नागरिक आणि विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने संविधान चौकात एकवटले.

विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात काही काळ रस्ता रोको करण्यात आला. घोषणाबाजीमुळे परिसर दणाणून गेला, तर काही काळ शहरातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आंदोलनकर्त्यांनी मोठे रिंगण तयार करून केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. "धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या...!" "हमे आजादी चाहिये तानाशाही से...!" "हमे आजादी चाहिये हुकूमशाही से...!" "हमे आजादी चाहिये महंगाई से...!" "शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता हवी...!" "पेपरफुटी बंद करा...!", अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी शिक्षण व्यवस्थेतील कथित भ्रष्टाचार, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि आंदोलन दडपण्याच्या प्रयत्नांविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली आणि संविधान चौकात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. मात्र आंदोलनकर्त्यांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करत शांततापूर्ण आणि संविधानिक मार्गाने आंदोलन पूर्ण केले. यानंतर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन भारताच्या महामहीम राष्ट्रपतींच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, देशभरातील विद्यार्थी नीट व इतर स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटी, शैक्षणिक व्यवस्थेतील पारदर्शकतेचा अभाव, विद्यार्थ्यांवरील अन्याय आणि आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना मदत यांसह विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. या आंदोलनाला समर्थन म्हणून सोनम वांगचुक यांनी २३ दिवसांचे आमरण उपोषण सुरू केले होते. मात्र १८ जुलै रोजी त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता जंतर-मंतर येथून पोलिसांनी बळजबरीने हटवून रुग्णालयात दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. याचवेळी विद्यार्थी नेते अभिजीत दिपके यांच्यावर शाईफेक झाल्याचा तसेच आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी बळाचा वापर करून लाठीचार्ज केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार लोकशाही मूल्यांचा अवमान करणारा असून भारतीय संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार आणि मूलभूत हक्कांवर घाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या संपूर्ण घटनेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून जबाबदार पोलीस अधिकारी व संबंधित शासकीय यंत्रणेवर कायदेशीर कारवाई करावी, विद्यार्थी आंदोलनावरील कथित दडपशाही थांबवावी, देशातील परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करावी, भविष्यात कोणत्याही प्रकारची पेपरफुटी होणार नाही यासाठी कठोर यंत्रणा उभी करावी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला की, विद्यार्थ्यांच्या संविधानिक मागण्यांकडे दुर्लक्ष करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सुरू राहिल्यास देशभरात विद्यार्थी आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. यवतमाळातील हे आंदोलन विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली शांततापूर्ण व संविधानिक मार्गाने पार पडले असून जिल्ह्यातील विविध सामाजिक घटकांनी त्याला उत्स्फूर्त पाठिंबा दिला.

# विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची कत्तल!

## ११० वर्षे सावली देणारी दोन निंबाची झाडे जमीनदोस्त..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. २० :** शहरातील विकासकामांच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी दिला जात असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. दिग्रस येथील विश्रामगृह लगत रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी सुमारे ११० वर्षे जुनी दोन प्राचीन निंबाची झाडे तोडण्यात आल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.ही झाडे अनेक दशकांपासून प्रवासी, पादचारी तसेच विश्रामगृहात येणाऱ्या नागरिकांना थंडगार सावली देत होती.

उन्हाळ्यात या झाडांखाली अनेक गोरगरीब प्रवासी विसावा घेत असत. पर्यावरणाचा समतोल राखणारी आणि परिसराला नैसर्गिक सौंदर्य देणारी ही झाडे काही तासांत तोडण्यात आल्याने नागरिकांनी याला "विकासाच्या नावाने पर्यावरणाची कत्तल" अशी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. झाडे तोडल्यानंतर रस्त्याच्या मधोमध बुंधा तसाच ठेवण्यात आल्याने वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. "विकास आवश्यक आहे, मात्र पर्यावरणाचा बळी देऊन नव्हे. शतकभराचा नैसर्गिक वारसा जपण्याऐवजी तो संपविणे ही दुर्दैवी बाब आहे," अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली. प्रशासनाने तोडलेल्या प्रत्येक झाडाच्या बदल्यात किमान दहा नवीन झाडांची लागवड करून त्यांचे संगोपन करावे, तसेच भविष्यात अशा प्राचीन वृक्षांचे संरक्षण करण्यासाठी पर्यायी नियोजन करावे, अशी ठाम मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड..

## अध्यक्षपदी शेख आमिर, उपाध्यक्षपदी मोहम्मद राजिक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**बाभूळगाव, दि. २० :** शाळेच्या सर्वांगीण विकासात आणि शैक्षणिक कामकाजावर प्रभावी देखरेख ठेवणाऱ्या शाळा व्यवस्थापन समितीच्या नव्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड बाभूळगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळेत करण्यात आली. अध्यक्षपदी शेख आमिर शेख कादर, तर उपाध्यक्षपदी मोहम्मद राजिक शेख हनीफ यांची सर्वानुमते निवड झाल्याने पालक व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

शाळा व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर आयोजित पालक सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये आसेफा इरफान खान पठाण, सालेहा मोहम्मद फैसल, समिना मोहम्मद आसिफ, कायनात शेख सलीम, गौसिया परवीन, परवीननिसा सुभेदार खान, सायरा परवीन मोहम्मद अयाज, इलियास कुरेशी, मोहम्मद जावेद मिर्झा, महेमुद खान, आरिफ मन्सुरी आणि नईम खान यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. शिक्षणतज्ज्ञ म्हणून शहेजाद शेख, तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून सदफ महेरीन यांची बिनविरोध निवड झाली. समितीचे सचिव म्हणून शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद अबुलैस कामकाज पाहणार आहेत. नवीन समितीच्या माध्यमातून शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांच्या सुविधा आणि पालक-शाळा समन्वय अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास पालक, शिक्षक आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक मोहम्मद अख्तर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक मोहम्मद अबुलैस यांनी मानले.

## थोडक्यात




### विद्युत पुरवठा सुरळीत चालू ठेवण्याची मागणी

**महागांव विज वितरण कार्यालय रामभरोसे:एकही कर्मचारी हजर नाही!**

**महागाव:** तालुक्यातील तिवरंग येथील नागरिक त्यांच्या परिसरात सततच विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने कंटाळुन महागांव येथील विद्युत पुरवठा कार्यालयामध्ये सुरळीत व सुरक्षित विद्युत पुरवठा मिळावा म्हणून लेखी निवेदन देण्यासाठी गेले असता संबंधित कार्यालयात एकही कर्मचारी व अधिकारी हजर नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.तिवरंग चिखली मलकापूर वाकान कोदंरी परिसरातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने व आठवड्यातुन एकही दिवस पुरेसा विद्युत पुरवठा सुरळीत मिळत नसल्याने येथील नागरिक संतापले असुन.प्रत्येक महिन्यात सुरळीत मिटर बिल भरणा करूही नर्क यातना भोगाव्या लागत असल्याने या फिडरवर कामावर रुजू असलेल्या बेजबाबदार कर्मचाऱ्यांमुळे व्यवस्थित व सुरळीत विद्युत पुरवठा मिळत नसल्याचा आरोप केला जात आहे विद्युत पुरवठा कर्मचाऱ्यांच्या मणमानी व भोगंळ कारभारामुळे हि व्यवस्था ढासळत चालली असून.दररोजच कोणत्या न कोणत्या कामानिमित्त जानुनबुजुनच या परिसरातील विद्युत पुरवठा बंद करुन नागरिकांना अंधारात ठेवले.

### ईजनीतील अंगणवाडी सेविका भरतीवर अनियमिततेचा आरोप..! चौकशीची मागणी

**महागाव :** महागाव तालुक्यातील ईजनी येथील अंगणवाडी सेविका



पदाच्या भरती प्रक्रियेत नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप करत शिवसेना तालुका उपप्रमुख तुकाराम उमरे यांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

दिलेल्या निवेदना नुसार, ईजनी येथील अंगणवाडी सेविकेच्या निधनानंतर रिक्त झालेल्या पदावर बाल विकास प्रकल्प कार्यालयामार्फत स्थानिक अंगणवाडी मदतनीस यांची सेविका म्हणून नियुक्ती करण्यात आली. मात्र, ही नियुक्ती करताना रिक्त पदाची सार्वजनिक जाहिरात, अर्ज मागविण्याची प्रक्रिया तसेच पात्र उमेदवारांना संधी देण्याची आवश्यक कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या संबंधित मार्गदर्शक सूचना व शासन निर्णयानुसार रिक्त पदाची जाहीर सूचना प्रसिद्ध करून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणे, कागदपत्रांची छाननी करणे आणि गुणवत्तेनुसार निवड करणे अपेक्षित आहे.

या संदर्भात तुकाराम उमरे यांनी तहसील प्रशासन तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार सादर करून संपूर्ण भरती प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करावी, नियमबाह्य नियुक्ती झाली असल्यास ती रद्द करून शासनाच्या नियमांनुसार नव्याने भरती प्रक्रिया राबवावी, अशी मागणी केली आहे.

### SIR मोहिमेत एकही पात्र मतदार वंचित राहू नये..!

**शिवसेनेच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन**

**ढाणकी :** ढाणकी येथे शिवसेनेच्या उमरखेड तालुक्यातील वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (SIR) मोहिमेबाबत पदाधिकाऱ्यांची मार्गदर्शन बैठक पार पडली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट व्हावे, मतदार यादीतील त्रुटी दूर व्हाव्यात आणि नवमतदारांची नोंद वेळेत व्हावी, यासाठी पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते चितांगराव कदम व साहेबराव कांबळे यांनी SIR मोहिमेचे महत्त्व, मतदार नोंदणी प्रक्रिया आणि नागरिकांपर्यंत पोहोचण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच प्रत्येक बूथवर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जनजागृती करून एकही पात्र मतदार वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीस तालुकाप्रमुख प्रवीण मिराशे, रवीकांत रुडे, नगर उपाध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे, शहरप्रमुख संजय सल्लेवाड यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना कार्यकर्ते, नगरसेवक आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विदर्भ रत्न-२०२६ ने संत सावता माळी पतसंस्थेचा गौरव..!

## सहकार क्षेत्रातील विश्वासार्हतेवर पुन्हा शिक्कामोर्तब

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २० :** सहकार क्षेत्रातील पारदर्शक कारभार, ठेवीदारांचा विश्वास आणि सातत्यपूर्ण प्रगतीची दखल घेत पुसद येथील संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्थेला नागपूर येथे "विदर्भ रत्न-२०२६" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिकस्थित रिसेल डॉट इन या संस्थेने विदर्भातील "सर्वोत्कृष्ट नागरी सहकारी पतसंस्था" म्हणून ही निवड केली.

नागपूर येथील सॉलिटेअर हॉटेल अँड बँक्वेट्समध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष आत्माराम जाधव व संचालक केशवराव खासबागे यांनी पुरस्कार स्वीकारला. सन २००८ मध्ये स्थापन झालेल्या या पतसंस्थेच्या यवतमाळ व वाशीम जिल्ह्यात आज नऊ शाखा कार्यरत असून सुमारे ४,७०० सभासद, हजारो ठेवीदार आणि ग्राहकांचा संस्थेवर विश्वास आहे. गेल्या १५ वर्षांपासून संस्थेला सातत्याने 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त झाला आहे. महिला बचत गट, शेतकरी, लघुउद्योजक आणि बेरोजगार युवकांना आर्थिक सहाय्य देतानाच पूरग्रस्त, गरजू कुटुंबे, विद्यार्थी व कोरोना काळातील मदतकार्य अशा सामाजिक उपक्रमांतही संस्थेने उल्लेखनीय योगदान दिले आहे. पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना अध्यक्ष आत्माराम जाधव यांनी, "हा सन्मान माझा नसून सभासद, ठेवीदार, ग्राहक, संचालक मंडळ आणि सहकार चळवळीशी जोडलेल्या प्रत्येक घटकाचा आहे. भविष्यातही विश्वासार्ह आणि लोकाभिमुख सहकाराचा आदर्श कायम ठेवू," असा विश्वास व्यक्त केला.

# आठवडी बाजाराच्या दिवशी जडवानाला बंदी घाला..!

## शिंदे शिवसेना गटाची मुकुटबन पोलिसांना निवेदन..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. २० :** मुकुटबन येथे दर सोमवारी भरणाऱ्या आठवडी बाजाराच्या दिवशी होणाऱ्या जड वाहनांच्या वर्दळीमुळे नागरिक, शेतकरी आणि व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत जड वाहतुकीस बंदी घालावी, अशी मागणी शिंदे सेनेच्या वतीने मुकुटबन पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सतीश जाधव यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

आशीष कुळसंगे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आठवडी बाजारासाठी परिसरातील अनेक गावांतील नागरिक मोठ्या संख्येने मुकुटबन येथे येतात. मुख्य रस्त्यावर बाजार भरत असल्याने जड वाहनांची सततची ये-जा वाहतूक कोंडी निर्माण करत असून अपघाताचा धोका वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बाजाराच्या दिवशी पर्यायी मार्गाने जड वाहतूक वळविणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावेळी तालुकाप्रमुख बालू चेडे, जिल्हा सचिव (युवासेना) नीलेश बेलेकर, प्रकाश खीरटकर, राहुल गवडी, सोनल गुगुल, प्रेम मंदावार, तुलसीदास मंदावार, अमित मुके, अमोल यमजलवार, विक्रम पाशीवार, आकाश काचीनवार, प्रकाश मंदुलवार, प्रवीण गावंडे यांच्यासह शिंदे सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, बाजाराच्या दिवशी होणारी वाहतूक कोंडी आणि नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यापारी व स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# अवघ्या ११ वर्षांतच शाळा जीर्ण..! कोलाम पोडच्या विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ?

## भिंत कोसळली, सळ्या उघड्या,निकृष्ट बांधकामाची चौकशी करून कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी







**यवतमाळ, दि. २० :** यवतमाळ जिल्ह्यातील लोहारा येथील कोलाम पोड परिसरात जिल्हा परिषदेमार्फत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या शाळेच्या इमारतीचा काही भाग अवघ्या ११ वर्षांतच कोसळल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शाळेच्या भिंतींना मोठ्या प्रमाणात तडे गेले असून प्लास्टर निखळले आहे. अनेक ठिकाणी लोखंडी सळ्या उघड्या पडल्या असून इमारत धोकादायक अवस्थेत पोहोचली आहे. या शाळेत आदिवासी समाजासह इतर समाजातील विद्यार्थी शिक्षण घेतात. इमारतीची अवस्था पाहता ती केव्हाही कोसळू शकते, अशी भीती पालक आणि ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्व विद्यार्थी सुरक्षित आहेत. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, इतक्या कमी कालावधीत शाळेची इमारत जीर्ण होणे हे बांधकामातील निकृष्ट दर्जा व अनियमिततेचे द्योतक आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या या शाळेच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून संपूर्ण बांधकामाची तांत्रिक चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. ग्रामस्थांनी या प्रकरणी स्वतंत्र चौकशी समिती नेमून बांधकामाची सखोल तपासणी करावी, दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच लोहारा पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

**जीव धोक्यात; तत्काळ पर्यायी व्यवस्था करा**

**शाळेची इमारत धोकादायक झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शिक्षण विभागाने तत्काळ इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून विद्यार्थ्यांसाठी पर्यायी वर्गखोल्यांची व्यवस्था करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांनी केली आहे.**

# चिकणी डोमगा येथील नागरिकांचेआरोग्य धोक्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**चिकणी, दि. २० :** नेर तालुक्यातील चिकणी डोमगा येथील पिण्यासाठी उपयोगात येणारे विहिरी चे पाणी हिरवेगार झाले असून त्यामुळे गावातील समस्त नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे गावात नळ योजना असून सुद्धा नळाचे पाणी पावसाच्या दिवसात सुद्धा २०, २० दिवस येत नाही. वारंवार गावातील सरपंच उपसरपंच ग्रामसेवक यांना कळविले असता याबाबत कुठल्याही प्रकारची दखल घेतल्या जात नाही. त्याचप्रमाणे गावातील रस्त्यांवर खड्डे पडले असून त्यामुळे शाळेत जाताना लेकरांना, नागरिकांना त्रास होतो, तिथे कुठल्याही प्रकारचा मुरूम किंवा शोष खड्ड्यांची व्यवस्था केलेली नाही. यामुळे नागरिक सर्वत्र त्रस्त आहेत. ठिकठिकाणी पाणी साचले असल्यामुळे मच्छरांचा डासांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे. प्रशासनाने या बाबीची वेळीच दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. यवतमाळ जिल्ह्यात चिकणी डो. शिक्षणाच्या बाबतीत आघाडीवर असून या गावची अशा प्रकारे दूरदर्शा होत असेल तर गावातील प्रतिष्ठित पुढारी हे काय करतात. असा समस्त गावकऱ्यांचा रोश आहे. आणि वेळीच दखल घेतल्या गेली नाही तर येणाऱ्या आठ दिवसात तहसीलवर मोर्चा काढण्यात येईल असा समस्त नागरिकांनी प्रशासनाला इशारा दिला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# जिल्हा परिषद शाळांची दयनीय अवस्था

## शिक्षक टंचाई आणि विशेष शिक्षकांच्या दुर्लक्षामुळे शिक्षणाचा दर्जा घसरला

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद शाळांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक होत चालली आहे. शिक्षकांची तीव्र कमतरता,विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या आणि विशेष शिक्षकांच्या कामचुकारपणामुळे पालकांनी जिल्हा परिषद शाळांकडे पाठ फिरवल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेचा गाडा सध्या अनेक गंभीर प्रश्नांच्या चक्रव्यूहात अडकला असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत असल्याचा आरोप पालक व नागरिकांकडून होत आहे.

तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग एकाच इमारतीत भरवले जातात.धक्कादायक बाब म्हणजे काही शाळांमध्ये अवघे ७ ते ८ विद्यार्थी आणि त्यांना शिकवण्यासाठी दोन शिक्षक कार्यरत आहेत, तर काही ठिकाणी एकच शिक्षक आणि एकच विद्यार्थी अशी विदारक परिस्थिती आहे.एका बाजूला विद्यार्थी नसताना शिक्षकांची संख्या जास्त, तर दुसऱ्या बाजूला अनेक



शाळांमध्ये एका शिक्षकाला तीन ते चार वर्ग सांभाळावे लागत आहेत. यामुळे शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तराचा समतोल पूर्णपणे बिघडला असून मनुष्यबळ नियोजनाचा अभाव आणि शैक्षणिक गुणवत्तेवर थेट परिणाम होत आहे.जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांवर अध्यापनासोबतच विविध शासकीय कामे, सर्व्हे, निवडणूक ड्युटी यासारख्या कामांचा अतिरिक्त भार असतो. त्यामुळे अध्यापनाकडे दुर्लक्ष होत असल्याचीही चर्चा आहे. शाळांचे निरीक्षण आणि शैक्षणिक नियोजनाची जबाबदारी केंद्रप्रमुखांवर असली तरी त्याकडून अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

एकूणच, तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची उपलब्धता, विशेष शिक्षकांचे बेशिस्त कामकाज आणि शैक्षणिक व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी याबाबत प्रशासनाने तातडीने गंभीर दखल घेऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी पालक आणि सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.

### शिक्षक हजेरी लावून गायब?

शिक्षकांची कमतरता भरून काढण्यासाठी तालुक्यातील पाच केंद्रांमध्ये विशेष शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या शाळांमध्ये शिक्षक कमी आहेत, तिथे जाऊन विद्यार्थ्यांना अध्यापनाची मदत करणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी आहे.मात्र, प्रत्यक्षात चित्र वेगळेच आहे. काही विशेष शिक्षक शाळेत येऊन केवळ हजेरी लावून निघून जातात आणि दिवसभर वैयक्तिक कामांमध्ये व्यस्त राहतात, असा गंभीर आरोप स्थानिक नागरिक आणि पालकांनी केला आहे. त्यामुळे गरजू शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.या विशेष शिक्षकांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याची थेट जबाबदारी गटशिक्षणाधिकाऱ्यांवर असतानाही प्रभावी नियंत्रण आणि कारवाई होत नसल्याने या शिक्षकांचे मनोबल वाढल्याचे बोलले जात आहे.

या गंभीर विषयावर गटशिक्षणाधिकारी शीला आठवले यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी अत्यंत उदासीन प्रतिक्रिया दिली.याबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी सतीश मुगल यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी,'या संदर्भात बैठक घेऊन सविस्तर चौकशी करण्यात येईल. संबंधित माहिती घेऊन आवश्यक ती कार्यवाही केली जाईल,' असे सांगितले.

■ आठदहा दिवसांपूर्वी तालुक्यातील बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्याकरिता गेलो असता बऱ्याच शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भासली.एका शिक्षकाला तीन चार वर्ग शिकवतांना पाहिले. याबाबत प्रशासनाने याकडे विशेष लक्ष देऊन ही अडचण सोडविण्यात यावी.

**विजय पाटील तिजारे,**
सामाजिक कार्यकर्ते

---

सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ

# परतवाडा शहरात विविध पक्षांकडून आयोजित मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विविध मागण्याचे अचलपूर उपविभागीय अधिकारी यांना दिले निवेदन

**अचलपूर/वार्ताहर**

प्रख्यात शिक्षण व पर्यावरण तज्ञ सोनम वांगचुक हे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी जंतर-मंतरवर उपोषणास बसले आहेत. त्यांच्या समर्थनार्थ परभणीत सोमवारी २० जुलै रोजी परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक ते अचलपूर उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयापर्यंत मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये विविध पक्षातील नेते,पदाधिकारी ,कार्यकर्ते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.यावेळी विविध मागण्याचे निवेदन अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना देण्यात आले.



निवेदनात थोर शास्त्रज्ञ, शिक्षण तज्ञ, पर्यावरणप्रेमी सोनम वांगचुक यांचा २२ दिवसांपासून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी उपोषण करत असून केंद्र सरकारने या उपोषणाची दखल घेतली नाही, ही खेदाची व संताप जनक बाब असल्याचे निवेदनात म्हटले आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या नीट व महाराष्ट्रातील लाखो शिक्षकांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या टीईटी पेपर फुटीचे सत्र अत्यंत चिंताजनक आहे. यामुळे प्रामाणिक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डगमगल्याचे म्हटले आहे.नीट पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ राजीनामा द्यावा व यातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी. सोनम वांगचुक यांच्या मागण्यांवर केंद्र सरकारने संवेदनशीलतेने विचार करावा असेही निवेदनात म्हटले आहे.यावेळी शिवसेना उ.बा.ठा गटाचे जिल्हाप्रमुख प्रफुल भोजणे,काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे,शिवसेनेचे परतवाडा शहराध्यक्ष सागर वाटाणे,काँग्रेसचे शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे,शिवसेनेचे ओमप्रकाश दीक्षित,गजानन फिसके,चेतन जवंजाळ,अनिल तायडे,नरेश तायवाडे, आशिष वाटाणे,पोपट घोडेराव,काँग्रेस पक्षाचे राहुल गवई,सागर व्यास,राहुल गाठे,सामाजिक कार्यकर्ते नीलेश फाटकर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# मेळघाट अंधाराच्या विळख्यात!

## दुर्गम गावांतील नागरिकांचे हाल; केरोसीन वितरण पुन्हा सुरू करण्याची मागणी

**धारणी/वार्ताहर**

निसर्गसंपन्न, दाट जंगलांनी वेढलेला आणि दुर्गम भौगोलिक परिस्थिती असलेला मेळघाट आजही अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील शेकडो गावांमध्ये वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिकांचे जनजीवन अक्षरशः अंधारात ढकलले जात आहे. विशेषतः पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनत असून, ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

मेळघाटातील अनेक गावे जंगलाच्या मध्यभागी वसलेली आहेत. रात्रीच्या वेळी अचानक वीज गेल्यानंतर संपूर्ण गाव अंधाराच्या विळख्यात सापडते. अशा वेळी घराबाहेर पडणेही जीवावर बेतणारे ठरते. विषारी साप, विंचू तसेच इतर वन्य प्राण्यांचा धोका वाढतो. अनेक वेळा लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. आपत्कालीन परिस्थितीत आरोग्य सेवा किंवा मदत मिळविणेही कठीण होते.पावसाळ्याच्या दिवसांत वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि जंगल परिसरातील वीजवाहिन्यांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने अनेक गावांमध्ये तासनतास नव्हे तर संपूर्ण रात्र वीजपुरवठा खंडित राहतो. दुर्गम भाग असल्याने दुरुस्तीच्या कामालाही विलंब होतो. परिणामी ग्रामस्थांना अंधारातच रात्र काढावी लागते. याच पार्श्वभूमीवर मेळघाटातील नागरिकांनी राज्य शासनाकडे महत्त्वाची मागणी केली आहे. जोपर्यंत दुर्गम भागात अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित होत नाही, तोपर्यंत प्रत्येक पात्र कुटुंबाला स्वस्त धान्य दुकानामार्फत दरमहा किमान पाच लिटर घासलेट (केरोसीन) उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. ही सुविधा सुरू झाल्यास वीजपुरवठा खंडित झाल्यानंतरही कुटुंबांना सुरक्षितपणे घरात उजेड करता येईल, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.आमदार केवळराम काळे यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन शासन व संबंधित विभागासमोर हा विषय प्रभावीपणे मांडावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर मेलघाटातील जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे माजी राज्यमंत्री तथा विद्यमान आमदार बच्चू कडू यांनीही या प्रश्नात लक्ष घालून प्रशासनाकडून तातडीने ठोस उपाययोजना करून घ्याव्यात, अशीही मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

---

# शाळा महाविद्यालयांमध्ये अजित पवार यांची जयंती साजरी होणार!

## सामान्य प्रशासन विभागाचे १५ जुलै रोजी परिपत्रक जारी

**अमरावती/का.प्र.**



राज्यातील महायुती सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते अजित अनंतराव पवार यांची जयंती आता अधिकृतपणे शासकीय स्तरावर साजरी केली जाणार आहे. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने १५ जुलै २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयानुसार, राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांच्या सूचीमध्ये आता दिवंगत अजित पवार यांच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे.२२ जुलै रोजी राज्यभर पहिली जयंती साजरी होणार आहे.

येत्या बुधवार २२ जुलै २०२६ रोजी राज्यभरात दिवंगत अजितदादा पवार यांची पहिली शासकीय जयंती साजरी केली जाईल. या दिवशी मुंबईतील मुख्य मंत्रालयापासून ते राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना व प्रशासकीय कार्याला अभिवादन केले जाणार आहे.हा आदेश केवळ प्रशासकीय कार्यालयांपुरता मर्यादित नसून राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळा आणि महाविद्यालयांमध्येही लागू करण्यात आला आहे. परिपत्रकातील सूचनेनुसार,२२ जुलै रोजी शाळा-कॉलेजांमध्येही अजितदादांच्या प्रतिमेचे पूजन करून विविध कार्यक्रमांद्वारे त्यांच्या आठवणींना उजाळा दिला जाईल.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी केलेल्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला मान्यता दिली होती. हा कार्यक्रम राज्यभर सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात योग्य नियोजन करावे आणि अंमलबजावणीचे आवश्यक निर्देश द्यावेत, असे सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकात स्पष्ट नमूद केले आहे. अजित पवार यांच्या महाराष्ट्राच्या विकासातील आणि प्रशासनातील महत्त्वपूर्ण योगदानाचा गौरव म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे.

---

## संक्षिप्त

### गौरक्षण स्थळावर हिरव्या चाऱ्याचे दान

**दर्यापूर**-आपल्या हसत मुख चेहऱ्याने संपूर्ण परिसरात परिचित असलेले देविदास पाटील वाळके यांनी आपल्या एकष्टव्या जन्मदिवसाला



हिरव्या चाऱ्याचे दान करून गो पूजा साधली.माहुली (धांडे) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर तीन गाडी हिरवा चारा संपूर्ण स्वखर्चाने अर्पण करून त्यांनी या कार्याची पूर्तता केली.संस्थेचे संस्थापक संचालक प्रा गजानन भारसाकळे यांनी या सेवेत स्वतः शारीरिक सहभाग नोंदवित हिरव्या चाऱ्याची कुटी करून गाय वासरांना दिली . दिवसभऱ्याच्या सेवेनंतर दुपार सत्रात देविदास वाळके यांनी गोपूजन ही केले.या दानकार्याच्या कृतज्ञतेसाठी संस्थेच्या वतीने गोरक्षण संस्थेचे उपाध्यक्ष विजय पाटील धुमाळे ( साखरे ) यांनी देविदास वाळके यांचा शाल श्रीफळ देऊन गौरव केला.सायंकाळी पिठाचे उंडे अर्पण करून तथा तुळशी जवळ दिवा लावून या कार्याची सांगता करण्यात आली.संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे यांनी सर्वांचे यथोचित आदरतिथ्य केले.दैनंदीन गोसेवक अंकुश घरडे,श्रीकृष्ण पोटे व ज्ञानेश्वर गवई यांचे सह विनोद श्रीरंगजी भारसाकळे ( बेलोरा ) व आशिष एकनाथ ठाकरे यांनी या प्रसंगी श्रमदान केले.

### इमोशनल फ्रीडम सेमिनार



**अमरावती-** महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशनच्या फाऊंडर प्रेसिडेंट डॉ रुपाली गोसावी, जनरल सेक्रेटरी डॉ आरती नल्लू,स्टेट कोर कमिटी च्या डॉ स्वाती लबडे-पडोळे यांच्या मार्गदर्शना खाली बिटबॉक्स अकेडमी,हॉटेल ग्रेस इन राजापेठ येथे महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन साठी इमोशनल फ्रीडम सेमिनार घेण्यात आला. कार्यक्रमाला MHFDA च्या अध्यक्षा डॉ. प्रिया मोहोड, सचिव डॉ. स्नेहा पिंजानी, सहसचिव डॉ. वैशाली टेम्भे, डॉ. शितल आचार्य, समिती सल्लागार डॉ. अलका राजपुरिया कमिटी सदस्य डॉ. राणी चौधरी, डॉ. पल्लवी चौधरी, डॉ. प्रियंका गौतम, डॉ. सपना व्यास, डॉ. प्रज्ञा घाटोळ, डॉ. स्नेहल खेरडे उपस्थित होत्या. Indian Hypnosis Academy चे संचालक श्री विशाल चौरपगार यांनी इमोशनल ट्रॅमा, स्ट्रेस मॅनेजमेंट, तानतणाव, Anxiety, Depression, या विषयी अतिशय सुंदर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला डॉ. चंदा निंभोरकर, डॉ. शीतल चौधरी, डॉ.कविता चिंचोळकर,डॉ. माया इंगळे, प्रांजली जोशी,डॉ. माधुरी छवचारिया डॉ.रश्मी चौधरी, डॉ. रंजना पचगाडे, डॉ. सुजाता भगत, डॉ. अश्विनी वानखडे, डॉ. प्राची कुंभालकर डॉ प्रणाली सोनटक्के, डॉ. श्रद्धा घरडे, डॉ. संपदा पवार,डॉ. आरती शहारे, डॉ. कुरेत खान, डॉ. मीनाक्षी गहाणे महिला सदस्य उपस्थित होत्या. आभार प्रदर्शन सचिव डॉ. स्नेहा पिंजानी यांनी केले.

---

# शनिवारी अमरावती येथे अभंगवारी काव्यमहोत्सव

**अमरावती/का.प्र.**

संवेदना बहुद्देशीय संस्था,तसेच परिवर्तन प्रबोधिनी,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर प्राचार्य डॉ.शोभा रोकडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्याने भव्य अभंगवारी काव्यमहोत्सवाचे आयोजन शनिवार २५ जुलै रोजी कांचन रिसॉर्ट, नवसारी रिंगरोड, अमरावती येथे करण्यात आले असून या काव्यमहोत्सवाच्या उदघाटनपर सत्राचे अध्यक्ष डॉ.श्यामसुंदर निकम,ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत अमरावती,स्वागताध्यक्ष सुदर्शनजी गांग, विश्वस्त अखिल भारतीय जैन संघटना, उद्घाटक कांचन उल्हे, ज्येष्ठ साहित्यिक तथा उद्योजिका, अमरावती यांची प्रामुख्याने उपस्थिती असेल.



५० कवींचा सहभाग असणारा हा भव्य अभंगवारी काव्यमहोत्सव एकूण सहा सत्रात पार पडणार असून प्रा. नयना दापूरकर व गजानन काकडे यांच्या सुमधुर स्वरात डॉ.रोकडे लिखीत अभंग गायनाने काव्यमहोत्सवाची सुरुवात होईल. प्रास्ताविक कादंबरीकार विशाल मोहोड उद्घाटनीय सत्राचेसंचालन कवी अजय अडीकने तर आभार आरती नागपुरे मानतील.उद्घाटन सत्राला मुख्य अतिथी आबासाहेब कडू, सुप्रसिद्ध वऱ्हाडी साहित्यिक,विशेष अतिथी प्राचार्य डॉ.शोभा रोकडे,प्रमुख अतिथी रेखा बेलसरे,गजानन काकडे आदी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती राहील.

काव्यमहोत्सवाच्या पहिल्या सत्राचे अध्यक्ष डॉ.शोभा गायकवाड,प्रमुख अतिथी डॉ.राजेंद्र राऊत,समीक्षक दीपक दारव्हेकर,दिलीपसिंह खांबरे यांची उपस्थिती असेल. या सत्राचे संचालन कवी संदीप देशमुख करतील.दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष ॲड. डॉ.सुरेश चापोरकर, मंदा नांदुरकर,संजय माहल्ले, संजीवनी काळे उपस्थिती असेल. संचालन प्रसिद्ध कवी तथा गझलकार विशाल कन्हेरकर करतील. तिसऱ्या सत्राचे अध्यक्ष ॲड.डॉ. नीता कचवे,प्रमुख अतिथी विनोद तिरमारे,उद्धव शहाणे,शुभांगी इंगोले यांची उपस्थिती असेल.संचालन प्रसिद्ध कवी तथा युवा गझलकार सुयोग राजनेकर हे करतील.चौथ्या सत्राचे अध्यक्ष विष्णू सोळंके प्रमुख अतिथी प्रभा आवारे,दिवाकर देशमुख,जयश्री कोटगीरवार कवयित्री यांची उपस्थिती असेल.संचालन प्रसिद्ध कवी किशोर जऱ्हाड करतील.पाचव्या सत्राचे अध्यक्ष कवी खुशाल गुल्हाने,प्रमुख अतिथी शिवांगी वेरूळकर,रंजना कराळे,छाया पाथरे यांची उपस्थिती असेल. या सत्राचे संचालन कवयित्री शीतल राऊत करतील.

---

### वृषाली काळे यांचा सत्कार

**अमरावती**-शहरातील गायनांच्या कार्यक्रमाकरिता प्रसिद्ध असलेल्या जोशी सभागृहात कराओके गायनाच्या माध्यमातून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या व्ही. के. म्युझिकल ग्रुपच्या युवा आयोजिका वृषाली काळे यांनी आयोजित केलेल्या 'अबके सावन में जी डरे...' या बहारदार कराओके गीतांच्या कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल डॉ. गोविंद कासट मित्रमंडळीतर्फे डॉ. चंद्रकांत पोपट व नवोदित निवेदिका शितल केने यांच्या हस्ते त्यांचा शाल व पुस्तक देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला व त्यांना त्यांच्या भावी सांस्कृतिक वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.कराओके गायिका वृषाली काळे यांनी यापूर्वीही यशस्वी कराओके कार्यक्रमांचे आयोजन करून शहरातील गायक व रसिकांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

---

# मेळघाटातील १३,५०० हून अधिक बालकांची होणार हृदय तपासणी

## 'प्रोजेक्ट डीईव्हीए ' अंतर्गत मोफत उपचाराची संपूर्ण व्यवस्था

**चिखलदरा/वार्ताहर**

मुख्यमंत्री जनआरोग्य अभियान अंतर्गत मेळघाटातील बालकांमध्ये जन्मजात हृदयरोगाचे वेळेत निदान होऊन त्यांना मोफत उपचार उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने 'प्रोजेक्ट डीईव्हीए' ही संकल्पना चिखलदरा नगरपरिषदेचे नगरसेवक आल्हाद कलोती यांनी विकसित करून पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्यासमोर सादर केली. प्रस्तावाची दखल घेत बावनकुळे यांनी संबंधित प्रशासकीय व आरोग्य विभागांना या संकल्पनेची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

बालकांमधील जन्मजात हृदयरोग हा वेळेत निदान व उपचार न झाल्यास गंभीर ठरू शकणारा आजार आहे.कर्करोग, क्षयरोग, कुपोषण यांसारख्या अनेक आजारांबाबत समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती झालेली असली तरी बालहृदयरोगाबाबत जागरूकतेचा अभाव आहे. परिणामी अनेक बालके गंभीर अवस्थेत तज्ज्ञ डॉक्टरांकडे पोहोचतात आणि उपचारास विलंब झाल्यास जीवितहानीची शक्यता निर्माण होते.मेळघाटातील प्रत्येक बालकापर्यंत हृदय तपासणी, अचूक निदान आणि मोफत उपचार पोहोचविण्यासाठी 'प्रोजेक्ट डीईव्हीए'ही संकल्पना विकसित करण्यात आली.

प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेऊन पालकमंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अंतर्गत 'प्रोजेक्ट डीईव्हीए' चा समावेश करण्याच्या सूचना दिल्या. तसेच मेळघाटातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांची हृदयरोग तपासणी तातडीने राबविण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. त्यानुसार महसूल विभाग, आरोग्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून मेळघाटातील विद्यार्थ्यांच्या हृदय तपासणीला प्रारंभ झाला आहे.

अभियानाच्या पहिल्या टप्प्यात मेळघाटातील ४९ गावांमधील शाळांमध्ये सुमारे १३,५०० हून अधिक विद्यार्थ्यांची हृदय तपासणी करण्यात येत आहे. प्राथमिक तपासणीमध्ये हृदयरोगाचा संशय आढळलेल्या सर्व विद्यार्थ्यांची स्वतंत्र नोंद करण्यात येत असून, अशा संभाव्य हृदयरुग्णांना २३ जुलै रोजी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात सहभागी करून बालहृदयरोग तज्ज्ञांकडून 2D Echo,आवश्यक इतर हृदय तपासण्या तसेच तज्ज्ञ वैद्यकीय मूल्यांकन करण्यात येणार आहे. अंतिम निदानानंतर आवश्यक त्या बालकांना पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी तातडीने संदर्भित करण्यात येणार आहे.

अभियानामध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती,जिल्हा आरोग्य प्रशासन, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम,आदिवासी विकास विभाग,अमरावतीतील बालरोगतज्ज्ञ,शासकीय व खासगी रुग्णालये,स्थानिक प्रशासन तसेच स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आहे. याशिवाय मुंबई येथील Apollo Hospitals आणि Nelson Hospital यांच्या बालहृदयरोग तज्ज्ञांच्या विशेष टीम या अभियानात सहभागी असून त्यांच्याकडून अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, 2D Echo यंत्रणा, आवश्यक तांत्रिक सहाय्य आणि तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जात आहे.

उपक्रमाला मेळघाटचे आ.केवलराम काळे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा,प्रभुदासजी भिलावेकर यांचे नियोजन व समन्वय, चिखलदरा येथील माजी नगराध्यक्ष राजूभाऊ सोमवंशी यांचे सहकार्य, भाजप गटनेते राजेशजी मांगलेकर यांचा सक्रिय सहभाग तसेच भाजप चिखलदरा शहराध्यक्ष वेदांत शूरपातणे यांचे स्थानिक स्तरावरील समन्वय व नियोजन लाभत असून जिल्हा प्रशासन, आरोग्य यंत्रणा, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि विविध संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.उपचार अथवा शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या सर्व पात्र बालकांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी, आयुष्मान भारत, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच इतर उपलब्ध शासकीय योजनांच्या माध्यमातून सर्व आवश्यक तपासण्या, उपचार व शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उपचारानंतर प्रत्येक बालकाचा नियमित वैद्यकीय पाठपुरावाही करण्यात येणार आहे. आल्हाद कलोती यांच्या संकल्पनेतून तयार 'प्रोजेक्ट डीईव्हीए' हा केवळ हृदय तपासणी कार्यक्रम नसून 'Screening les Surgery' अशी संपूर्ण उपचार साखळी निर्माण करणारा एक सर्वसमावेशक आणि अभिनव उपक्रम आहे. बालकांना वेळेत हृदय तपासणी, अचूक निदान, तज्ज्ञ वैद्यकीय उपचार, मोफत शस्त्रक्रिया आणि उपचारानंतरचा नियमित वैद्यकीय पाठपुरावा एकाच व्यवस्थेत उपलब्ध करून देत मेळघाटातील एकही बालक उपचारापासून वंचित राहू नये, हा या अभियानामागील प्रमुख उद्देश आहे.

# ईव्ही, इथेनॉल इत्यादी इत्यादी...

**पारंपरिक पेट्रोल आणि डिझेल इंधनाचे मर्यादित साठे आणि वाढते प्रदूषण या पार्श्वभूमीवर विजेवर चालणारी वाहने, ईव्ही, हा एक सक्षम आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून समोर आला. भारत सरकारनेही प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि पर्यायी इंधनाला प्रोत्साहन देण्यासाठी ईव्हीच्या प्रसारावर मोठा भर दिला. मात्र, सुरुवातीच्या प्रचंड उत्साहानंतर आता ईव्ही क्षेत्रातील तांत्रिक, व्यावहारिक आणि पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक गुंतागुंतीचे प्रश्न समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर, ईव्ही तंत्रज्ञानाचे वास्तव, त्यासमोरील आव्हाने आणि भविष्यातील शक्यतांचा सखोल वेध घेणे अत्यंत गरजेचे बनले आहे.**



### इतिहास

साधारण १९६० च्या दशकात 'फोर्ड मोटर्स'ने पहिल्यांदा इलेक्ट्रिक वाहनांचे डिझाइन आणि तंत्रज्ञान विकसित केले. परंतु खनिज तेल उत्पादक देश आणि कंपन्यांनी हे क्रांतिकारी तंत्रज्ञान बाजारात येण्यापूर्वीच दाबून टाकले. मात्र, एकविसाव्या शतकात 'टेस्ला' कंपनीने जेव्हा आपली पहिली हाय-टेक इलेक्ट्रिक कार बाजारात आणली, तेव्हा संपूर्ण जगात ईव्हीची एक नवीन लाट आली. यामुळे ग्राहकांना ईव्हीबद्दल कमालीचे आकर्षण निर्माण झाले आणि तिथूनच खऱ्या अर्थाने आधुनिक ईव्ही क्रांतीची सुरुवात झाली.

### पर्यावरणपूरकतेचा दावा

ईव्हीला सामान्यतः प्रदूषणशून्य वाहन म्हणून सादर केले जाते. काही अंशी हे खरे असले तरी यामागील विज्ञान समजून घेणे महत्त्वाचे आहे. अल्बर्ट आइनस्टाइनच्या ऊर्जा संवर्धनाच्या सिद्धांतानुसार, कोणतीही ऊर्जा नव्याने निर्माण करता येत नाही किंवा नष्ट करता येत नाही, तिचे फक्त एका रूपातून दुसऱ्यात रूपांतर करता येते.आपण जेव्हा ईव्ही चालवतो, तेव्हा गाडी स्वतः धूर सोडत नसली, तरी त्या गाडीला चार्ज करण्यासाठी लागणारी वीज औष्णिक विद्युत केंद्रात कोळसा किंवा इतर पारंपरिक इंधने जाळूनच तयार केली जाते. जोपर्यंत आपण वीज निर्मितीसाठी शंभर टक्के सौर, पवन किंवा जलविद्युत ऊर्जा यांसारख्या नूतनीकरणक्षम स्रोतांवर अवलंबून राहत नाही, तोपर्यंत ईव्ही पूर्णपणे १०० टक्के पर्यावरणपूरक आहे, असे म्हणणे दिशाभूल करणारे ठरेल.

### पायाभूत सुविधांची वानवा

भारतात ईव्ही गाड्या वेगाने बाजारात आणल्या गेल्या, परंतु त्या प्रमाणात चार्जिंग पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्याकडे दुर्लक्ष झाले. सद्यःस्थितीत देशभरात धावणाऱ्या अंदाजे दहा लाख वाहनांच्या तुलनेत चार्जिंग स्टेशन्सचे प्रमाण केवळ दोन ते तीन टक्केच आहे. यातही सर्वात मोठी तांत्रिक अडचण सुसंगततेची (इंटरऑपरेबिलिटी) आहे. विसंगतीचे एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणजे, जर एखाद्या ग्राहकाने आपल्या घरात विशिष्ट कंपनीच्या गाडीसाठी बसवलेल्या चार्जिंग पॉइंटवरून दुसऱ्या कंपनीची ईव्ही चार्ज करायचा प्रयत्न केला, तर अनेकदा ती गाडी दहा तास लावून ठेवली तरी अजिबात चार्ज होत नाही. जोपर्यंत भारत सरकार सर्व वाहन उत्पादक कंपन्यांसाठी एकच सामाईक चार्जिंग प्रोटोकॉल बंधनकारक करत नाही, तोपर्यंत चार्जिंग स्टेशन्स उभी करूनही त्याचा सर्वसामान्य ग्राहकांना फायदा होणार नाही.

### वीज वहन प्रणाली आणि ग्रीडवरील ताण

'एल अँड टी'सारख्या कंपनीच्या माजी उच्च अधिकाऱ्यांच्या अनुभवानुसार, भारताच्या ऊर्जा मंत्रालयाकडे पुरेशा प्रमाणात आणि अतिरिक्त वीज निर्मितीची क्षमता उपलब्ध आहे. अडचण वीज निर्मितीची नसून तिच्या वितरणाची आहे. देशातील वीज वहन यंत्रणा, ट्रान्समिशन टॉवर्स आणि वितरण वाहिन्या अजूनही तितक्या सक्षम झालेल्या नाहीत. आजच्या काळातही ग्रामीण भागात विजेचे मोठे चढ-उतार आणि भारनियमन पाहायला मिळते. अशा अस्थिर विजेवर हाय-व्होल्टेज ईव्ही चार्जिंग स्टेशन्स चालवणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे. विजेच्या निकृष्ट दर्जामुळे बॅटरी आणि चार्जर निकामी होण्याचा मोठा धोका असतो. याव्यतिरिक्त, पेट्रोल किंवा डिझेल भरण्यासाठी जेमतेम ५ ते १० मिनिटे लागतात. याउलट, ईव्ही चार्ज करण्यासाठी तासन् तास वाट पाहावी लागते. हा वेळेचा अपव्यय व्यावसायिक आणि वैयक्तिक स्तरावर ईव्हीच्या प्रसारातील मोठा अडथळा ठरत आहे.

### बॅटरीचे आयुष्य

ईव्हीमधील सर्वात महत्त्वाचा आणि महागडा घटक म्हणजे त्याची लिथियम-आयन बॅटरी. कंपन्या या बॅटरीचे आयुष्य साधारण तीन ते साडेतीन वर्षे असल्याचा दावा करतात. परंतु, युरोपीय देशांमध्ये बॅटरीचे निम्मे आयुष्य संपताच ती बदलण्याची शिफारस केली जाते. अशावेळी या अर्धवट वापरलेल्या आणि निकामी झालेल्या लिथियम-आयन बॅटऱ्यांची विल्हेवाट लावणे, हे सर्वात मोठे डोकेदुखीचे कारण बनले आहे. लिथियम-आयन बॅटरी ही रासायनिकदृष्ट्या अत्यंत घातक असून ती नष्ट करणे अवघड आणि खर्चीक काम आहे. यावर युरोपीय देशांनी एक नामी युक्ती शोधली आहे. ते या अर्धवट आयुष्य संपलेल्या बॅटऱ्या भारतासारख्या देशांमध्ये पाठवतात. आपल्या बाजारपेठेत या जुन्या बॅटऱ्यांवर प्रक्रिया करून किंवा बनावट ब्रँण्डिंग करून त्या विकल्या जाण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे भारतीय ग्राहकाला मूळ बॅटरीची उत्कृष्ट सेवा मिळत नाही आणि सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. तसेच ईव्हीच्या सुरक्षेसाठी महत्त्वाची असणारी बॅटरी मॅनेजमेंट सिस्टीम आजही चीनमधून आयात केली जाते. बॅटरीच्या बाबतीत संपूर्ण आत्मनिर्भर झाल्याशिवाय भारताला ईव्ही क्षेत्रात महासत्ता बनणे कठीण आहे.

### पावसाळा आणि धोके

भारतातील रस्ते आणि पावसाळ्यातील पाणी साचण्याची समस्या सर्वश्रुत आहे. साचलेले पाणी वाहनांच्या टायरच्या पातळीच्या वर गेले, तर पारंपरिक इंजिन बंद पडण्याचा धोका असतो. मात्र, ईव्हीच्या बाबतीत हा धोका अधिक गंभीर आणि प्राणघातक ठरू शकतो. ईव्हीमध्ये अत्यंत उच्च दाबाचा विद्युत प्रवाह चालू असतो. पाण्यात गाडी अडकल्यास शॉर्ट सर्किट होऊन संपूर्ण गाडीत वीज उतरण्याचा किंवा आग लागण्याचा धोका पारंपरिक वाहनांच्या तुलनेत अनेक पटीने जास्त असतो.

### भविष्यातील कल

पुढील पाच वर्षांत भारतातील ईव्ही बाजारपेठ सध्याच्या तुलनेत दुप्पट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, हा विस्तार प्रामुख्याने दुचाकी आणि तीनचाकी वाहनांच्या क्षेत्रात अधिक दिसेल. चारचाकी वाहनांच्या तुलनेत दुचाकी वाहने घरामध्ये किंवा सामान्य सॉकेटवर सहज चार्ज करता येतात. तसेच त्यांचा वापर प्रामुख्याने शहरांतर्गत कमी अंतराच्या प्रवासासाठी होत असल्याने ग्राहकांना चार्जिंग संपण्याची किंवा अडकून पडण्याची भीती नसते. लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी मात्र अजूनही डिझेल आणि पेट्रोल हेच विश्वासू पर्याय ठरत आहेत.

### आताच एवढी चर्चा का?

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणच्या धोरणाची सुरुवात वस्तुतः २००६-०७ मध्ये झाली. सुरुवातीला पेट्रोलमध्ये केवळ पाच टक्के इथेनॉल, ई-५, मिसळण्यास परवानगी देण्यात आली होती. इंधनाच्या आयातीवर होणाऱ्या अब्जावधी डॉलरची बचत व्हावी, हा त्यामागचा मुख्य हेतू. गेल्या काही वर्षांत इथेनॉलमिश्रणाची ही मर्यादा वेगाने वाढवून आता थेट २० टक्क्यांवर आणण्यात आली आहे. मुंबई आणि ठाणे परिसरात १०० टक्के तर महाराष्ट्रात ९० टक्के पेट्रोल पंपांवर गेल्या दोन वर्षांपासून थेट ई-२० पेट्रोलच विकले जात आहे. त्यामुळे वाहनधारकांना या इंधनाच्या त्रास तेव्हाच जाणवायला हवा होता. आताची चर्चा केवळ राजकीय हेतूने प्रेरित असावी, असा कयास या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला आहे.

### ग्राहकांची बचत की...

इथेनॉलच्या वापरामुळे पेट्रोल स्वस्त होईल आणि ग्राहकांचे पैसे वाचतील, असा दावा केला जातो. परंतु वास्तव पूर्णपणे वेगळे आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा दर आणि त्या तुलनेत इथेनॉल मिश्रणातून विकले जाणारे इंधन यांमुळे नेमकी किती डॉलर्सची बचत झाली, ही माहिती तेल कंपन्या कधीही जाहीर करत नाहीत. तज्ज्ञांच्या मते, जर आपण पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळत असू, तर किमान १५ टक्के तरी थेट बचतीचा लाभ ग्राहकांना मिळायला हवा. मात्र, बाजारात पेट्रोलचे दर कमी न होता उलट वाढतच आहेत. त्यामुळे ग्राहकांना प्रत्यक्ष काय फायदा होतो आहे, हे सांगणे कठीण आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ग्राहकांकडे आता कोणताही पर्यायत उरलेला नाही. ग्राहकाला ई-२० नको असेल, तर साधा पेट्रोलचा पर्याय उपलब्ध; नाही. मूळ पेट्रोल ई-२०च असते.

### तांत्रिक धोका

सर्वसामान्य वाहनांच्या संदर्भात इथेनॉलचा सर्वात मोठा धोका म्हणजे त्याचा पाण्याशी येणारा संपर्क. रासायनिकदृष्ट्या इथेनॉल हे पाण्याला आकर्षित करणारे असते. ई-२० पेट्रोलच्या संपर्कात पाण्याचा अंश आला तर इथेनॉल रासायनिक प्रक्रिया करून संपूर्ण पेट्रोललाच पाण्यात रूपांतरित करते. म्हणजेच पेट्रोलचे गुणधर्म नष्ट होऊन ते संपूर्ण मिश्रण निरुपयोगी पाणी बनते. पावसाळ्यात दुचाकींमध्ये पाणी जाण्याचे प्रमाण जास्त असल्याने हा धोका वाहनचालकांसाठी अत्यंत गंभीर ठरणार आहे.

### पेट्रोल पंपांवरील यंत्रणेचे नुकसान


इथेनॉल केवळ गाड्यांचेच नाही, तर पेट्रोल पंपांवरील यंत्रणेचेही मोठे नुकसान करत आहे. पेट्रोल पंप उभारणी आणि देखभालीतील तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार मशिनरी बदलण्याचा अवाढव्य खर्च हा त्यातला चिंतेचा मुद्दा ठरतो. ई-५चे तंत्रज्ञान ई-१०ला चालले नाही. त्यामुळे पंपांवरील डिस्पेंसिंग युनिट्स आणि मशिनरी बदलावी लागली. आता ई-२० मुळे पुन्हा नवीन मशिनरी आणावी लागली आहे. इथेनॉलच्या तीव्रतेमुळे पंपाच्या अंतर्गत भागातील रबर पाइप, गॅस्केट्स आणि सील्स खराब होतात, हे प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध झाले आहे.

**- अमृत जोशी**

# 'सोन्या चांदीचा देव त्याले चोराचं भेव'

**अ**योध्येच्या राम मंदिरातील देणगी अपहाराचा मुद्दा सात जून रोजी समोर आला आणि संपूर्ण देशात त्याची चर्चा झाली. यातून मंदिर प्रशासनाबाबतचे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले.या प्रकरणात पन्नास लोक देणगीची रक्कम मोजण्याच्या कामी असत. त्यापैकी आठ जणांना पोलिसांनी अटक केली असून त्यांच्या पैकी सहा जणांचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये आर्थिक अपहाराचे स्पष्ट पुरावे दिसत आहे.अनेक श्रद्धाळू गोरगरीब व श्रमिक लोक सुद्धा आपल्या कष्टाची कमाई दानपेटीत टाकतात. या लांच्छनास्पद घटनेमुळे मात्र समाज मन ढवळून निघाले आहे. कुंपणच शेत खात असेल तर विश्वास कुणावर ठेवावा असे झाले आहे.मोठमोठ्या नामांकित मंदिरांमध्ये ह्या घटना आता सामान्य झाल्या आहेत. बालाजी मंदिराचा बुंदीच्या लाडूचा प्रश्न अद्यापही न्यायप्रविष्ठ आहे,शिर्डी सारख्या मंदिरात विश्वस्तांच्या जागेसाठी नेहमीच चूरस पाहायला मिळते.शेगावचे गजानन महाराज मंदिराचा एक अपवाद सोडल्यास हे चित्र सार्वत्रिक झाले आहे.प्रश्न हा पडतो की,देवाला खरेच माणसांच्या पैशाची आवश्यकता आहे काय, तर याचे उत्तर नक्कीच नाही असेच आहे.बरेच लोक देवासमोर नवस बोलतात किंवा मनातील एखादी इच्छा व्यक्त करतात व ती पूर्ण होण्याकरता पैशाचा संकल्प बोलल्या जातो.एका अर्थाने देवाला प्रलोभनच दाखविण्याचा हा प्रकार आहे आणि यातूनच भ्रष्टाचाराची कुरणं तयार होतात.मंदिरातील फक्त दानाची पेटी हटवा, पुजारी व ट्रस्टी आपोआपच तिथून पोबारा करतील.मंदिरात देव नसतो ट्रस्टी आणि पुजाऱ्याचे पोट असते असे म्हटले जाते. गाडगे महाराज म्हणत होते दगडाची गाय दूध देत नाही, दगडाचा वाघ अंगावर धावत नाही तसेच दगडाचा देव सुद्धा तुमच्यावर कधीही रूष्ट होत नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज या थोरामोठयांनी दातांच्या कण्या करून समाज उद्बोधन केले, पण लक्षात कोण घेतो,असेच झाले आहे.

देवाचे अस्तित्व आहे किंवा नाही हा मुद्दा या लेखाचा विषय नाही, मात्र देव या संकल्पनेतून कितीतरी लोक आपापली दुकाने चालवतात.सर्वप्रथम मंदिराचे विश्वस्त मालामाल होतात त्यानंतर पंडित, पुजारी,देवाचे कमी वेळात दर्शन करून देणारे दलाल,आपापल्या परीने आपले उकळ पांढरे करून घेतात,करोडो रुपयांची यातून उलाढाल होते. एखादी व्यक्ती तासनतास रांगेत उभे राहून एकदाचे मंदिरातील मूर्तीजवळ पोहोचल्यावर पुजारी त्याच्या हातातला फुलांचा महागडा हार हिसकावून मूर्तीकडे भिरकावून देतो व प्रसादाचा डबा स्वतःकडे ठेऊन काही सेकंदाच्या आतच त्या भक्ताला तुच्छतेने हाकलून लावतात. मग मूर्तीजवळ जाण्याचा अट्टाहास कशाकरता केला जातो हेच कळत नाही. देव भावाचा भुकेला हेच खरे आहे. प्रसाद, फुलं,अगरबत्ती, चढावा, नवस,नागबळी पूजा यातून केवळ भोळ्या-भाबड्या लोकांना नागवणे हाच एकमेव कार्यक्रम असतो.मध्यंतरी शेगावला फुलांचे विक्रेते मनमानी करत होते.या फुल विक्रेत्यांनी भक्तांकडून हार व प्रसादाच्या निमित्ताने वारेमाप पैसा लाटला.जेव्हा मंदिर प्रशासनाला जागेची अडचण जाणवली तेव्हा ती जागा रिक्त करून पाहिजे होती.तेव्हा मात्र तेच लोक मंदिर प्रशासनावर उलटले शेवटी न्यायालया मार्फतच ती जागा हस्तगत करण्यात आली.महाराजाच्या कृपेने वर्षानुवर्ष फुलं-प्रसाद विकून सुस्थितीत आलेल्यानी असे वर्तन करावे हे खेदजनक आहे.काही धनदांडगे लोक साईबाबांसाठी सोन्याचे सिंहासन दान करतात, जे साईबाबा आयुष्यभर एका दगडावरच बसायचे, दुसरीकडे गाडगेबाबा मातीचे खापर डोक्यावर ठेवत त्या खापराची प्रतिकृती सोन्याची करून गाडगेबाबांच्या मूर्तीच्या हातात देण्याचा काही धनिक विचार करताना दिसतात.थोडक्यात त्या संत महात्म्यांच्या आदर्शाला व तत्वांना हे लोक हरताळ फासतात असेच म्हणावे लागेल.



आता तर देशात सर्वच मंदिरात अफाट संपत्ती आहे, तिची मोजदाद करणे कठीण आहे. केरळमधील पद्मनाभ मंदिर, बालाजी मंदिर, शिर्डीचे साईबाबांचे मंदिर ही नावे वाणगी दाखल सांगता येतील.पद्मनाभ मंदिराच्या खजिन्याचे सातवे दार उघडण्याची अद्याप परवानगी नाही,ते प्रकरण सुद्धा न्यायप्रविष्ठ आहे, कारण अब्ज रुपयाची संपत्ती त्यात पडून आहे.महाराष्ट्रातील शिर्डीच्या मंदिराचे सरासरी उत्पन्न वार्षिक नऊशे कोटी व शेगावचे दीडशे कोटी असल्याचे बोलले जाते. परंतु शेगाव मंदिर प्रशासनाने पंढरपूर,नाशिक ओंकारेश्वर व इतर ठिकाणी भक्त निवासाची उत्तम व्यवस्था केली त्याला कुठेच तोड नाही. शिवाय आनंद सागर मंदिरापासूनची मोफत बससेवा इत्यादीचा आदर्श वस्तूपाठ देशातील सबंध मंदिरांनी गिरवावा असाच आहे.शेगाव व वैष्णव देवी मंदिरात भक्तांनी देवासमोर पैसे ठेवू नये अशी फलके लावली आहेत यावरून तेथील पारदर्शक व्यवहाराचा प्रत्यय येतो नाहीतर कालिकामाता कलकत्ता, बालाजी मंदिर व अशी कितीतरी मंदिरे असतील जेथे श्रद्धाळू लोकांचे भावनिक शोषण केले जाते.


थोडक्यात हल्ली मंदिरात दानानिमित्ताने अमाप पैसा गोळा होत असल्याने ह्या अडचणी उद्भवत आहे.पूर्वी गावाच्या शीवेवर मातामाय, मरीमाय, हनुमान मंदिरे वर्षानुवर्षे उघड्यावर होती, त्यावेळी कुठलाही अनुचित प्रकार होत नव्हता. कालांतराने यात अमाप पैशाचा शिरकाव झाला व सारे चित्र बदलले. वरील सर्व प्रकार चोरांना राजरोसपणे मेवे खाऊ घातल्यासारखे आहे. देव तर भावाचा भुकेला आहे तो तुम्हाला काहीही मागत नाही.आपले दान सतकारणी लागावे यासाठी दानकर्त्यांनी लोकोपयोगी उपक्रम राबविल्यास त्याचे पुण्य अधिक मिळेल व या भामट्यांच्या कारवायांना चाप बसेल. राममंदिर प्रशासनाने आर्थिक अपहारानंतर प्रायश्चित म्हणून ट्रस्ट कडून दहा दिवसाचा शुद्धीकरण विधी आयोजित केल्याचे समजते.अयोध्येतील विविध गुरुकुलांमध्ये दररोज किमान २५१ वेळा विष्णू सहस्त्रनाम स्तोत्राचे पठण केले जात आहे. यासोबत वाल्मिकी रामायनाचेही पठण सुरू आहे. थोडक्यात सध्या वाल्याचा वाल्मीक करण्याची प्रक्रिया मंदिर प्रशासनाकडून कसोशीने केली जात आहे. देणगी गैरव्यवहारासारख्या गंभीर प्रकरणावर हा उतारा कितपत यशस्वी होईल हे पुढे दिसेलच.

अनेक धनिकांनी हल्ली देवाचा बाजार मांडल्याचे दिसत आहे. जीवनात धनद्रव्याचा लोभ करू नये, एके दिवशी हे सर्व सोडून जावे लागेल, हे गहण तत्त्वज्ञान सांगणारे महाराज सुद्धा एका कथेचे दोन लाख रुपये वाजवून घेतात.१४ वर्षे वनवास भोगलेल्या राम, सीता, लक्ष्मणाचे रामायण सांगणारे कथा वाचक पाच लाख रुपये व विमान प्रवासाचे भाडे आकारतात, आहे ना गंमत! म्हणून श्रद्धाळूनी आता तरी जागे होणे गरजेचे आहे.

शेती प्लॉट बाबतचे मोठमोठे व्यवहार करताना त्या ले-आउट मध्ये मोठमोठाली पारायणे, भागवत, कथावाचन इत्यादी सारखे उपक्रम आयोजित करून धार्मिक वातावरण निर्माण केले जाते. सुरुवातीस मंदिर बांधून लोकांना इमोशनली ब्लॅकमेल केले जाते व त्यातूनच अधिकचा पैसा लाटला जातो. गोरगरीब लोकच देवाची भीती बाळगतात, मोठे धनीक व व्यावसायिक यांनी कितीही लोकांच्या माना मोडल्या तरी देव त्यांचे काहीही वाकडे करत नाही असा समज आहे, यावरून अंधश्रद्धांळुनी योग्य तो धडा घ्यावा असे कळकळीने वाटते.

अनेक गरीब शेतकरी पाच-पन्नास हजाराच्या कर्जापोटी लोकलाजेस्तव आत्मघात करून घेतात हे चित्र फार विदारक आहे. अशांना मदत केल्यास त्यांचे आशीर्वाद मिळतील.अंध-अपंगांच्या शाळांना मदत केल्यास तसेच पद्मश्री शंकरबाबा पापडकर यांच्या वझर सारख्या संस्थांना दात्यांनी मदत केल्यास फार मोठी समाजसेवा घडू शकते.'जे का रंजले गांजले,त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा,देव तेथेची जाणावा' या संत वचनाची आठवण ठेवावी.गाव-खेड्यात अनेक शाळा मोडकडीस आल्या असताना, तिकडे साफ दुर्लक्ष करून मंदिराच्या भिंती सोन्याने मढवल्या जात आहे, हे फारच वाईट.डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले इत्यादी महामानवांना असला दिखाऊ विकास कधीच अपेक्षित नव्हता.म्हणून दवाखाने, शाळा, गावातील ग्रंथालय यांना सढळ हातांनी मदत केल्यास मोठे पुण्य पदरी पडू शकते.रक्तदान,वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम,पर्यावरण यासारखे समाज उपयोगी उपक्रम राबविल्यास तुमच्या दानाचा योग्य विनिमय होत असल्याचे समाधान मिळेल. खरंतर देवाला तुमच्याकडून काहीही नको, तुमची श्रद्धा, तुमचा देवाप्रती भाव एवढेच महत्त्वाचे आहे.

**देव भावाचा भुकेला।**
**वैकुंठ सोडूनीया आला।**
**पुंडलिके उभा केला।**
**रूप सुंदर सावळा ।।**



**डॉ राजेंद्र भुयार**
फ्रेंड्स कॉलनी अमरावती
मो.९५०३०४६५५५

# फिल्मी जीवन

**म**नोरंजनाचे एक साधन म्हणून सुरू झालेल्या चित्रपटांचा मनुष्यांच्या जीवनावर इतका खोलवर परिणाम झालेला आहे की आपलेही जीवन फिल्मी स्टाईल व्हावे, आपणही फिल्मी स्टाईल जगावे अशी सुप्त इच्छा लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. त्यामुळेच मग चित्रपटातील नट नट्या जशी वेशभूषा, केशभूषा करतात त्याचीच नक्कल लोकंही करतात. चित्रपटात जसे प्रेम प्रसंग, प्रणय दृश्ये दाखवतात तसेच आपणही करावे असे वाटू लागते. अशाप्रकारे लोकांचे संपूर्ण जीवन फिल्मी होऊन गेले आहे. त्यामुळेच दैनंदिन जीवनातल्या प्रत्येक गोष्टीत काहीतरी फिल्मी स्टाईल हटके करण्याची खुमखुमी आणि खुमारी वाढत चालली आहे. प्रत्येक प्रसंगाचा व्हिडिओ बनविणे, फोटो काढणे आणि ते सोशल मीडियावर टाकणे ह्याची फॅशनच होऊन गेली आहे. अगदी घरात काही खाद्य पदार्थ बनविले तर त्याचेही प्रदर्शन सोशल मीडियावर केले जाते. लोक असे का करतात, का वागतात ह्याचा खोलवर विचार केला तर असे दिसते की त्यांच्या ह्या कृत्यातून त्यांची एकटेपणाची जाणीव व्यक्त होत असते. एखादा चांगला खाद्य पदार्थ बनविला पण तो चाखून त्याची प्रशंसा आणि तो बनविणाऱ्याचे



कौतुक करणारा कुणीतरी पाहिजे नां. पण आत्मकेंद्रित झाल्यामुळे, संयुक्त कुटुंबापासून निव्वळ शरिरानेच नव्हे तर मनानेही फारकत घेतल्यामुळे कौतुक करणारा हक्काचा कुणी उरतच नाही. सोशल मीडियावर नितांत अनोळखी लोक लाइक्स आणि शेअर्सच्या माध्यमातून त्यांची ही कौतुकाची भूक भागवितात. पण ह्या कौतुकात संवेदनांचा आणि भावनेचा ओलावा नसतो.

वाढदिवस साजरे करण्याचा ट्रेंड चित्रपटांपासूनच समाजात रुजला. आता सोशल मीडियाच्या जमान्यात तो अधिकच फोफावला. वाढदिवसाच्या शुभेच्छा हा तर आताशा सोशल मीडियावर सर्वाधिक चालणारा ट्रेंड आहेकधी कधी तर ह्या शुभेच्छांचा उबग येतो. घरातल्या अगदी चिल्ल्यापिल्ल्यांपासून सगळ्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छांचा रतीब रोजच दिवसभर सोशल मीडियावर घातला जातो. एरवी एकमेकांशी कधीही आत्मियतेने न बोललेले लोकही वाढदिवसाच्या शुभेच्छांचे स्टेटस ठेवतात. पण त्यात भावनेचा लवलेशही नसतो हे वास्तव आहे.

प्री-वेड शूटिंग हा त्यातलाच एक प्रकार. चित्रपटातील जग आणि त्यातले व्यवहार खरे मानून तेच आपल्या जीवनात उतरविण्याचे वेड तरुण मुला मुलींत झपाट्याने वाढले आहे. त्यात अनेक धोके असतात तरीही तरुण पिढी आपले वेड सोडायला तयार नाही. वेगवेगळ्या फिल्मी थीमवर हे प्री वेडिंग शूट होत असते. प्री वेडिंग शुटवर समाजात तीव्र स्वरूपाचा विरोध होत असल्याचे पाहून ह्या शूटमध्ये अलीकडे वर वधूच्या कुटुंबांनाही संमिलित करून घेतले जात आहे.

अलीकडे हळदी समारंभात आणखी एक फिल्मी प्रकार सुरू झाला आहे. मंचावर विविध जोडप्यांना बोलावून नृत्य करण्याचा. डीजेवर फिल्मी गाणी लावून त्यावर ही जोडपी वेडेवाकडे हातपाय हलवत आणि फिल्मी स्टाईल अभिनय करत नृत्य करतात. नियोजित वधू वरांनाही मंचावर नाचवले जाते. हा सगळा प्रकार इतका विभत्स आणि उबग आणणारा असतो की पाहणाऱ्याचे डोके ठणकते. उत्तर भारतात एका विवाहसोहळ्यात एक वाह्यात नवरी मुलगी काळा गॉगल लावून नाचत विवाह मंचावर गेली होती आणि तिचा तो व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. बस, उसन्या अकलेच्या लोकांनी तोच प्रकार अनेक लग्नांत सुरू केला आणि आता अनेक मुली त्यांच्या लग्नात हा थिल्लरपणा करत सुटल्या आहेत.यामुळे हिंदू संस्कृती, कुटुंबव्यवस्था आणि समाजव्यवस्था रसातळाला जात आहे ह्याकडे कुणाचेही लक्ष नाही. फिल्मी स्टाईल जगण्याच्या नादात आत्मीयता, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा पूर्णतः आटत जरी गेले नसले तरी ते खूपच मर्यादित होऊन गेले आहे. 'माझा परिवार' ह्या संकल्पनेत आता फक्त नवरा, बायको आणि त्यांची मुले एवढेच उरले आहेत. ही नाती सुद्धा मोबाईलच्या स्क्रीनमध्ये हरवलेली आहेत. सारांश हेच की चित्रपटांनी मनुष्याचे दैनंदिन जीवन पूर्णपणे व्यापून टाकले आहे आणि वास्तविक प्रेम, आदर, आस्था, आपुलकी, परस्पर विश्वास आदि ह्यापासून मनुष्य दूर दूर जात आहे.

**अतुल सोमेश्वर कावळे**
९७३०५३५१९६

# एक मोबाईल, एक डेस्कटॉप आणि स्वतःची मेहनत...

आज 'वर्क फ्रॉम होम' किंवा 'वर्क फ्रॉम एनीव्हेअर' ही संकल्पना सर्वश्रुत झाली आहे. मात्र जगाला या पद्धतीची सवय होण्याच्या कित्येक वर्षांपूर्वी एका भारतीय महिलेने या संकल्पनेवर विश्वास ठेवत स्वतःचा व्यवसाय उभा केला होता. केवळ २५ हजार रुपयांच्या भांडवलावर घरातून सुरू झालेला तिचा हा प्रवास भांडवलाच्या हजारपट पोहोचला आहे. ही कहाणी आहे श्वेता जैन सन्याल यांची.२००८ मध्ये श्वेता यांनी नोकरीचा राजीनामा दिला. स्वतःची कंपनी सुरू करण्यापूर्वी तिने काही ग्राहकांशी चर्चा केली. जर मी उत्तम दर्जाचे उमेदवार उपलब्ध करून दिले, तर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवाल का? असा प्रश्न तिने विचारला. या प्रश्नाला व्यावसायिक कंपन्यांकडून सकारात्मक उत्तर मिळाले.

२००९ मध्ये श्वेताने अवघ्या २५ हजार रुपयांत 'कनेक्शन्स'ची स्थापना केली. ही संपूर्ण रक्कम तिने 'नोकरी डॉट कॉम'च्या डेटाबेसचे सदस्यत्व घेण्यासाठी खर्च केली. आपल्या बेडरूममधूनच तिने काम सुरू केले. तिच्या मते, प्रत्येक कामासाठी कार्यालयात बसणे आवश्यक नसते. याच विचारातून तिने घरातून काम करणाऱ्या महिलांचे नेटवर्क तयार करण्यास सुरुवात केली. कोरोनाच्या कित्येक वर्षांपूर्वीच तिने प्रत्यक्षात 'वर्क फ्रॉम एनीव्हेअर' मॉडेल यशस्वी करून दाखवले. आज श्वेताच्या कंपनीत ११ पूर्णवेळ कर्मचारी आणि १८ फ्रीलान्सर कार्यरत आहेत. काही कंपन्यांनी तर काम देण्यापूर्वी श्वेताच्या कार्यालयाची पाहणी करण्याची अट घातली होती. मात्र, श्वेताने दर्जेदार सेवा आणि



योग्य उमेदवार उपलब्ध करून देत ग्राहकांचा विश्वास जिंकला. कोका-कोला आणि इमर्सन या दोन कंपन्यांपासून सुरू झालेला प्रवास हळूहळू विस्तारत गेला. आज तिच्या ग्राहकांमध्ये अनेक मोठ्या भारतीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश आहे. पहिल्या वर्षी कंपनीचा महसूल ५.७५ लाख रुपये होता. त्यानंतर दरवर्षी व्यवसाय वाढत गेला आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये कंपनीची उलाढाल २.५० कोटी रुपये झाली.

**अर्चना सोंडे**

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# जनमाध्यम

अकोला जिल्हा विशेष

# स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त 'महाआरोग्य सेवा अभियान'
# २२ ते २८ जुलैदरम्यान अकोल्यात मोफत आरोग्य शिबिर

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यभर राबविण्यात येणाऱ्या 'जनसेवा सप्ताह' अंतर्गत 'महाआरोग्य सेवा अभियान' आयोजित करण्यात आले असून, अकोल्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे २२ जुलै ते २८ जुलै या कालावधीत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वसामान्य नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन अकोल्याचे माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मदन भरगड यांनी केले आहे.

## मदन भरगड यांचे नागरिकांना आवाहन
## तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांची तपासणी व उपचार मार्गदर्शन



या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध गंभीर आजारांचे वेळेवर निदान, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन तसेच आवश्यक वैद्यकीय सेवांशी जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू घटकांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून देणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे भरगड यांनी सांगितले. या शिबिरात स्तनाचा कर्करोग, मुखाचा कर्करोग, हर्निया, नेत्रविकार, हाडांचे आजार तसेच इतर गंभीर आजारांवरील तपासणी, निदान व उपचारासाठी तज्ज्ञ डॉक्टर सेवा देणार आहेत. आवश्यक रुग्णांना पुढील उपचारासाठी योग्य मार्गदर्शनही केले जाणार आहे. त्यामुळे आरोग्य तपासणीकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मदन भरगड यांनी सांगितले की, स्व. अजितदादा पवार यांचे संपूर्ण सार्वजनिक जीवन जनसेवा, कार्यक्षम नेतृत्व, दिलेला शब्द पाळण्याची भूमिका आणि लोकहितासाठी सातत्याने कार्य करण्यासाठी ओळखले जात होते. 'कामाचा दादा माणूस' आणि 'शब्दाचा पक्का माणूस' अशी त्यांची प्रतिमा जनमानसात निर्माण झाली होती. शासनाच्या योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात, ही त्यांची भूमिका आजही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे.

ते पुढे म्हणाले की, स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेले हे अभियान केवळ आरोग्य शिबिर नसून समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आरोग्यविषयक जनजागृती, आजारांचे लवकर निदान आणि गरजू रुग्णांना योग्य वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा व्यापक लोककल्याणकारी उपक्रम आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर २२ ते २८ जुलै या कालावधीत 'महाआरोग्य सेवा अभियान' राबविण्यात येत असून, या अभियानाद्वारे सर्वसामान्य नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी, आवश्यक वैद्यकीय सल्ला, विविध तपासण्या, आजारांचे निदान तसेच पुढील उपचारासाठी मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. अकोल्यातील नागरिकांनी या सात दिवसांच्या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्वतःच्या व कुटुंबीयांच्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन माजी महापौर मदन भरगड यांनी केले आहे.

# वर्गात बसण्यास मज्जाव केल्याचा आरोप

## - शिरपूर जि.प. उर्दू शाळेतील प्रकारावरून खळबळ
## - पालकांचा गंभीर आरोप; शिक्षकांचे खंडन, चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■



पातूर पंचायत समितीअंतर्गत पिंपळखुटा केंद्रातील शिरपूर येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत सहावीच्या विद्यार्थ्याला वर्गात बसण्यास नकार देऊन शाळेच्या आवारातून बाहेर जाण्यास सांगितल्याचा गंभीर आरोप विद्यार्थ्याच्या पालकांनी केला आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून शिक्षण विभागाने तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांनी केली आहे.

माहितीनुसार, संबंधित विद्यार्थी शनिवारी नियमितपणे शाळेत गेला होता. त्यावेळी वर्गशिक्षक व त्यांच्या एका सहकारी शिक्षकाने 'तुझा या शाळेत प्रवेश नाही,' असे सांगत विद्यार्थ्याला वर्गात बसण्यास मज्जाव केला. तसेच शाळेच्या आवारातून बाहेर जाण्यास सांगितल्याचा आरोप विद्यार्थ्याच्या आईने केला आहे. शाळेच्या वेळेत विद्यार्थ्याला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोपही पालकांनी केला आहे.

संबंधित विद्यार्थी हा एका विधवा महिलेचा मुलगा असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे संबंधित महिला तक्रार करण्यास पुढे येऊ शकली नसल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले. या घटनेमुळे विद्यार्थी मानसिकदृष्ट्या खचला असून त्याच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे.

या प्रकारामुळे शाळेच्या प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित अशा गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, दोषी आढळणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शिक्षण विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पालक व ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, या आरोपांचे वर्गशिक्षक सोहेल खान यांनी खंडन केले आहे. 'मी सहावीचा वर्ग शिकवत असून विद्यार्थ्याला वर्गात बसण्यास नकार दिल्याचा आरोप पूर्णपणे बिनबुडाचा आहे. शनिवारी असा कोणताही प्रकार घडलेला नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले. आता पालकांचे आरोप आणि शिक्षकांचे स्पष्टीकरण यामुळे नेमकी वस्तुस्थिती काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून शिक्षण विभागाच्या चौकशीकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

### विधवा महिलेच्या मुलासोबत अन्याय?

सहावीत शिकणारा विद्यार्थी हा एका विधवा महिलेचा मुलगा असून वर्गात बसण्यासाठी गेल्यानंतर त्याला प्रवेश नसल्याचे सांगून शाळेच्या आवारातून बाहेर पाठविण्यात आल्याचा आरोप आहे. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्याने संबंधित महिला तक्रार करण्यास धजावू शकली नसल्याचे सांगण्यात येत असून या प्रकारामुळे विद्यार्थ्याच्या मनावर विपरीत परिणाम झाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली आहे

'मी सहावीचा वर्ग शिकवत असून विद्यार्थ्याला वर्गात बसण्यास नकार दिल्याचा आरोप बिनबुडाचा आहे. शनिवारी असा कोणताही प्रकार घडलेला नाही.'

**सोहेल खान,**
वर्गशिक्षक, जि.प. उर्दू शाळा, शिरपूर

# सुकळी ग्रामपंचायत सचिवांचा अतिरिक्त प्रभार काढण्याची मागणी

## आठ दिवसांत कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■



पातूर पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या सुकळी ग्रामपंचायतीचे सचिव एस. एस. गवई यांच्याकडील अतिरिक्त प्रभार तातडीने काढून नवीन ग्रामसेवकाची नियुक्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत प्रकाश सुधाकर अंभोरे यांनी १४ जुलै रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनानुसार, सचिव एस. एस. गवई यांच्याकडे सुकळी, खानापूर आणि तुलंगा बुद्रुक या तीन ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार असल्याने सुकळी ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज प्रभावीपणे होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामसभा आणि मासिक सभा वेळेवर घेतल्या जात नसल्याने ग्रामस्थांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच ग्रामपंचायतीशी संबंधित आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध होत नसल्याचीही तक्रार निवेदनात करण्यात आली आहे.

याशिवाय ग्रामस्थांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत सन २०२५-२६ या कालावधीत ग्रामपंचायतीत झालेल्या विकासकामांची तसेच ग्रामपंचायतीच्या बँक खात्यांच्या व्यवहारांची आर्थिक चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. सुकळी ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र ग्रामसेवकाची नियुक्ती करून सचिवांचा अतिरिक्त प्रभार तातडीने काढावा, अन्यथा आठ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रकाश अंभोरे यांनी निवेदनातून दिला आहे.

# राजकीय दबावाचा आरोप; रामदास पेठ पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | अकोला ■



### पीडित वृद्धेचा न्यायासाठी संघर्ष; आरोपीवरील कारवाईत विलंब झाल्याचा दावा

शहरातील रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या तपास पद्धतीबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. ६५ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, भास्कर गावंडे (रा. अडोशी) याने तिच्यावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करत मंगळसूत्र हिसकावल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतरही आरोपीविरुद्ध तातडीने कठोर कारवाई झालेली नसल्याचा आरोप पीडितेकडून करण्यात आला आहे.

तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, घटनेनंतर आरोपीला अटक करण्याऐवजी चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावले जात असल्याने तपासाच्या गतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच कथितरित्या हिसकावलेले मंगळसूत्र विकून पुरावे नष्ट होण्याची शक्यता असल्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रकरणात काही लोकप्रतिनिधींकडून आरोपीच्या बाजूने पोलिसांवर दबाव आणला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत स्तरावर कोणतीही पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या दाव्यांची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे. दरम्यान, संबंधित गुन्ह्याची प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवून घेण्यासाठी पीडित महिलेला पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन करावे लागल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर उशिरा रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, त्यानंतरही आरोपीविरोधात अपेक्षित कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे सांगितले जात आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या तपास पद्धतीबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. पीडितेला न्याय मिळावा, तसेच प्रकरणाचा निष्पक्ष आणि वेगवान तपास करून सत्य समोर आणावे, अशी मागणी होत आहे.

# महिला शेतकरी सविताताई महल्ले यांची आकाशवाणीवर झेप

**अकोला :** अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या दुधलम गावातील महाराष्ट्र शासन व अकोला जिल्हा परिषदेच्या वतीने 'उत्कृष्ट महिला शेतकरी' पुरस्काराने सन्मानित प्रगतिशील महिला शेतकरी सविताताई उद्धवराव महल्ले यांची प्रेरणादायी मुलाखत २३ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता आकाशवाणी अकोला केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या लोकप्रिय 'किसानवाणी' या कार्यक्रमात श्रोत्यांच्या भेटीला येणार आहे.

# हेडा एवं इंगळे यांना टॅली एमएसएमई पुरस्कार

**अकोला :** स्थानीय उद्योग सोमनाथ पल्सेसचे संचालक दिलीप हेडा आणि व्ही.के. बायोफ्यूल उद्योगचे संचालक विजय इंगळे यांना मानाचा टॅली एमएसएमई पुरस्कार प्राप्त झाला. संपूर्ण विदर्भतून या राष्ट्रीय सन्मानासाठी केवळ सोमनाथ पल्सेस आणि अकोल्यातील व्ही.के. बायोफ्यूल यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

**Change In Name**
I Have Changed My Name From
PRADEEPKUMAR RADHESHAM GRAWAL -TO-
PRDEEP RADHESHYAM AGRAWAL
Passport No :- L2578888 My Residential Address in:- Anand Bhavan 1st floor raj Rajpurohit road akola 444001

**Change In Name**
I Have Changed My Name From
DEWANGANA JAGANNATH RAJUSKAR -TO-
VAISHALI MAHADEV THOSARE
My Residential Address in:- Bhagirathi Nagar Near Narhari Maharaj Mandir Gudadhi Akola 444005

## अकोला महानगरपालिका, अकोला
## मध्यवर्ती भांडार विभाग

**निविदा सुचना क्र. १ (सन २०२६-२७) (पहिली वेळ)**

अकोला महानगरपालिकेच्या विविध विभागाकरिता सन २०२६-२७ या वर्षाकरिता लागणारे नमूने छपाई करून पुरविणे बाबतचे दरपत्रके बोलविण्यात येत असून या बाबतची सविस्तर माहिती खालील दिलेल्या अकोला महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर आणि मध्यवर्ती भांडार विभाग, मनपा कार्यालय येथे उपलब्ध असून ईच्छुकांनी सदर संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**प्र. उपायुक्त (विकास)**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/म.भा.वि./२८/२०२६,
मध्यवर्ती भांडार विभग, अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २०/०७/२०२६

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे गोपाल लक्ष्मन भट रा. मु. फ्ल्याट क्र. १, लीला हायीट, तापडिया नगर, ता. जी. अकोला यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. ३२१३ दिनांक ०६/०८/२००४ या क्रमाकाचे मूळ रजी. खरेदी खत दिनांक १०/०७/२०२६ रोजी क्षेरोक्स काढण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला या परिसरात गेले असता तेथील परिसरात हरवले आहे त्याबाबत गोपाल लक्ष्मन भट यांनी दि. १८/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे दहत्हा तक्रार दाखल केली आहे, त्याचे तक्रार क्र. १९३७३००८०७२६०००५९ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर १० दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- २०/०७/२०२६

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५९३८२४२

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०५९/२०२६ — प्रोसेस नं.८६५४/२०२६
चौ.ता. १८/०८/२०२६ — दिनांक : १०/०७/२०२६

**अर्जदार :** १. नजमा बी साहेब खान रा. ताजनगर, युसुफ लीडर यांच्या घराच्या बाजुला, खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. सलिम खान साहेब खान रा. ताज नगर बोर्ड जवळ, खैर मोहम्मद प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ३. नदीम खान साहेब खान रा. प्लॉट नं. ३१, ए १ पॅराडाइझ कॉलनी, गंगा नगर, वाशिम रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. नईम खान साहेब खान रा. मॉर्डन इंग्लिश स्कुल जवळ, गंगा नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : साहेब खान दुले खान
**पत्ता :-** रा. ताज नगर बोर्ड जवळ, खैर मोहम्मद प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९४२०८४०७००

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत साहेब खान दुले खान यांचे दि. १९/०१/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक. रची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११०२/२०२६ — प्रोसेस नं.८९२२/२०२६
चौ.ता. २४/०८/२०२६ — दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. सरला अशोक देशमुख रा. न्यू भारती प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९०७५४७८२०७ २. सौ. प्रिती अतुल इंगळे रा. मु. सिरसगाव देशमुख, पो. गरडगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक निळकंठराव देशमुख
**पत्ता :-** रा. न्यु भारती प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९०७५४७८२०७

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक निळकंठराव देशमुख यांचे दि. २६/०१/२००२ रोजी रेवती हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला

## जाहीर सूचना

आम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार विनोद राजाराम राठोड, रा. बार्शीटाकळी, जि. अकोला यांच्या मालकीची मौजा - बार्शीटाकळी, जि. अकोला येथील शेत सर्वे नं. २९५/४ मधील प्लॉट नं. ३१ क्षेत्रफळ १५० चौ. मी. (१६१४ चौ. फू.) ही मालमत्ता आहे. यासंबंधीत असलेले जूने खरेदीखत ज्याचे वर्णन -

१. खरेदीखत दस्त क्र. १४१७/२०१९ (बार्शीटाकळी) दि. ०५/०७/२०१९ घेणार जहागीर खान हाजी मुनाफ खान देणार १. मोहम्मद सलीम अब्दुल कदीर व २. सय्यद रफीक सय्यद हाफिज.

२. खरेदीखत दस्त क्र. २८९/२०१२ (बार्शीटाकळी) दि. ०३/०२/२०१२ घेणार १. मोहम्मद सलीम अब्दुल कदीर व २. सय्यद रफीक सय्यद हाफिज देणार बाळकृष्ण गणपतराव कुंबरे.

सदर मुळ खरेदीखत माझे पक्षकाराजवळून हरवले आहे त्यासंबंधी रीतसर तक्रार सुद्धा माझे पक्षकार यांनी पोलिस स्टेशन बार्शीटाकळी येथे दिलेली आहे. तरी ज्या कुणाला सदर खरेदीखत सापडले असेल त्यांनी मला खाली दिलेल्या मोबाइल नंबरवर किंवा पत्त्यावर संपर्क साधावा.

कार्यालय – 'श्री', भागवत नगर, यशवंत लॉन च्या मागे, साई नगर, अमरावती.
मो. क्र. ९६६५७८६६७६
अमरावती
दिनांक : १९/०७/२०२६

**ॲड. पंकज एन. ठाकरे**
एमबीए, एलएलबी

## जाहीर नोटीस

**वि. सह. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) मुर्तिजापूर, जि. अकोला यांचे न्यायालय (श्री सुरवसे साहेब)**

आर. एम. जे. सी. क्रमांक २१३/२०२६ — प्रोसेस नं.२०३५/२०२६
चौ. ता. १२/०८/२०२६ — दिनांक : १०/०७/२०२६

**अर्जदार :** १. शोभाबाई किसण उर्फ श्रीकिसण अग्रवाल, वय ७१ वर्ष, २. पूनम धिरज अग्रवाल, वय ३९ वर्ष, ३. प्रेम धिरज अग्रवाल, वय ११ वर्ष, सर्व रा. सराफा लाईन, स्टेशन विभाग, मुर्तिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत धिरज श्रीकिसण अग्रवाल, रा. सराफा लाईन, स्टेशन विभाग, मुर्त्रिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला यांचे वारस आहे. उपरोक्त नमुद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरीता चौकशी तारीख दि. १२/०८/२०२६ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी १२/०८/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत / आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, मुर्तिजापूर

## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मूर्तिजापूर, जि. अकोला यांचे न्यायालय (श्री सबनिस साहेब)**

आर. एम. जे. सी. क्रमांक १९४/२०२६ — प्रोसेस नं.२०४३/२०२६
दिनांक : १३/०७/२०२६

**अर्जदार :** १. प्रमोद गोपालराव पाचकवडे, वय ६२ वर्ष, २. संतोष गोपालराव पाचकवडे, वय ५२ वर्ष, दोन्ही रा. कुरुम, ता. मूर्तिजापुर, जि. अकोला, ३. प्रतिभा डिगांबर बानवाकोडे, वय ५७ वर्ष रा. अंबिका नगर, पी. के. व्ही. कॉलनी, मलकापूर, ता. मलकापुर, जि. अकोला, ४. जयश्री डिगांबर अवलिनकर, वय ५५ वर्ष, रा. मातोळा, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत गोपाळाराव फकीरजी पाचकवडे व इंदुबाई गोपाळराव पाचकवडे, रा. मु. पो. कुरुम, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला यांचे वारस आहे. उपरोक्त नमूद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरीक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरीता चौकशी तारीख दि. ३०/०७/२०२६ ही ठेवण्यात आलेली आले.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी ३०/०७/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत / आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक १३/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, मूर्तिजापूर

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०६८/२०२६ — प्रोसेस नं.८९२५/२०२६
चौ.ता. २४/०८/२०२६ — दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. विद्या भास्कर सांगुनवेढे २. वैभव भास्कर सांगुनवेढे ३. दिपक भास्करराव सांगुनवेढे सर्व रा. वानखडे नगर, समता शाळेजवळ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भास्करराव शेषराव सांगुनवेढे
**पत्ता :-** रा. वानखडे नगर, समता शाळेजवळ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भास्करराव शेषराव सांगुनवेढे यांचे दि. १९/०३/२०२६ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### वीजप्रवाही कुंपणामुळे मृत्यू

**वर्धा-**वाघेडा शिवारात वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी कुंपणात वीज प्रवाहित केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या विद्युतप्रवाही कुंपणाचा स्पर्श झाल्याने विशाल चंद्रकुमार पवार यांचा मृत्यू, तर महेश राऊत जखमी झाला. तिघे जण जंगली वराहाचा पाठलाग करत असताना ही घटना घडली. चौकशीत शेतातील कुंपणात थेट वीज सोडण्यात आल्याचे निष्पन्न झाले. मानवी जीवितास धोका निर्माण होईल, याची कल्पना असूनही हा प्रकार केल्याचा ठपका ठेवत समुद्रपूर पोलिसांनी शेतकरी शंकर बापूराव सूर्यवंशी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### अवैध रेती वाहतुकीवर धडक

**वर्धा-**हिंगणघाट पोलिसांनी दाभा टी-पॉईंट परिसरात कारवाई करत रेतीने भरलेला ट्रॅक्टर पकडून ६ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. रेतीची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी नाकेबंदी केली. तपासात रेतीची कोणतीही वैध परवानगी नसल्याचे स्पष्ट झाल्याने ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती जप्त करण्यात आली. या प्रकरणी अल्पवयीन चालकासह हर्षल गजानन झाडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, कापसी घाटातूनही रेती चोरी होत असल्याचे उघडकीस आले असून अल्लीपूर पोलिसांनी स्वतंत्र कारवाई करत ६.०७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

### पैशाच्या वादातून युवकास मारहान

**वर्धा-**पैशाच्या व्यवहारावरून झालेल्या वादाचे हिंसक रूप धारण झाल्याची घटना वाढोणा येथे घडली. रोषण बापुराव लोखंडे यांच्याशी पैशाच्या कारणावरून वाद घालून आनंद भांगे याने त्यांच्या डोक्यावर वीट मारल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात रोषण लोखंडे जखमी झाले. जखमीच्या तक्रारीवरून आर्वी पोलिसांनी आनंद भांगे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. किरकोळ कारणावरून वाढणाऱ्या हिंसक घटनांमुळे परिसरात चिंता व्यक्त होत असून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

### दारूच्या नशेत दगडाने हल्ला

**वर्धा-**लाहादेवी येथे किरकोळ वादातून दारूच्या नशेत असलेल्या व्यक्तीने युवकाच्या कपाळावर दगड मारून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. संतोष उईके याने राजकुमार तुमडू उईके यांच्यावर अचानक हल्ला केला. कपाळावर गंभीर दुखापत झालेल्या राजकुमार यांच्यावर उपचार सुरू आहेत. जखमीच्या तक्रारीवरून आर्वी पोलिसांनी संतोष उईकेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून घटनेचा तपास सुरू आहे.

### रुग्णालयात चाकूसह फिरणारा ताब्यात

**वर्धा-**जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात हातात चाकू घेऊन संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या व्यक्तीला शहर पोलिसांनी तातडीने ताब्यात घेतले. नितीन रामचंद्र भिसे असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून चाकू जप्त करण्यात आला. रुग्णालयातील रुग्ण व नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केला. आरोपीविरुद्ध शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे.

### कीटकनाशक प्राशन केलेल्या तरुणाचा मृत्यू

**वर्धा-**फत्तेपूर येथील ३० वर्षीय आकाश प्रमोद राजुरकर यांचा कीटकनाशक प्राशन केल्यानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला. प्रकृती बिघडल्याने कुटुंबीयांनी त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून कीटकनाशक प्राशनाचे कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

### प्रतिबंधित तंबाखूसह १.६४ लाखांचा माल जप्त

**वर्धा-**अन्न व औषध प्रशासनाने पोहणा येथे धडक कारवाई करत प्रतिबंधित तंबाखू व पानमसाल्याचा १ लाख ६४ हजार रुपयांचा साठा जप्त केला. अन्न सुरक्षा अधिकारी पियुष मानवतकर यांनी वडनेर पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या प्रकरणी रोहित त्रिलोकचंद नाहर व अन्य एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मालाची तपासणी सुरू असून प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीविरोधात कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

### जुनी नोट फाडून तरुणाला मारहाण

**वर्धा-**गव्हा कोल्ही पारधी बेडा येथे पैशाच्या कारणावरून वाद होऊन एक हजार रुपयांची जुनी नोट फाडल्यानंतर तरुणाला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. गोविंदा जंगु पवार यांना मारहाण झाल्याची तक्रार त्यांनी पोलिसांत दिली. या प्रकरणी शंकर कुटारकर याच्याविरुद्ध समुद्रपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा तपास सुरू आहे.

# राज्यात वाघांची दणदणीत वाढ, संख्या ६०० पार जाण्याची शक्यता!

## मेळघाटची मोठी झेप, विदर्भ ठरला व्याघ्रसंवर्धनाचा बालेकिल्ला

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्रातील जंगलांमध्ये वाघांची संख्या लक्षणीय वाढल्याचे संकेत २०२६ च्या अखिल भारतीय व्याघ्रगणनेच्या प्राथमिक निष्कर्षांतून समोर आले आहेत. वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील वाघांची संख्या ६०० ते ६२५ दरम्यान पोहोचली असून अंतिम अहवाल जुलै २०२७ मध्ये प्रसिद्ध होणार आहे. या प्राथमिक आकडेवारीमुळे राज्यातील व्याघ्रसंवर्धनाला मोठे यश मिळाल्याचे स्पष्ट होत आहे.

२०२२ च्या व्याघ्रगणनेत महाराष्ट्रात ४४४ वाघांची नोंद झाली होती. त्यानंतरच्या चार वर्षांत विविध व्याघ्रप्रकल्प आणि वनक्षेत्रांमध्ये वाघांची संख्या वाढली आहे. मेळघाट, गडचिरोली, ब्रह्मपुरी, उमरेड-करांडला आणि नवेगाव-नागझिरा परिसरात सर्वाधिक वाढ नोंदविण्यात आली आहे.

राज्यातील सर्वाधिक प्रसिद्ध ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातील वाघांची संख्या सुमारे १०० च्या आसपास स्थिर राहिली असली, तरी मेळघाट व्याघ्रप्रकल्पाने मोठी झेप घेतली आहे. २०२२ मध्ये ५० ते ६० वाघ असलेल्या मेळघाटमध्ये आता ९० ते १०० वाघ असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



गडचिरोली जिल्ह्यात वाघांची संख्या २२ ते २३ वरून सुमारे ४० पर्यंत पोहोचली आहे. ब्रह्मपुरी वनक्षेत्रात सुमारे ७०, नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पात २० ते २५, तर नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्रप्रकल्प, उमरेड-करांडला अभयारण्य आणि प्रादेशिक वनक्षेत्र मिळून सुमारे ५० वाघ असल्याचे दिसून आले आहे. उमरेड-करांडला परिसरात २०२२ मधील सहा वाघांची संख्या आता १७ ते १८ पर्यंत वाढली आहे. पेंचमध्ये मात्र ४० ते ४५ वाघांसह स्थिती स्थिर आहे. बोर व्याघ्रप्रकल्पात ८ ते १०, तर भंडारा-गोंदिया जिल्ह्यांत मिळून सुमारे १५ वाघांची नोंद झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातही सकारात्मक चित्र दिसून येत आहे. सह्याद्री व्याघ्रप्रकल्पात वाघांची हालचाल वाढली असून राधानगरी-सह्याद्री पट्ट्यात नऊ, तर काली-कोल्हापूर परिसरात १५ वाघ आढळल्याची प्राथमिक माहिती आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा-टीपेश्वर परिसरात सुमारे ३५, तर मुक्ताई-भवानी परिसरात पाच ते सहा वाघ असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. राज्यातील व्याघ्रसंवर्धनाच्या यशामुळे महाराष्ट्र पुन्हा देशातील आघाडीच्या व्याघ्र राज्यांमध्ये अधिक भक्कमपणे स्थान मिळविण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे चित्र आहे.

# बहिणीच्या वादातून मुलाने वडिलांवर वीट फेकली

**वर्धा-**आर्वी नाका परिसरात कौटुंबिक वाद हिंसक बनला. बहिणीने कामधंदा करण्याचा सल्ला दिल्याने संतप्त झालेल्या मुलाने तिच्याशी वाद घातला. हा वाद सोडविण्यासाठी आलेल्या वडिलांवरच वीट फेकून त्यांना जखमी करण्यात आले. निजाम शेख यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी तोहसीफ शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा तपास सुरू आहे.

### बहिणीशी का बोलतो’ म्हणत तिघांकडून मारहाण

**वर्धा-**सावंगी मेघे येथील झिकुल कॅफेजवळ ‘बहिणीशी का बोलतो’ या कारणावरून युवकाला तिघांनी बेदम मारहाण केली. ओम धनराज पुरी यांना अनिकेत जाधव व त्याच्या दोन साथीदारांनी मारहाण करून जखमी केल्याची तक्रार आहे. सावंगी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### भरधाव कारची दुचाकीला धडक

**वर्धा-**आर्वी-वर्धा मार्गावरील मोरांगणा येथील पेट्रोलपंपासमोर भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार तुळशीराम मधुकर चौव्हाण गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमीच्या तक्रारीवरून संबंधित कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## पेपरफुटीविरोधात रोहणा ग्रामस्थ आक्रमक

# शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**आर्वी/जनमाध्यम**

शिक्षण व्यवस्थेतील वाढता गोंधळ आणि वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांविरोधात आर्वी तालुक्यातील रोहणा येथील ग्रामस्थांनी सोमवारी तीव्र निषेध व्यक्त केला. दिल्लीतील जंतर-मंतर येथे पर्यावरणप्रेमी सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देत बसस्थानक परिसरात ग्रामस्थांनी आंदोलन केले. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.



आंदोलनादरम्यान स्वप्नील हिवसे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पेपरफुटीमुळे पाणी फिरत असल्याची खंत व्यक्त केली. विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षेची तयारी करतात. मात्र पेपरफुटीच्या घटनांमुळे त्यांच्या कष्टांवर पाणी फिरते. हा केवळ पेपरफुटीचा प्रकार नसून लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ आहे, असे ते म्हणाले.

सामाजिक कार्यकर्ते प्रवीण गेडे यांनी शिक्षण मंत्रालयासारख्या महत्त्वाच्या विभागात परीक्षा पारदर्शकपणे होत नसतील, तर संबंधितांनी नैतिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे सांगितले. केवळ आश्वासने न देता दोषींवर कठोर कारवाई करून परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सुभाष दिघाडे यांनी सध्याची शिक्षण व्यवस्था कौशल्याधारित न राहता व्यवसायाभिमुख बनल्याची खंत व्यक्त केली. शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कौशल्याभिमुख बदल घडवून आणणे ही काळाची गरज असल्याचे आंदोलकांनी अधोरेखित केले. या आंदोलनात रोहणा येथील माजी उपसरपंच शेख अब्बास, सामाजिक कार्यकर्ते संजय दातीर, प्रवीण गेडे, सुभाष दिघाडे, स्वप्नील हिवसे, प्रफुल गाढवे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक सहभागी झाले. शांततापूर्ण मार्गाने निषेध नोंदवत शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्यासाठी सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलकांनी केली.

# रोठा प्रकरण : मुख्यमंत्र्यांनी दिले फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणीचे निर्देश

## विशेष सरकारी अभियोक्त्यांची होणार नियुक्ती

**वर्धा/जनमाध्यम**

रोठा येथील संतापजनक घटनेची सुनावणी जलद गती न्यायालयात तसेच या प्रकरणात विशेष अभियोक्ता यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी पालकमंत्री तथा राज्याचे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोमवारी केली. सदर बाबीची मुख्यमंत्री फडणवीस यांनी गांभीर्याने दखल घेत विधी व न्याय सचिवांना यासंदर्भात तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

वर्धा तालुक्यातील रोठा येथे १२ वर्षीय बालिकेवर झालेल्या अत्याचार व खूनाच्या अत्यंत संतापजनक आणि मानवतेला काळिमा फासणा-या घटनेची जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी अत्यंत गांभीर्याने दखल घेत सुरुवातीपासूनच या प्रकरणाचा नियमित पाठपुरावा केला. पीडितेला आणि तिच्या कुटुंबीयांना लवकरात लवकर न्याय मिळावा, या उद्देशाने त्यांनी प्रशासन, पोलीस यंत्रणा तसेच राज्य शासन स्तरावर सातत्याने आवश्यक सूचना व निर्देश दिले. घटना उघडकीस आल्यानंतर डॉ. पंकज भोयर यांनी तातडीने जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्याशी संपर्क साधून आरोपीचा त्वरित शोध घेऊन त्याला अटक करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते.

पालकमंत्र्यांच्या निर्देशानंतर पोलीस यंत्रणेने वेगाने हालचाली करत काही तासांच्या आतच आरोपी राहुल मडावी (रा.रोठा) याला अटक करण्यात यश मिळविले. याचबरोबर या गंभीर प्रकरणाची चौकशी कोणत्याही प्रकारचा विलंब न करता पूर्ण करण्यात यावी, दोषारोपपत्र लवकरात लवकर न्यायालयात दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात यावे तसेच तपास अधिक प्रभावी, पारदर्शक आणि सर्वंकष होण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी करण्याचे आदेशही पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले होते. संपूर्ण तपास प्रक्रियेवर त्यांनी सातत्याने लक्ष ठेवून संबंधित अधिका-यांकडून नियमित आढावा घेतला. रोठा येथील या संतापजनक घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली होती. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी व प्रकरणाची फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी व्हावी, यासाठी वर्धेकर रस्त्यावर उतरले होते. या पार्श्वभूमीवर पीडित कुटुंबाला त्वरित न्याय मिळणे अत्यंत आवश्यक असल्याची भूमिका डॉ. पंकज भोयर यांनी सातत्याने मांडली. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा त्वरीत व्हावी, यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या प्रकरणाची सुनावणी जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायालयात करण्यात यावी तसेच विशेष सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती करावी, अशी मागणी केली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन सादर करून या प्रकरणातील संवेदनशीलता, समाजामध्ये निर्माण झालेली तीव्र भावना तसेच पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा, अशी मागणी डॉ. भोयर यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी तात्काळ दखल घेत राज्याचे विधी व न्याय विभागाचे सचिवांना या प्रकरणाची फास्ट ट्रॅक न्यायालयात सुनावणी व विशेष सरकारी अभियोक्ता नियुक्ती करण्याबाबत आवश्यक निर्देश दिले. त्यामुळे या प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रिया अधिक वेगाने पार पडण्याचा मार्ग मोकळा झाला असून पीडितेला न्याय मिळण्याच्या अपेक्षा अधिक बळकट झाल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणात पालकमंत्री तथा राज्याचे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सुरुवातीपासून सक्रिय भूमिका घेत तातडीची पोलीस कारवाई, एसआयटी चौकशी, नियमित आढावा आणि आता फास्ट ट्रॅक न्यायालयात सुनावणीसाठी मुख्यमंत्री स्तरावर केलेला पाठपुरावा यामुळे या प्रकरणाला गती मिळाली आहे.

## बियाणे तक्रारींवर आता झटपट निर्णय

### शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी तालुकास्तरावर तक्रार निवारण समित्या स्थापन

**वर्धा/जनमाध्यम**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेबाबत तक्रारींचे जलद, पारदर्शक आणि निष्पक्ष निवारण करण्यासाठी राज्यभर तालुकास्तरावर तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासकीय आदेश कृषी विभागाने जारी केला असून कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही माहिती दिली.

शेतकऱ्यांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर कृषी विभागाचे पथक सात दिवसांच्या आत संबंधित शेताला भेट देऊन पिकांची आणि कृषी निविष्ठांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. त्यानंतर निश्चित कालावधीत अंतिम अहवाल सादर करून पुढील कारवाई केली जाणार आहे. नवीन समितीचे अध्यक्ष तालुका कृषी अधिकारी असतील. समितीत कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन केंद्रे, कृषी विज्ञान केंद्रे, महाबीज आणि संबंधित कृषी अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे चौकशी तांत्रिकदृष्ट्या सक्षम, निष्पक्ष आणि विश्वासार्ह होईल, असा सरकारचा दावा आहे. तक्रारींच्या चौकशीदरम्यान संबंधित कंपनी आणि विक्रेत्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या खरेदी पावत्यांची पडताळणी केली जाईल तसेच संबंधित बियाण्यांच्या लॉटचे नमुने अधिसूचित प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले जाणार आहेत. दोषी आढळणाऱ्या उत्पादक आणि विक्रेत्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. एखाद्या तालुक्यात तक्रारींची संख्या १०० पेक्षा अधिक झाल्यास अतिरिक्त तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. दर्जेदार बियाणे, खते आणि कीटकनाशके शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावीत तसेच तक्रारींचे वेळेत निवारण व्हावे, यासाठी कृषी विभाग विशेष दक्षता घेणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

# हिंगणघाटाला जिल्ह्याचा दर्जा कधी मिळणार?

## सरकारविरोधात जनक्षोभ; आंदोलनाचा इशारा

**हिंगणघाट/जनमाध्यम**

राज्य सरकारने मान्सून अधिवेशनादरम्यान ११ अतिरिक्त जिलाधिकारी कार्यालये आणि ६७ अतिरिक्त तहसील कार्यालयांच्या स्थापनेबाबत सूचना व हरकती मागविण्याची प्रक्रिया सुरू केली असली,तरी हिंगणघाटसाठी अतिरिक्त जिलाधिकारी कार्यालयाबाबत कोणताही निर्णय न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. हिंगणघाटला जिल्ह्याचा दर्जा कधी मिळणार हा प्रश्न आता पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मागील अधिवेशनात विरोधी पक्षनेते नाना पटोले यांनी विधानसभेत हिंगणघाट येथे अतिरिक्त जिलाधिकारी कार्यालय सुरू करण्याची मागणी केली होती. त्यावेळी महसूल मंत्र्यांनी सकारात्मक निर्णयाचे आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतर या संदर्भातील विशेष बैठक किंवा पुढील कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रश्नावर ठोस पाठपुरावा का केला नाही, हा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी हिंगणघाटला स्वतंत्र जिल्हा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजही त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नसल्याने जनतेत असंतोष वाढत आहे.




भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ती स्थान, औद्योगिक विकास, महसुलातील मोठे योगदान आणि वाढता प्रशासकीय विस्तार असूनही हिंगणघाटकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

हिंगणघाट उपविभाग हा चार जिल्ह्यांच्या सीमेवर असून चंद्रपूर जिल्हा अवघ्या १५ किलोमीटर, तर नागपूर व यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमा सुमारे ३० किलोमीटर अंतरावर आहेत. तरीही नागरिकांना किरकोळ प्रशासकीय कामांसाठी वर्ध्याला जावे लागत असल्याने वेळ आणि पैशांचा मोठा अपव्यय होत आहे. त्यामुळे अल्लीपूर, सिंदी रेल्वे आणि माडगाव यांसारख्या मोठ्या गावांना तहसीलचा दर्जा देऊन हिंगणघाटमध्ये अतिरिक्त जिलाधिकारी कार्यालय स्थापन करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

हिंगणघाटमध्ये जिल्हा व सत्र न्यायालय कार्यरत असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालय उभारणीची प्रक्रिया सुरू आहे. भविष्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचीही मागणी होत आहे. दुसरीकडे कापूस बाजार, वस्त्रोद्योग, टेक्स्टाईल पार्क, जिनिंग, तेल व डाळ उद्योग तसेच सोयाबीन प्रक्रिया उद्योगांमुळे हिंगणघाटने औद्योगिक केंद्र म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे.

स्थानिक नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांनी सरकारला इशारा देत निवडणुकीत दिलेले आश्वासन पूर्ण करावे. प्रथम अतिरिक्त जिलाधिकारी कार्यालय सुरू करून पुढे हिंगणघाटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा द्यावा. अन्यथा व्यापक जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २३४**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विशेष गौरव पुरस्कारासाठी माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांकडून अर्ज आमंत्रित

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील माजी सैनिक, वीर पत्नी आणि त्यांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने 'विशेष गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पात्र उमेदवारांनी १ सप्टेंबर २०२६ पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे. या विशेष गौरव पुरस्कारासाठी काही प्रमुख निकष निश्चित करण्यात आले आहेत.

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.ए.बी.कटटे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज १४६३/२०२६
वर्षा व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.०३.०९.२०२६

अर्जदार ः
1. Varsha Wasudeorao Bute
Age about 48 Yrs. Occu.: Household
2. Isha Wasudeorao Bute
Age 23 Yrs. Occu.: Education
Both R/o. Near Police Station Kholapuri Gate, Hanuman Nagar, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत वासुदेव गोविंदराव बुटे** हे दिनांक ०८.०१.२०२५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वर्षा व इतर वि. निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वर्षा व इतर वि. निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४६६/२०२६ ने.ता.०२.०९.२०२६

अर्जदार -
१. **श्रीमती गिता रमेशराव खातदेव,** वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
२. **वैभव रमेशराव खातदेव,** वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण
३. **रितेश रमेश खातदेव,** वय २१ वर्षे, धंदा - शिक्षण
तिघेही रा.गुजरी बाजार, अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं. २ व ३ चे वडिल नामे **रमेश महादेव खातदेव** हे **दिनांक २५/०५/२०२६** रोजी **CHC Karanprayag, Chamoli (Uttarkhand)** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक १७.०७.२०२६**

शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर सूचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **सतीश दौलतराव चव्हाण, रा. ऐश्वर्या अपार्टमेंट, कोट बागी हॉस्पिटल जवळ, डीपी रोड, औध पुणे जिल्हा पुणे ४११ ००७** यांनी **मनोज विनायकराव डफळे, रा.अतुल मंगल कार्यालयाजवळ, सिंधू अपार्टमेंट, रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती** यांच्या सोबत त्यांच्या मालकी व ताब्यातील खाली वर्णन केलेली मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजा-मंगरुळ चौव्हाळा प्र.व ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती ग्रा.प.आहे.स.डी. नांदगाव खंडेश्वर, जि.प.अमरावती,** पं.स.सर्वे नं./गट क्र.३४१ भो.वर्ग १, ४ हे ६० आर.रु. ६०.५० पै. यातील माझे मालकीचे व ताब्यातील पूर्व पश्चिम वाटणीचे उत्तरे कडील भागाची १ हे २१ आर जमीन पूर्व तदंगभूत वस्तूसह इतर झाड झुडुपासह माती गोटे सह सदर कोरड वाहू जमीन सर्व हक्कांसह सतीश दौलतराव चव्हाण, रा.ऐश्वर्या अपार्टमेंट, कोट बागी हॉस्पिटल जवळ, डीपी रोड, औंध पुणे जिल्हा पुणे ४११ ००७ यांना मालकी हक्काने खरेदी देत आहे. सदहू शेत हे हंगामी ओलीतांचे आहे, या शेताची चतुर्सिमा खालीलप्रमाणे -

**पुर्वेस - मुन्ना कलोजी यांचे शेत, पश्चिमेस - चंद्रकला अंबादास भुमरे यांचे शेत**
**उत्तरेस - हायवे रोड , दक्षिणेस- नारायण हरी लोणारे यांचे शेत**

वरील नमुद मालमत्तेमध्ये अथवा त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा, कोणताही हक्क, गहाण, बोजा, हितसंबंध, अधिकार, धारणाधिकार, सुविधाधिकार, करार, इत्यादी असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आंत आपला आक्षेप असल्यास खालील पत्त्यावर संबंधीत कागदपत्रांसह येऊन भेटावे.

असा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदहू मालमत्तेची खरेदी करुन घेतील व त्यांनतर माझे पक्षकाराचे खरेदी व मालकी हक्का बाबत कोणत्याही प्रकारची आक्षेप, वाद अथवा उजर चालणार नाही व तो माझ्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**ठिकाण ः अमरावती**
**दिनांक १६/०७/२०२६**

सही /-
**ॲड. मनिष जी. बिडकर**
ॲडव्होकेट/नोटरी
रा.लक्षव्दीप कॉलनी, शेगाव-रहाटगाव रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
मो.-९९७५२०१९०८

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज १३२१/२०२६
श्रीमती वनिता अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील ता.१९.०८.२०२६

अर्जदार ः
1. **Vanita Anil Ingole,** Age 45 Yrs. Occu.: Housewife
2. **Aaditya Anil Ingole,** Age 21 Yrs. Occu.: Education
3. **Aman Anil Ingole,** Age 19 Yrs. Occu.: Education,
All R/o. Mahatma Fule Nagar, V.M.V. Amravati
Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अनिल मधुकरराव इंगोले** हे दिनांक २३.०१.२०२५ रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वनिता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती वनिता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, अमरावती

e-mail ID :- eemjpdivamt@gmail.com Ph. No. 0721-2550538

ई-निविदा सुचना क्र.०९ सन २०२६-२०२७

**कामाचे नांव :- अमरावती पाणी पुरवठा योजना (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत म.जी.प्रा. उपविभाग क्र.१ व ३ अमरावती अंतर्गत येणा-या सर्व प्रभागामध्ये ग्राहकांचे संगणकीकृत पाण्याचे देयके तयार करणे, पाणी पटटी देयकांचे वाटप करणे, रोख खिडकीवर पाणी देयकाची रक्कम स्विकारणे, ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण करणे, ग्राहकांवरील फोटो मिटर रिडींग घेणे व इतर अनुषंगीक कामाची निविदा मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचे कडून बी-१ पध्दतीने मागविण्यात येत आहेत. या कामाची किंमत रु.२,२६,८५,६१६/- असुन कामा संबंधीचा सविस्तर तपशिल दिनांक १७/०७/२०२६ ला १६.०० वाजेपासुन विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्ड व महाराष्ट्र शासनाच्या ई टेंडर संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/nicgep/app वर उपलब्ध राहील.**

सही/-
(विवेक सोळंके)
कार्यकारी अभियंता

## जुळया शहराचा पाणीपुरवठा दोन दिवस राहणार बंद

**अचलपूर/प्रतिनिधीः-** जलवाहिनीला गळती लागल्याने अचलपूर-परतवाडा जुळया शहराचा पाणीपुरवठा येत्या गुरुवार २३ व शुक्रवार २४ जुलै रोजी बंद राहणार आहे. जलवाहिनी दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याने नागरिकांनी पाण्याचा आवश्यक साठा करून ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. अशी माहिती नगर पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली.

## नावात बदल

**लग्नाआधीचे नांव -**
**सोनाली ज्ञानेश्वर रंगारी**
**लग्नानंतर नांव -**
**सोनाली संगपाल ढबाले**
**पतीचे नांव -**
**संगपाल ढबाले**
**रा. ः भिमटेकडी, उत्तमनगर अमरावती**
**मो.नं.ः- ७७५६०१४४०९**

## -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४६०/२०२६ ने.ता.०१.०९.२०२६

अर्जदार -
१. **श्रीमती शंकुतला मोतीरामजी भोपळे,** वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम
२. **नरेंद्र मोतीरामजी भोपळे,** वय ४९ वर्षे, धंदा - शेती
३. **योगेश मोतीरामजी भोपळे,** वय ४३ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **ललीता गजाननराव अस्वार,** वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**निल (कुणीही नाही)**

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ चे पती तर अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडिल नामे मोतीराम किसनराव भोपळे यांचा दि.१६/०४/२०२२ रोजी नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदारशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १५.०७.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (क.स्तर), मोर्शी

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.ए.बी.कटटे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज १४४५/२०२६
बशिरा व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.०३.०९.२०२६

अर्जदार ः
1. **Bashira Bi Wd/o Abdulah Shah**
Age 69 Yrs. Occu.: Household
2. **Rashid Shah S/o. Abdulah Sha,** Age 58 Yrs. Occu.: Labour
3. **Firoz Shah S/o. Abudlla Shah,** Age 45 Yrs. Occu.: Labour
4. **Anwar Shah S/o. Abudlla Shah,** Age 41 Yrs. Occu.: Labour
5. **Razique Shah S/o. Abudlla Shah,** Age 36 Yrs. Occu.: Labour
All R/o. Near Furkaniya, Madarsa, Muzaffar Pura, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अब्दुल शहा मळबुल शहा** हे दिनांक १२.०४.२०१२ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **बशिरा व इतर वि.निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **बशिरा व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज ९७५/२०२६
अंजनी व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.२९.०६.२०२६

अर्जदार ः
1. **Anjani Motiramji Thorat,** Age 86 Yrs. Occu.: Household
R/o. Sadhana Colony, Dastur Nagar, Amravati
2. **Nirmala Balwantrao Apotikar,**
Age 67 Yrs. Occu.: Household
R/o. Swami Apartment, Jatharpeth Umari Akola
3. **Ujwal Motiram Thorat,** Age 55 Yrs. Occu.: Business
R/o. Sadhana Colony, Dastur Nagar, Amravati
4. **Sunita Vinay Thorat,** Age 58 Yrs. Occu.: Household
5. **Nipun Vinay Thorat,** Age 32 Yrs. Occu.: Pvt. Job
6. **Sanket Vinay Thorat,** Age 26 Yrs. Occu.: Education,
No.4 to 6 R/o. Plot No. RH-36, Vidhya Nagar CHS,
Near Model College MIDC, Dombivali East Dist. Thane

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मोतीराम अर्जुनजी थोरात** हे दिनांक ०६.१२.२०१५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अंजनी व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अंजनी व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती
## Regional Referral Services Hospital, Amravati.
## वैद्यकीय अधीक्षक कार्यालय

जावक क्र.विसंसरुअम/७८६२-६४/२०२६ दिनांक १७.०७.२०२६

### ई-निविदा सूचना

| निविदा क्रमांक | बाबीचे नांव | प्रकार | निविदा विक्री व तयार करण्याचा कालावधी | निविदा बंद तारीख | निविदा सादर करण्याचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | E-TENDER 15/RRSH/ Medicine and DISPO/ 26-27 | E Tender Notice | | | | |

१) अधिक माहितीसाठी इच्छुक निविदा धारक यांनी http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.
२) निविदा धारकांनी निविदेची फी **विशेष कार्य अधिकारी** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती यांच्या नांवे ऑनलाईन भरावयाची आहे. तसेच निविदाधारकाने निविदेची भयान रक्कम ही सुध्दा ऑनलाईन भरायची आहे.
३) निविदेचे वेळापत्रक या संकेतस्थळावर http://mahatender.gov.in पहावे.
४) वैद्यकीय अधीक्षक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती यांनी निविदेतील बाबीची संख्या कमी अधिक करण्याची आणि कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत व त्यांचा निर्णय सर्व निविदा धारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.
५) निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती दिनांक ........... पासून पहावयास मिळेल.
६) संपर्क क्रमांक ०७२१-२६६१७१२ संकेत स्थळ http://mahatender.gov.in
७) email:maharashtraamt@gmail.com

(वि.मा.का./अम/जाही/३५३/२०२६-२०२७)

**वैद्यकीय अधीक्षक**
**वि.सं.से.रु.अमरावती**

## जाहीर सुचना

माझे पक्षकारांनी मौजे चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील भूमापन क.व उपविभाग १०८/२, क्षेत्रफळ १ हे.२० आर, याची चतुःसिमा--

पुर्वेस - कालवा
पश्चिमेस - अरुणकुमार चांडक यांचे शेत
उत्तरेस - अविनाश राऊत यांचे शेत
दक्षिणेस - चिदामाय देवस्थानचे शेत

ही शेतजमीन नियाजुल्लाखान वसिउल्लाखान यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर शेतजमिनीवर कोणाचाही वारसा हक्क, बोजा, पुर्व हक्क, न्यायालयीन प्रकरण अथवा अन्य कोणताही वाद असल्यास सदर जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी पुराव्यासह कळवावे. अन्यथा आमचे पक्षकार सदर विकणार यांचा सदर शेतजमिनीचा मालकी हक्क निरंकुश आहे असे समजून पुढील व्यवहार करतील याची नोंद घ्यावी.

अमरावती
दिनांक २०.०७.२०२६

शिक्का

ॲड.प्रदीप मांजरे,
१०, श्रीराम नगर, अमरावती-४४४६०२
मो.नं.९८२२७०७१५६

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेद्वारे सर्व लोकांना सुचित/कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **गोविंदा उर्फ गोविंद गोपालदासजी मालाणी**, रा.रिध्दीसिध्दी, शिलांगण रोड, लक्ष्मी विहार, गणेश कॉलनी, अमरावती ता.जि.अमरावती यांच्याकडून त्यांच्या ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. ज्याचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन** - नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीचे हद्दीतील मौजे पेठ अमरावती, प्रगणे बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.६७/२, ६३, ६५, ६६/२, ८१/३ मधील एकुण ५ हे.७६ आर जमिनीचे अकृषक रुपांतरण जिल्हाधिकारी अमरावती यांनी त्यांच्या फाईलावरील ज्याचा रा.मा.क्र.एन.ए.पी.३४/पेठ अमरावती-७८/१९८६-८७ मधील दि.२८.१२.१९८७ रोजीचे आदेशान्वये अभिन्यास मंजूर करुन **न्यू पुष्पक कॉलनी,** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेतील खुला प्लॉट नं.११४, क्षेत्रफळ २७० चौ.मी. (२९०६ चौ.फुट) असून वि.उपविभागीय अधिकारी अमरावती यांचेकडून सबडिव्हीजन मंजूरी मिळालेले आदेश क्र.रा.मा.क्र./एन.ए.पी.३४/पेठ अमरावती-३१८/२०२३-२०२४, आदेश पारित दि.२४.०१.२०२४ नुसार सब डिव्हीजन मंजुरी मिळाल्यानंतर नवीन गावनमुना ७/१२ प्रमाणे खुला प्लॉट नं.११४-ए याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे असून याचे एकुण क्षेत्रफळ १३५.०० चौ.मी. (१४५३.१४ चौ.फुट) आहे ज्याची चतुःसिमा येणेप्रमाणे--

पुर्वेस - लेआउटमधील रोड, पश्चिमेस - सर्व्हिस लाईन, उत्तरेस - शर्मा यांचे घर (सब डिव्हीजन मंजूरीप्रमाणे प्लॉट नं.११४-बी), दक्षिणेस - आज रोजी खुला प्लॉट नं.११५

तरी सर्व लोकांना तसेच भागीदारी पेढील, बँक व कंपनी इत्यादीना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, वरील नमुद मालमत्तेमध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, हितसंबंध, ताबा, अधिकार, धारणाधिकार, सुविधाधिकार, करार, कोर्ट प्रकरण इत्यादी असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपला आक्षेप असल्यास खालील पत्त्यावर लेखी आक्षेप व संबंधित कागदपत्रासह येऊन भेटावे. असा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदरहू मालमत्तेचा ठरल्याप्रमाणे खरेदीखत करुन घेतील आणि त्यानंतर माझे पक्षकाराचे खरेदी व इतर हक्काबाबत कोणत्याही प्रकारचा आक्षेप, वाद अथवा उजर चालणार नाही व तो माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

अमरावती
दि.२०.०७.२०२६

(ॲड.विनीत खिवसरा)
रा.डफळे हॉस्पीटल जवळ,
रुक्मिणी नगर,अमरावती
मो.९४०५४४२४४२

## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## पशु वैद्यकीय विभाग

कार्यालय महानगरपालिका, अमरावती
जा.क्र.अमनपा/प.वै.वि./१४०/२०२६
दिनांक २०.०७.२०२६

### Expression of Intrest

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या SUO MOTO WRIT PITITION (CIVIL) No.(s) 5, OF 2025 व प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियम मधील तरतुदीचे काटेकोर पालन करण्याकरीता विभाग निहाय श्वन उत्पत्ती, नियंत्रण उपक्रम राबविण्याकरीता झोन निहाय शस्त्रक्रिया करण्याकरीता ईच्छुक AWBI मान्यताप्राप्त संस्थेकडून EOI ऑनलाईन मागविण्यात येत आहे. EOI संबंधी अटी व शर्ती अमरावती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| कामाचे नांव | कार्यक्षेत्र | श्वानांची निर्धारित संख्या | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| अमरावती महानगरपालिका झोन क्र.१ ते ५ अंतर्गत () मधील तरतुदीनुसार अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट श्वानांना पकडून निर्बिजीकरण व ॲन्टी रेबीज लसीकरण करणे, शस्त्रक्रिया उपरांत औषधोपचार, व्यवस्थापन पोषण, सुरक्षा, वेदनारहीत मृत्यू व आवश्यक औषधी व संपूर्ण व्यवस्थेसह | महानगर-पालिका अमरावती १.रामपुरी कॅम्प झोन क्र.१ | १००० | रु.१६ लक्ष | १६००० | ५००+९० (जीएसटी) = ५९० |
| | २.राजापेठ झोन क्र.२ | १००० | रु.१६ लक्ष | १६००० | ५००+९० (जीएसटी) = ५९० |
| | ३.दस्तुरनगर झोन क्र.३ | १००० | रु.१६ लक्ष | १६००० | ५००+९० (जीएसटी) = ५९० |
| | ४.बडनेरा झोन क्र.४ | १००० | रु.१६ लक्ष | १६००० | ५००+९० (जीएसटी) = ५९० |
| | ५.भाजी-बाजार झोन क्र.५ | १००० | रु.१६ लक्ष | १६००० | ५००+९० (जीएसटी) = ५९० |

| | |
|---|---|
| EOI प्रसिध्द करण्याचा तपशील - | |
| EOI दस्ताऐवज डाऊनलोड आरंभ | - दिनांक २०.०७.२०२६ |
| EOI दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त | - दिनांक ३०.०७.२०२६ - ४.०० वाजेपर्यंत |
| EOI दाखल करण्याची अंतिम तारीख | - दिनांक ३०.०७.२०२६ - ४.०० वाजेपर्यंत |
| EOI उघडण्याची दिनांक | - दिनांक ३१.०७.२०२६ - ४.०० वाजता |
| EOI ची वेळ व दिनांक .E-mail व SMS केल्या जाईल. | |

**स्वाक्षरी/-**
**पशुवैद्यकीय चिकित्सक,**
**महानगरपालिका, अमरावती**

## जाहीर नोटीस
## अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ यांचे न्यायालय

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६९/२०२६** **ने.ता. २०.०८.२०२६**

अर्जदार :-
**१. प्रशांत आनंदराव दुधे**
वय ४५ वर्षे, व्यवसाय- नोकरी
**२. वैशाली रामेश्वर कु-हाडे, लग्नानंतर वैशाली प्रशांत दुधे**
वय ४५ वर्षे, व्यवसाय- नोकरी
दोघे रा.प्रनांद, श्रध्दा कॉलनी, निसर्ग लॉनसमोर,
२०२, अंबर रेसीडंसी, साईनगर, अमरावती- ४४४ ६०७
**३. संदिप भाऊसाहेब कांडलकर,** वय ३७ वर्षे, व्यवसाय- नोकरी
**४. भाग्यश्री संदिप कांडलकर,** वय २८ वर्षे, व्यवसाय- घरकाम
दोघे रा. पोष्ट वडाणगल्ली, जि.नाशिक
------- वि.-------------
गैरअर्जदार :- निरंक

**APPLICATION IN THE MATTER OF ADOPTION OF THE CHILD UNDER SECTOPM 5,6,7,8.9,10 (i) (iv) Of HINDU ADOPTION AND MAINTENANCE ACT, 1956**

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र.१ व २ हे दोघे पती -पत्नी आहेत. अर्जदार क्र.१ व २ अर्जात नमुद असलेल्या पत्यावर कायमस्वरुपी राहत असून त्यांना कोणतेही अपत्य नाही. अर्जदार क्र.३ व ४ हे दोघे पती-पत्नी असुन त्यांना एकुण तिन अपत्ये आहेत. अर्जदार क्र.३ व ४ यांचे तिसरे अपत्य चि.सोहम याचा जन्म ०२.११.२०२५ रोजी झाला असून सध्या तो ७ महिने २० दिवसाचा आहे. चि. सोहम ला अर्जदार क्र.३ व ४ यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना हिंदु रितीरिवाजाप्रमाणे दत्तक दिले आहे. चि.सोहम यांचे जन्मप्रमाण पत्रामध्ये नाव बदलविण्याकरिता वरील अर्जदारांनी वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-३,अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग, हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस यांना जाहीर नोटीस देण्यात येते की, त्यांनी दिनांक २०/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता **वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश -३, अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक १८/०७/२०२६

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/१२९/एमआरसी-८१/काटपुर/२०२५-२०२६

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शाहिस्ता परवीन शेख हैदर**, रा.काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती यांचा स्वतः जन्म दिनांक **०१.०७.१९९४** रोजी **काटपूर** येथे झाल्याने जन्माची नोंद ग्रामपंचायत काटपूर यांना आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दिनांक १६.०७.२०२६**

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१४०१/२०२६
**राजेंद्र व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२८.०८.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
१. राजेंद्र पांडुरंग ठाकरे, वय ५९ वर्षे, व्यवसाय - शेती
२. सौ.प्रमोदिनी राजेंद्र ठाकरे, वय ५० वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. कु.वैभवी राजेंद्र ठाकरे, वय २१ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
सर्व रा.सुतगिरणी रोड, ४९-ब, गोपाल नगर, जि. अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अभिजीत राजेंद्र ठाकरे** यांचे दिनांक **३०.१२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार राजेद्र व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राजेद्र व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.अमर काळे आक्रमक

## संत्रा बागांपासून घरकुल, ट्रॉमा सेंटर, रस्ते, गुन्हेगारीसह अनेक प्रश्नांवर प्रशासनाला धारेवर धरले

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अमरावती येथे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खा.अमर काळे यांनी अमरावती जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधले. शेतकरी, नागरिक, रुग्ण, घरकुल लाभार्थी तसेच कायदा-सुव्यवस्थेशी संबंधित अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करत त्यांनी तातडीने कार्यवाहीची मागणी केली.

बैठकीच्या सुरुवातीलाच खा.अमर काळे यांनी वरूड–मोर्शी परिसरातील संत्रा बागांचे नुकसान हा गंभीर विषय उपस्थित केला.अल निनोमुळे वाढलेल्या तापमानामुळे मोठ्या प्रमाणात संत्रा बागा करपल्या असतानाही कृषी विभागाने अद्याप सर्वेक्षण केले नाही किंवा नुकसानभरपाईचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली.

जिल्हा नियोजन समितीअंतर्गत खासदार म्हणून सुचविण्यात येणाऱ्या विकासकामांसाठी केवळ ३ कोटी २० लाख रुपयांच्या मर्यादेत प्रस्ताव मागविण्यात आल्याचा मुद्दाही त्यांनी जोरदारपणे उपस्थित केला. या निधीतून मोठा हिस्सा महानगरपालिका क्षेत्रासाठी राखीव ठेवण्याच्या सूचनांमुळे ग्रामीण भागातील विकासकामांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी सांगितले. या विषयावर पालकमंत्री यांच्या हस्तक्षेपानंतर जिल्हाधिकाऱ्यांना खासदारांनी सुचविलेल्या कामांसाठी योग्य निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. राजुरा ग्रामीण रुग्णालयातील ट्रॉमा केअर सेंटरची मंजुरी रद्द झाल्याचा विषय उपस्थित करत




ती पूर्ववत सुरू करण्याची मागणी खासदारांनी केली. त्यावर पालकमंत्र्यांनी संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. मोर्शी येथील धोकादायक जुन्या पाण्याच्या टाकीचा प्रश्नही त्यांनी बैठकीत मांडला. नवीन जलटाकी सुरू झाल्यानंतरही जुनी धोकादायक टाकी अद्याप पाडण्यात आलेली नसल्याबद्दल त्यांनी जीवन प्राधिकरणावर नाराजी व्यक्त केली. त्यानंतर पालकमंत्र्यांनी आठ दिवसांत टाकी पाडण्याचे आदेश दिले.वरूड–मोर्शी परिसरातील सिमेंट रस्त्यांवर पडलेल्या मोठ्या भेगा (क्रॅक्स) यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला.

शंभर वर्षे टिकण्याची हमी देण्यात आलेल्या रस्त्यांवर काही महिन्यांतच भेगा पडणे गंभीर बाब असल्याचे सांगत त्यांनी दोषी ठेकेदारांवर कारवाई करून तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली. पालकमंत्र्यांनी यावरही त्वरित कार्यवाहीचे निर्देश दिले.जिल्ह्यात वाढत चाललेल्या मेफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थाच्या विळख्यामुळे वाढणारी गुन्हेगारी हा गंभीर विषयही खासदारांनी उपस्थित केला. या अमली पदार्थामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून मारामाऱ्या, खून, बलात्कार यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याची चिंता व्यक्त करत जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक कडक करण्याची मागणी त्यांनी केली.

बैठकीत घरकुल योजनेंतर्गत ३,३३७ लाभार्थ्यांचे वर्कलोड जनरेट न झाल्यामुळे अनुदान रखडल्याचा प्रश्नही त्यांनी मांडला. हा प्रश्न वर्षभरापासून प्रलंबित असून वर्धा जिल्ह्यात प्रशासनाने तत्परतेने तो सोडविला, मात्र अमरावती जिल्ह्यात अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित लाभार्थ्यांचे प्रकरण तातडीने निकाली काढून त्यांना घरकुलाचे अनुदान मिळावे, अशी मागणी त्यांनी केली. बैठकीत उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर पालकमंत्र्यांनी संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


---

## संक्षिप्त



### डॉ. नेहा बख्तर यांचा पीडीएमएमसीमध्ये सत्कार

**अमरावती**-श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय (PDMMC), अमरावती येथे मानसोपचारशास्त्र विभागातील कनिष्ठ निवासी डॉक्टर डॉ. नेहा बख्तर यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्कार – २०२६ (National Role Model Award)' प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे प्रदान करण्यात आला. तसेच, यावेळी त्यांना राष्ट्रपती भवनाला भेट देण्याचा मान देखील लाभला.डॉ. (मेजर) नेहा बख्तर या अमरावती जिल्हा व लगतच्या जिल्ह्यांमधून भारतीय सैन्याच्या आर्मी मेडिकल कॉर्प्स (AMC) मध्ये अधिकारी म्हणून दाखल होणाऱ्या आजपर्यंतच्या पहिल्या व एकमेव महिला अधिकारी आहेत.याप्रसंगी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख यांनी प्राध्यापक व सहकाऱ्यांच्या उपस्थितीत डॉ. नेहा बख्तर यांचा सत्कार करून त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल, सेवाभावाबद्दल आणि वैद्यकीय व्यवसायाप्रती असलेल्या समर्पणाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, पदाधिकारी व सदस्य तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी परिवारातर्फे डॉ. नेहा बख्तर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.



### अण्णाभाऊ साठे यांना वाचनालयात अभिवादन

**तिवसा**-श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला वाचनालयाचे पदाधिकारी, सदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांनी अण्णाभाऊंच्या जीवनप्रवासाला उजाळा दिला. त्यांनी आपल्या साहित्यातून आणि शाहिरीतून कष्टकरी समाजाचे प्रश्न मांडले, असे विचार वक्त्यांनी व्यक्त केले. अण्णाभाऊंचे साहित्य नेहमीच प्रेरणा देत राहील, असे मत यावेळी वाचनालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप सामूहिक आदरांजलीने झाला.कार्यक्रमाला रोशन डगवार,सचिन काळे,नितु मुंदाणे, प्रणाली कमळापुरे, मोनाली येवले, कृणाल गौरखेडे,प्रिया डहाके व इतर वाचक वर्ग व सभासद उपस्थित होते.

---

## मराठी पत्रकारिता अभ्यासक्रमसाठी २७ जुलै रोजी प्रवेशाची अंतिम संधी


**अमरावती/वार्ताहर**

भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) मध्ये मराठी पत्रकारिता डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांसाठी सोमवार २७ जुलै रोजी थेट प्रवेशाची अंतिम संधी देण्यात आली आहे. प्रवेश अर्ज गूगल फॉर्म द्वारे किंवा आयआयएमसीच्या अमरावती कार्यालयात येऊन भरता येईल.

थेट प्रवेश फेरी अंतर्गत नोदणी प्रक्रिया सुरु असून ती २६ जुलै पर्यंत सुरु राहील. सोमवारी २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता प्रवेश परीक्षा घेण्यात येईल.

ही परीक्षा भारतीय जन संचार संस्थानच्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पश्चिम क्षेत्रीय परिसरात आयोजित करण्यात येणार आहे. मराठी पत्रकारितेत पी. जी. डिप्लोमा हा एक वर्षाचा अभ्यासक्रम असून तो पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि मीडियाच्या क्षेत्रातील रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे.

मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी प्राप्त विद्यार्थी मराठी पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. जे विद्यार्थी त्यांच्या बॅचलर पदवीच्या अंतिम वर्षात किंवा सेमिस्टर परीक्षेत बसले



आहेत किंवा जे विद्यार्थी परीक्षा देणार आहेत ते देखील अर्ज करण्यास पात्र आहेत. प्रवेश करीता वयोमर्यादेची अट असून अनारक्षित प्रवार्गासाठी २५ वर्ष, ओबीसी करीता २८ वर्ष तर अनुसूचित जाती / जमाती आणि दिव्यांग उमेदवारा करीता ३० वर्ष आहे.

इच्छुक उमेदवारांनी प्रवेश अर्ज व गूगल फॉर्म लिंक करीता आयआयएमसीच्या अधिकृत वेबसाइट https://iimc.gov.in/language-courses-२६-२७ वर संपर्क करावा. प्रवेश प्रक्रिया संबंधी अधिक माहितीसाठी किंवा अडचणी संदर्भात डॉ. राजेश सिंह कुशवाहा (९४१५८६२३७७), कार्यालय (०७२१-२६६८१८०), यांच्याशी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपद्वारे माहिती मिळवायची असल्यास दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संदेश पाठवू शकतात, अशी माहिती संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी दिली आहे.

---

### गोठ्यातून दोन गायींची चोरी

**मोर्शी**-तालुक्यातील येवती बसस्टँडलगत असलेल्या गोठ्यातून दोन गायी चोरीला गेल्याची घटना घडली. प्रफुल अनामतराव कावल (वय ३४, रा. येवती) यांनी आपल्या दोन लाल रंगाच्या गायी गोठ्यात बांधून ठेवल्या होत्या. त्यापैकी एका गायीची किंमत १५ हजार रुपये तर दुसऱ्या गायीची किंमत २५ हजार रुपये असून, एकूण ४० हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केला.या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास करीत आहेत.

### शेतातून ४५ नोझलची चोरी

**अमरावती** - नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टोंगलाबाद शेतशिवारातून अज्ञात चोरट्याने शेतातील सिंचनासाठी वापरण्यात येणारे ४५ नोझल चोरून नेले. ही घटना उघडकीस आली. चोरीस गेलेल्या साहित्याची किंमत सुमारे १३ हजार ५०० रुपये असल्याचे सांगण्यात आले. शेतकरी अजय सुभाषराव बारसे (३९), रा. येणस, नांदगाव खंडेश्वर यांच्या तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गोठ्यातून बैल चोरी

**दर्यापूर**-शहरातील मेहेरनगर परिसरातून गोठ्यात बांधलेला बैल चोरीला गेल्याची घटना घडली.बाळू महादेवराव ठाकरे (वय ४५, रा. मेहेरनगर, दर्यापुर) यांच्या मालकीचा सुमारे एक वर्ष वयाचा गोऱ्या रंगाचा बैल, ज्याची अंदाजे किंमत १० हजार रुपये आहे, हा सायंकाळी ७ ते ७.१५ वाजताच्या दरम्यान गोठ्यातून अज्ञात चोरट्याने चोरून नेला. या प्रकरणी दर्यापुर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला आहे.

---

## कर्जमाफीबाबत शेतकऱ्यांच्या बँकांमध्ये माराव्या लागत आहे फेऱ्या




**अंजनगाव बारी/वार्ताहर**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेचा लाभ नेमका कोणाला मिळणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने अंजनगाव बारी परिसरातील शेतकरी सध्या बँकांच्या फेऱ्या मारताना दिसत आहेत. कर्जमाफीच्या निकषांबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, राष्ट्रीयकृत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या शाखांमध्ये दररोज चौकशीसाठी गर्दी वाढत आहे. यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने खरीप हंगामातील पेरण्या आणि शेतीची कामे प्रभावित झाली आहेत. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पीककर्ज, कर्जमाफी आणि पुढील कर्ज वितरणाबाबत मोठी चिंता सतावत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी बँकांमध्ये जाऊन आपल्या कर्ज खात्याची माहिती घेत असून, आपण कर्जमाफीसाठी पात्र आहोत की नाही, याबाबत चौकशी करत आहेत. मात्र, शासनाकडून अद्याप पात्र लाभार्थ्यांच्या याद्या जाहीर करण्यात आलेल्या नसल्याने शेतकऱ्यांचा संभ्रम अधिकच वाढला आहे. शासनाने निश्चित केलेल्या निकषांमध्ये बसणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याचे सांगितले जात असले, तरी अधिकृत यादी जाहीर न झाल्याने अनिश्चिततेचे वातावरण कायम आहे. मात्र, शासनाने कर्जमाफीचे निकष, पात्रता अटी आणि लाभार्थ्यांच्या याद्या तातडीने जाहीर करून शेतकऱ्यांमधील संभ्रम दूर करावा, अशी जोरदार मागणी परिसरातील शेतकरी व्यक्त करत आहेत.

---

## राजर्षी शाहू सायन्स कॉलेजमध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय ओरिएंटेशन कार्यक्रम

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अतुल विद्या मंदिर, वर्धा संचालित राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शैक्षणिक, प्रशासकीय, सहशैक्षणिक व ग्रंथालयीन व्यवस्था, विविध विद्यार्थी कल्याण योजना तसेच अभ्यासक्रमाची माहिती देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित



करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. संपदा पाथरकर यांनी सहसंयोजक (Co-convener) म्हणून उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे स्वागत करून कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व समन्वय साधला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दीपप्रज्वलन व नोंदणी प्रक्रियेद्वारे कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर संयोजक प्रा. डॉ. ए. डी. बनसोड यांनी ओरिएंटेशन कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात प्रा. एस. ए. वाणी यांनी आयक्यूएसीच्या कार्याचा आढावा दिला. डॉ. एस. एस. पाढेन यांनी एनसीसी, डॉ. जी. बी. संतापे यांनी एनएसएस, तर डॉ. एम. पी. वाघमारे यांनी महाविद्यालयीन ग्रंथालयातील सेवा, ई-संसाधने,संदर्भग्रंथ,वाचन सुविधा,नॅशनल डिजिटल लायब्ररी (NDLI) व ग्रंथालयाचे नियम यांची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर डॉ. एम. एस. प पळसपगार यांनी करिअर कट्टा उपक्रम,आर. एम. खोपे यांनी अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट (ABC) आयडी बद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. एम. पी. वाघमारे यांनी केले.कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी प्रा. ए. एन. खान यांनी क्रीडा व युवक महोत्सव, विविध क्रीडा स्पर्धा आणि विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष खेळांचे आयोजन केले.या दोन दिवसीय ओरिएंटेशन कार्यक्रमामुळे नवप्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाची ओळख होऊन विविध शैक्षणिक, संशोधन व व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन मिळाले.

---

# ८० हून अधिक मंदिरांचे विश्वस्त एकाच व्यासपीठावर

## महाराष्ट्र देवस्थान समितीच्या संघटनात्मक कार्याला मोठे यश

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

महाराष्ट्र देवस्थान समितीच्या व्यापक उद्दिष्टांना बळ देण्यासाठी प्राचीन चंद्रभागेश्वर महादेव संस्थान, महादेव घाट, चांदूर रेल्वे येथे आयोजित करण्यात आलेली चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील संयुक्त मंदिर समितीची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या बैठकीला ८० हून अधिक मंदिरांचे विश्वस्त, अध्यक्ष, सचिव, पुजारी, सेवेकरी व धर्मप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मंदिर संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन, देवस्थान इनाम जमिनींचे संरक्षण, मंदिरांचे पारदर्शक व्यवस्थापन, धर्मदाय आयुक्त कार्यालयाशी प्रभावी समन्वय,मंदिरांच्या कायदेशीर समस्या,मंदिर विकास, जनसहभाग आणि जिल्हास्तरीय मंदिर संघटन अधिक सक्षम करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र देवस्थान समितीच्या माध्यमातून सुरू असलेल्या संघटनात्मक कार्याला मंदिर विश्वस्तांचा वाढता प्रतिसाद मिळत असून, विविध तालुक्यांतील मंदिरांचे विश्वस्त प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने एकत्र आल्याने मंदिर चळवळीला नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी आशिष मारुडकर, निलेशजी टवलारे, कैलाशभाऊ पनपालिया, ओमप्रकाश परतानी, कैलासभाऊ गिरोलकर, बच्चूभाऊ वानरे,धनराज वेलणकर, कृष्णभाऊ मारुडकर, धीरज चांडक, रोहन ढोमणे, भूषण मेने, श्रीकृष्ण माहोरे, प्रकाश चव्हाळे, राजेंद्र मस्के,घुगे, मुरलीधर पलके, श्रीकांत देशपांडे, सुनील अग्रवाल, राजेश सोनी, वैभव पोद्दार, निलेश गुल्हाने, सुधीर आढाव, विनय देशमुख, राजाभाऊ देशमुख, पद्माकर घेरडे, गजानन ठाकरे, प्रवीण घुईखेडकर, उषा गिरसवडे,सुवर्णा पाखोडे, अंजली अग्रवाल, रमेश जयसिंगपूरे, अजय गाडे,गोपाल आखरे,राजेंद्र डेरे,सुधीर डेरे, प्रशांत कोठेकर, शंकरलाल मानकाणी,अतुल मेटे,श्याम जोशी, स्वप्नील चौधरी,नेमाडे गुरुजी, नरेश देशमुख, मारुती गुजडे, सुनील मालखेडे, सचिन वर्मा,नकुल भैसे, सोपान पापडकर, अनिल वाढोनकर, रवींद्र डेरे,गजानन ढगे, डॉ. नरेंद्र डेरे, अनिल वाट, श्रेयस देशमुख, अरुण उमक, बाळासाहेब वानखेडे,रवींद्र भोयर, मुकेश पवार, विजय करडे, अनिल काळमेघ, रवींद्र काळमेघ,



विनोद वानखेडे, सुनील खर्डे, श्याम घाटे,सुनील वाढोणकर, संजय मेने, सुनील दहातोंडे आणि धनंजय पडवळ यांच्यासह अनेक मान्यवर विश्वस्त उपस्थित होते.

धर्मदाय कार्यालय वकील संघ अध्यक्ष ॲड. नरेश पारडशिंगे यांनी कायदेशीर मोलाचे मार्गदर्शन दिले.बैठकीत सर्व उपस्थितांनी एक मंदिर-एक संघटन-एक दिशा' हा संकल्प दृढ करत मंदिरांचे संरक्षण, विकास आणि सशक्त संघटनासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

मंदिरांचे हक्क, देवस्थान मालमत्तेचे संरक्षण, कायदेशीर मार्गदर्शन आणि शासनाशी प्रभावी समन्वय या माध्यमातून मंदिर संघटन अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने कार्य केले जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

ही बैठक महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वाढत्या प्रभावाची साक्ष ठरली असून, अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात मंदिर संघटन अधिक बळकट करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. या बैठकीत अमरावती जिल्हा कोर कमिटी कैलासजी गिरोळकर, श्रीकृष्ण माहोरे, ओमप्रकाश जी परतानी, श्रीकृष्णाजी मारोडकर, विनोद वानखडे, विजयजी करडे, रोहनजी ढोमणे यांची घोषणा करण्यात आली.धनराज जी वेलणकर यांची वर्धा जिल्हा संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली.बच्च्यु वानरे यांनी बैठकीचे संचालन केले. तर सुनील अग्रवाल यांनी उपस्थित्यांचे आभार व्यक्त केले.

---

## 'माऊली' नाट्यप्रयोगातून संत ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राचा भावस्पर्शी आविष्कार

**अमरावती/वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त 'माऊली' या विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २४ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे हा विशेष कार्यक्रम सादर होणार आहे. 'माऊली' हा संत ज्ञानेश्वरांच्या जीवनप्रवासावर आधारित नाट्यमय सांस्कृतिक आविष्कार असून, त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, अध्यात्म, भक्ती, समाजप्रबोधन आणि मानवतेचा संदेश प्रभावी रंगमंचीय सादरीकरणातून उलगडण्यात येणार आहे. ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून,'माऊली' हा कार्यक्रम त्या उपक्रममालिकेतील एक महत्त्वाचा सांस्कृतिक उपक्रम आहे. हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. राज्याच्या समृद्ध संतपरंपरेचे, आध्यात्मिक वारशाचे आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, अमरावती व परिसरातील वारकरी, कला रसिक, विद्यार्थी, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक व सांस्कृतिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# वलगाव दुहेरी हत्याकांडातील पाच आरोपी गजाआड

## जुन्या वादातून दोन मित्रांना पोहोचविले यमसदनी





**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव येथे रविवारी १९ जुलै रोजी रात्री उशिरा घडलेल्या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. बस स्टँड परिसराजवळ जुन्या वादातून झालेल्या या रक्तरंजित हल्ल्यात दोन जिवलग मित्र संजोग विकास जोशी (वय २४, रा. वलगाव) आणि ऋतिक बाबलू पंडित (वय २४, रा. महाजनपुरा, अमरावती) यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात गुन्हे शाखेच्या पथकाने रात्रभर विशेष मोहीम राबवत पाच आरोपींना भातकुली बस स्टॅन्ड परिसरातून ताब्यात घेतले आहे. विकी उर्फ गोलू विकास उगले (वय २१), मिलन गोपालराव तायडे (वय २१), अजय दिलीपराव नागदिवे (वय २१), अनिकेत विशाल मेश्राम (वय २५) व सुमित सुधाकर सुरजुसे (वय १९, सर्व रा. वलगांव) अशी अटकेतील आरोपींची नावे आहे. माहितीनुसार, रविवारी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास संजोग आणि ऋतिक दोघे मित्र वलगाव बस स्टँड परिसरात उपस्थित होते. या दरम्यान मोटारसायकल वरून आलेल्या चार युवकांसोबत त्यांची जुन्या कारणावरून बाचाबाची सुरू झाली. पाहता पाहता या वादाचे रूपांतर हिंसक झटापटीत झाले. आरोपींनी आपल्या जवळील धारदार शस्त्र व चाकू काढून(पान २ वर)

### घरून नेले होते बोलवून

संजोग जोशीच्या आजीने बलगाव ठाण्यात दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे की रविवारी सायंकाळी संजोग आणि ऋतिक घरी उपस्थित होते. त्यावेळी आरोपी गोलू उगले, मिलिंद तायडे,अजय नागदिवे, सुमित सुरजुसे त्यांच्या घरी आले ते संजोग आणि ऋतिकला सोबत घेऊन गेले. आजीने हडकावले असता गोलू उगले ने म्हटले की थोड्यावेळात आम्ही परत येतो. यानंतर रात्री साडेअकरा वाजता दोघांच्या हत्येची माहिती आली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना ताब्यात घेतली.

# बोगस बियाणे कंपन्यांना तात्काळ 'काळ्या यादीत' टाका

## जिल्हाधिकारी कार्यालयावर युवक काँग्रेसचा धडक मोर्चा!



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात शेतकऱ्यांची खुलेआम आर्थिक पिळवणूक करणाऱ्या आणि त्यांच्या घामाच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या दरोडेखोर बोगस बियाणे कंपन्यांविरोधात आता प्रचंड संतापाचा भडका उडाला आहे. याचाच एक भाग म्हणून आज अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे अत्यंत धडक व आक्रमक निदर्शने करण्यात आली. शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेल्या आणि त्यांची फसवणूक करणाऱ्या या बोगस कंपन्यांना तात्काळ 'काळ्या यादीत' टाकावे आणि त्यांच्या मुसक्या आवळाव्यात, या प्रमुख मागणीसाठी हे एल्गार आंदोलन छेडण्यात आले.

आंदोलनादरम्यान संतापलेल्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी शासन व बोगस बियाणे कंपन्यांच्या संगनमताबद्दल जोरदार घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. दरवर्षी खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी उधारी-उसनवारी करून महागडे बियाणे खरेदी करतो. मात्र, बोगस बियाण्यांमुळे पीक उगवतच नाही, परिणामी शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होते आणि त्यांच्यावर दुबार पेरणीचे व कर्जाचे डोंगर कोसळते. या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करणाऱ्या व दोषी कंपन्यांना पाठीशी घालणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेचा यावेळी तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला.या प्रक्षोभक निदर्शनांनंतर(पान २ वर)

## धुक्याच्या साक्षीने आकार घेत आहे चिखलदऱ्याचा नवा स्कायवॉक

**अमरावती :** चिखलदरा येथे भव्य स्कायवॉकचे काम प्रगतीपथावर आहे. पर्यटकांसाठी लवकरच स्कायवॉकचे नवे आकर्षण खुले होणार आहे.(छायाचित्र. सागर राणे, जिल्हा माहिती कार्यालय अमरावती)



# सोनम वांगचुक यांच्या समर्थनात विद्यार्थी उतरले रस्त्यावर

## शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यासह देशभरात पेपर फुटीच्या घटना वाढल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ता सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आज सोमवार २० जुलै रोजी शहरात विद्यार्थी आणि पालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा काढला. इर्विन चौकातून विद्यार्थी नेते निलेश मोरेश्वर जामनिक यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढून जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, पेपरफुटी प्रकरणांची निष्पक्ष चौकशी व्हावी,दोषींवर कठोर



कारवाई करावी,नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा. आंदोलक विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक परीक्षांसाठी विद्यार्थी वर्षभर मेहनत घेतात, पण पेपर फुटल्याने त्यांची मेहनत वाया जाते.परीक्षा रद्द होणे, (पान २ वर)

# पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आज आयोजन

## सुशिक्षित बेरोजगारांना कंपन्यांमध्ये नोकरीची संधी

**अमरावती/प्रतिनिधीः-** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित उमेदवारांना स्थानिक व इतर जिल्ह्यातील खासगी कंपन्या, कारखाने आणि उद्योगसमूहांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या वतीने २१ जुलै २०२६ रोजी पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे करण्यात आले आहे.या मेळाव्यात जाधव गिअर्स लि. अमरावती, कोलब्रो ग्रुप प्रा. लि. अमरावती/ नागपूर, क्रेडिट ॲक्सेस ग्रामीण प्रा. लि. अमरावती आणि स्विगी लि. (क्यूस कॉर्पोरेशन) या कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून विविध पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती व लेखी परीक्षा घेतील आणि पात्र उमेदवारांना रोजगाराची संधी मिळवून देतील.

तरी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी २१ जुलै २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, डेपो रोड, अमरावती येथे स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट फोटो व आवश्यक सर्व मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे. या मेळाव्यासाठी कोणताही प्रवास भत्ता दिला जाणार नाही. काही अडचण असल्यास उमेदवारांनी(पान २ वर)

# इंदला परिसरातील विहिरीत वृद्ध महिलेचा मृतदेह आढळला

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत इंदला परिसरात ६५ वर्षीय वृद्ध महिलेचा मृतदेह शेतातील विहिरीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.मृत महिलेचे नाव ताईबाई दगडूजी धारसकर (वय ६५, रा. इंदला, फ्रेजरपुरा) असे आहे.त्यांचा मृतदेह मनोज काळे यांच्या शेतातील विहिरीत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. शव विच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.ताईबाई धारसकर यांचा मृतदेह विहिरीत कशा परिस्थितीत आढळला, हा अपघात आहे की अन्य काही कारण, याबाबत फ्रेजरपुरा पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. शवविच्छेदन अहवाल आणि तपासानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# विहिरीत पडलेल्या तरूणाला अग्निशमन दलाने वाचवले

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवसारी रोडवरील श्रम साफल्य कॉलनी येथे एक तरुण विहिरीत पडल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. अग्निशमन दलाच्या तातडीच्या प्रयत्नाने तरुणाचा जीव वाचवण्यात यश आले.निलेश वासुदेव ठाकरे (वय ४८) असे विहिरीत पडलेल्या तरुणाचे नाव आहे. माहिती नुसार रविवार रात्री नगरसेवक ऋषिकेश देशमुख यांनी अग्निशमन मुख्यालयाच्या नियंत्रण कक्षाला फोन करून माहिती दिली की, श्रम साफल्य कॉलनीतील एक तरुण विहरित पडला आहे.



माहिती मिळताच अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे आणि पाळी प्रमुख किशोर शेंडे यांच्या आदेशानुसार फायर लॉरी एमएच २७ बीएक्स ७८०३ तातडीने घटनास्थळी रवाना करण्यात आली. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी वेळ न घालवता दोर(पान २ वर)

# सावळापूर पूर्णा परिसरातील सोयाबीन बियाणे प्रकरण गंभीर

## तक्रारीनंतर अचलपूर कृषी विभाग ॲक्शन मोडमध्ये

### बियाणे कंपन्यांवर एफआयआर दाखल

**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील सावळापूर पूर्णा परिसरात सोयाबीन बियाणे उगवण न झाल्याच्या तक्रारींमुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरणी करूनही अपेक्षित उगवण न झाल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याची तक्रार कृषी विभागाकडे केली होती. या



तक्रारींची गांभीर्याने दखल घेत अचलपूर कृषी विभागाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन संबंधित शेतांमध्ये पाहणी केली. प्राथमिक तपासणीनंतर दोषी आढळलेल्या संबंधित बियाणे कंपन्यांविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

पंचायत समिती कृषी विभागाचे रविकांत उइके गुण नियंत्रक तसेच कृषी विभाग अचलपूर प्रवीण मडघे उपकृषी अधिकारी, (पान २ वर)

# जिल्ह्यातील विशेष लोक अदालतीमध्ये विविध प्रकरणांचा यशस्वी निपटारा

## ४.१३ कोटी रुपयांची तडजोड

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे नुकतेच विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीमध्ये प्रामुख्याने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत येणाऱ्या 'धनादेश बाऊन्स' प्रकरणांवर तडजोडीसाठी भर देण्यात आला होता. संपूर्ण जिल्ह्यातून या उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

विशेष लोक अदालत पार पाडण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात एकूण १८ पॅनल (मंडळ) तयार करण्यात आले होते. या पॅनलमध्ये न्यायाधीश, वकील आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या लोक अदालतीसमोर एकूण २ हजार ७४० प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात आली होती, त्यापैकी २२९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यामध्ये विशेष बाब म्हणजे १० वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या ४ जुन्या प्रकरणांमध्येही दोन्ही पक्षांत तडजोड घडवून आणण्यात यश आले. या संपूर्ण प्रक्रियेतून एकूण ४ कोटी १३ लाख ४५ हजार ३७२ रुपयांच्या तडजोडीच्या रक्कमेचे दावे निकाली काढण्यात आले.(पान २ वर)

# गुलरघाट आदिवासी आश्रम शाळेच्या वादामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

## शिक्षक व व्यवस्थापन समितीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**खल्लार/प्रतिनिधीः-** गुलरघाट आदिवासी आश्रम शाळेच्या स्थलांतराच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा वाद निर्माण झाला असून, या वादाचा सर्वाधिक फटका आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत आहे. शासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून शाळेचे बाभळी येथून अंजनगाव येथे सर्व सुविधा उपलब्ध असलेल्या नविन भाड्याच्या इमारतीत स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. मात्र, काही स्थानिक शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या भूमिकेमुळे शाळेचे नियमित शैक्षणिक कामकाज प्रभावित होत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.



आदिवासी विकास आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या नियम व अटी-शर्तींचे पालन करून शाळेचे स्थलांतर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या निवास, शिक्षण, भोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करूनच हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. ३५० ते ४०० विद्यार्थी संख्या असलेल्या या आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश होता.मात्र, शाळा सुरू होऊन २० दिवसांचा कालावधी उलटूनही शैक्षणिक वातावरण सुरळीत झालेले नाही. काही स्थानिक शिक्षक विविध राजकीय पुढाऱ्यांच्या (पान २ वर)

# दुचाकी समोर रोही आल्याने वसुली कर्मचा-याचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रथ्रोट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या वडगाव फत्तेपुर ते परसापूर दरम्यान आज सोमवार २० जुलैच्या दुपारी झालेल्या अपघातात रामपुरी कॅम्प येथील रहिवासी आणि कपडा वसुली कर्मचारी गौरव नंदलाल वाधवा (वय ४५) यांचा जागीच मृत्यू झाला. वाहनासमोर रोही आल्याने अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे.



माहितीनुसार, सोमवारी सकाळी गौरव वाधवा नेहमीप्रमाणे वसुली करण्यासाठी अमरावती वरून परतवाडासाठी निघाले होते. परतवाडा पोहोचण्यापूर्वी त्यांनी जावई बिरजू रेवलानी यांना फोन करून पोहचण्याची माहिती दिली आणि परतवाडा येथील परिसरातील लक्ष्मी कन्फेशनरी(पान २ वर)

# अमरावतीच्या विकासासाठी कटीबद्ध - आमदार पोटे

## क्रेडाई, यूथ विंग आणि गुरु सिंह सभा, राजस्थानी मंडळाकडून भव्य सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा विधान परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल आमदार प्रवीण पोटे-पाटील यांचा क्रेडाई, यूथ विंग आणि गुरु सिंह सभा , राजस्थानी मंडळच्या संयुक्त विद्यमाने हॉटेल महफिल येथे उत्साहपूर्ण वातावरणात गौरव सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख मान्यवरांसह स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल, दिलीपभाई पोपट, निलेश ठाकरे , डॉ राजेंद्र कलंत्री, कपिल आंडे आणि राजन पाटील उपस्थित होते.




सत्कार सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

यावेळी बोलताना अनिल अग्रवाल यांनी प्रवीण पोटे-पाटील यांच्या राजकीय प्रवासाचा गौरव करताना सांगितले की, जनतेच्या विश्वासामुळे त्यांनी अनेक ऐतिहासिक टप्पे गाठले आहेत. विधानसभा निवडणुकीतील विक्रमी विजय, मंत्रिपदाची जबाबदारी आणि आता सलग तिसऱ्यांदा विधान परिषद सदस्य म्हणून निवड ही त्यांच्या प्रभावी नेतृत्वाची साक्ष आहे. शिक्षण(पान २ वर)

# टायर फुटून कार पलटी, तीनजण जखमी

**तिवसा/प्रतिनिधीः-** नागपूर ते अमरावती या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या वरखेड फाट्यानजीक भरधाव कारचा टायर फुटल्याने कार पलटी होऊन तीनजण गंभीर जखमी झाल्याचीं घटना आज सोमवारी (ता. २०) ६:३० वाजता दरम्यान घडली.



भूषण गणेश येलकर (वय २८),अर्पित गणेश येलकर (वय २७), महेंग जगतपाल शाहू (वय १९) सर्व रा. नागपूर असे या अपघातात जखमीचे नावे आहे.

तीनजण हे ब्रेझा या कारने नागपूर वरून अमरावतीच्या दिशेने जात होते. (पान २ वर)